
नागपूर ते नागपूर

१९२० – १९५९



कॉँग्रेसच्या कार्याचें समालोचन

— दा. ना. शिखरे

नागपूर कॉँग्रेस स्वागत समिति तर्फे प्रकाशित

ऊ/८८

नागपूर ते नागपूर

काँग्रेसच्या कार्याचें समालोचन

लेखक
दा. न. शिखरे
एम्. ए.

किंमत १॥ रुपया

प्रकाशक :
स्वागतसमिति, अ. भा. काँग्रेसचें ६४ वें अधिवेशन, नागपूर.

प्रकाशक :
मदनगोपाल अग्रवाल
सरचिटणीस, अखिल
भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचें
६४ वें अधिवेशन,
सीताबर्डी, नागपूर.

चित्रकार :
व्ही. एन्. ओके.

प्रथमावृत्ति १९५८

मुद्रक :
दा. त्र्यं. जोशी
बी. ए. (टिळक)
व्यवस्थापक चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

प्रस्तावना

नागपूर शहरीं यंदा भरणाऱ्या कॉंग्रेसच्या ६४ व्या अधिवेशनाचे निमित्तानें, प्रस्तुतचें पुस्तक प्रकाशित करतांना मला आनंद वाटतो.

१. कॉंग्रेसच्या निमित्तानें अनेकानेक कार्यें उभारलीं जात आहेत. त्यांपैकीं कांहीं अशीं आहेत कीं, त्यांचें स्वरूप तात्कालिक असलें, तरी त्यांचें महत्त्व मात्र तात्पुरतें नाहीं. त्याचा लाभ आमच्या नागपूर शहराला कायमचा होत राहील, याचा आनंद मी विशेष मानतें. गेल्या तीन-चार महिन्यांत तीन-चारशें कार्यकर्त्यांनीं रात्रंदिवस खपून रस्ते, दिवे, पाणी इत्यादि सुख-साधनांनीं सज्ज असें ' अभ्यंकर नगर ' उभें केलें. त्याचे लाभ नागपूरच्या नागरिकांना निरंतर मिळत राहतील. तशाच चिरकालिक लाभांच्या मालिकेंत शोभण्यासारखें शब्द-शिल्प, प्रस्तुत पुस्तकाचें रूपानें, प्रगट होत आहे, याचें मला समाधान वाटतें.

२. महर्षि दादाभाईपासून महात्मा गांधीजीपर्यंत सर्व धर्मांतील,सर्व वर्गांतील व सर्व राज्यांतील थोरथोर पुढाऱ्यांनीं काँग्रेस ही संस्था अत्यंत व्यापक व बलिष्ठ बनविली आणि त्यामुळें ती भारताच्या राजकीय स्वातंत्र्याचें साधन ठरली. भारताचें राजकीय, आर्थिक, सामाजिक व नैतिक असें चतुर्विध स्वातंत्र्य सिद्ध करण्याचें व्रतच तिनें घेतलें आहे. ती बहुजनसमाजाच्या आशा-आकांक्षा व्यक्त करते व पूर्ण पण करते. आजहि काँग्रेस ही गोरगरिबांची माय-माउली आहे—दीन-दलितांची साउली आहे. मला तर वाटतें, 'काँग्रेस' या शब्दांत गीतेचें प्रामाण्य भरलेलें आहे—गंगेचें पावित्र्य सांठविलेलें आहे. तिच्या 'तिरंगी निशाणाखालीं शेंकडों भारतीयांनीं आपल्या जिवाची कुरवंडी केली, हजारों लोकांनीं लाठ्या फुलासारख्या झेलल्या आणि लाखों स्त्री-पुरुषांनीं असीम त्याग करून पुनः पुनः तुरुंगवास सोसले—त्या सर्वांच्या संचित पुण्याईनें आपली मातृभूमि स्वतंत्र झाली व कोट्यवधि जनता गुलामगिरींतून मुक्त झाली. असंख्य मूक जनांचा उद्धार व विकास करणाऱ्या अशा काँग्रेस-संस्थेचा, गेल्या चाळीस वर्षांचा इतिहास, प्रस्तुत पुस्तकांत संक्षिप्त पण साधार येऊन गेलेला आहे. इतक्या संक्षेपानें दुसऱ्या कोणत्याहि भाषेमध्यें लिहिलेला काँग्रेसचा इतिहास माझ्या तरी पाहण्यांत आलेला नाहीं.

३. या इतिहासांत नागपूरच्या कार्याला प्रधान स्थान लाभावें हें साहजिकच आहे. सन १८९१ सालीं नागपूर येथें काँग्रेसचें प्रथम अवतरण झालें. त्या अधिवेशनाचें आणि त्या काळाचें स्मरण व्हावें, इतकी माहिती आरंभीं दिलेली आहे. परंतु 'नागपूर काँग्रेस' हे शब्द उच्चारतांच कोणालाहि आठवण होते, ती सन १९२० सालच्या अधिवेशनाची !

४. त्या अधिवेशनाचें शब्दचित्र या छोट्याशा पुस्तकांत इतकें विस्तृत व यथार्थ आलेलें आहे कीं, तें वाचतांना जुन्या कार्यकर्त्यांच्या डोळ्यांपुढें तेव्हांचा देखावा जशाचा तसा उभा राहील आणि नव्या कार्यकर्त्यांना, त्या काळीं काँग्रेसच्या घटनेंत, कार्यक्रमांत व तत्त्वप्रणालींत किती क्रांतिकारक बदल झाला, हें स्पष्टपणें कळून येईल. ते महात्माजी व ते लालाजी, ते मालवीयजी व ते मोतीलालजी, ते दासबाबू व ते पालबाबू—आणि त्या सर्व महान् नेत्यांची ती तळमळ, ते वादविवाद आणि ती कार्यप्रवणता, त्यांचे त्याग, कष्ट, चातुर्य, ध्येयवादित्व, सहिष्णुता—इत्यादि साऱ्या गुणांची नक्षत्रमालाच नव्या पिढीपुढें चमकूं लागेल व यापुढील काळांत ती मार्गदर्शक ठरेल, अशी मला आशा वाटते.

५. नागपूर शहरीं भरलेल्या दोन अधिवेशनांशिवाय, सन १९२० नंतरच्या अधिवेशनांची माहिती या पुस्तकांत त्रोटकपणें दिलेली आहे आणि त्यांतील महत्त्वाच्या अधिवेशनांनीं काँग्रेसला लावलेली नवी दिशा कोणती हेंहि दाखविलेलें आहे. सन १९४७ नंतरचा स्वातंत्र्यकालीन काँग्रेसचा इतिहास ताजा असल्यानें त्याचा केवळ उल्लेखच आलेला आहे. तथापि, गेल्या चाळीस वर्षांतील काँग्रेसच्या आयुष्यांतील-आणि त्यांतहि नागपूरच्या जीवनांतील—महत्त्वाच्या राजकीय घडामोडी व चळवळी यांचें भरपूर वर्णन व समालोचन यांत आलेलें आहे आणि तें सर्व काँग्रेस-जनांना व इतरांनाहि सदैव वाचनीय वाटेल.

६. या पुस्तकाचें लेखन करण्यास पुण्याचे श्री. दा. न. शिखरे लाभले, हा मी एक सुयोगच समजतें. लो. टिळक, म. गांधी, पं. नेहरू प्रभृति काँग्रेस-नेत्यांचे त्यांनीं लिहिलेले चरित्रग्रंथ सुप्रसिद्धच आहेत. शिवाय गेलीं तीस वर्षें वृत्तपत्राच्या क्षेत्रांत ते काँग्रेसची सेवा करीत

आलेले आहेत आणि गेलीं बारा वर्षे 'महात्मा' हें मासिक विशिष्ट ध्येयानें चालवीत आहेत. अशा काँग्रेसनिष्ठ व सिद्धहस्त लेखकानें हें पुस्तक लिहून देण्याचें मान्य केलें व तें कार्य वेळेवर पार पाडलें, याबद्दल मी त्यांचे आभार मानतें.


७. हें पुस्तक इतिहासवजा असलें तरी लेखनाच्या ओघांत क्वचित् कोठें ओझरतें मत प्रदर्शन झालेलें आहे. तें मत लेखकाचेंच आहे, त्याची जबाबदारी स्वागत-समितीवर नाहीं हें उघड आहे. पुस्तकांत आला, त्याहून न आला असाच मजकूर अधिक आहे. पण पृष्ठ-संख्येची मर्यादा लक्षांत घेतां, श्री. शिखरे यांनीं योग्य तो मजकूर, योग्य त्या प्रमाणांत, योग्य रीतीनें दिला आहे, असें माझें मत झालें आहे, आणि प्रत्येक वाचकाचेंहि तसेंच होईल असें मला वाटतें.

'अभ्यंकर-नगर'
नागपूर
ता. १० डिसेंबर १९५९

गोपिकाताई कन्नमवार

• • •

१९२०








श्री. विजयराघवाचार्य


श्री. जमनालाल बजाज




श्री. ढेबर



सौ. गोपिकाताई कन्नमवार



पं. नेहरू




डॉ. राजेंद्रप्रसाद

भारताच्या स्वातंत्र्याप्रीत्यर्थच नव्हे तर,
अखिल जगताच्या शांततापूर्ण जीवनासाठीं
व समृद्धिपूर्ण विकासासाठीं,

अनत्याचारी असहकारितेचा

दिव्य मंत्र, नागपूर येथें १९२० सालीं भरलेल्या
काँग्रेसमध्यें ज्यांनीं घोषित केला आणि
तेव्हांपासून राष्ट्रानें ज्यांचें सत्यनिष्ठ व
अहिंसामय नेतृत्व मान्य केलें, ते



महात्मा गांधी

यांचे पुण्य पावन स्मृतीस, नागपूर येथें पुन:
१९५९ सालीं भरणाऱ्या काँग्रेसचे निमित्तानें,
हें समालोचनाचें अल्पसें पुस्तक-पुष्प
आदरभावानें व कृतज्ञबुद्धीनें

समर्पण

सुवर्णोत्सवाचा शिलालेख

मुंबई येथें कॉंग्रेसचें प्रथम अधिवेशन जेथें भरलें, त्या जन्म-स्थानीं, तिच्या सुवर्ण-महोत्सव-कालीं, १९३५ सालीं, एक शिला-लेख बसविण्यांत आला. त्यावरील इंग्रजी मजकूर आधीं देऊन श्री. व्यंकटेश वकील यांनीं केलेला त्याचा मराठी पद्यात्मक अनुवाद पुढें दिला आहे.

In this Historic Hall
On the 28th December 1885
A band of gallant Patriots laid the foundation of
The Indian National congress, which during these fifty years
has been built up, stone by stone, tier by tier.
By the faith and devotion, courage and sacrifice
of countless men and women, as the pledge and symbol
of their principle purpose to secure to India
Their motherland her legitimate birth-right of Swaraj.
This tablet is placed to commemorate the occasion of its
Golden Jubilee.
28th December 1935.

येथें या भवनीं सुमंगल घडे राष्ट्रेतिहासांतलें
येथें शूर स्वदेश-भक्त जमले देशैक्य-भावें तदा
राष्ट्र-ज्योति-विकासिनी भगवती कॉंग्रेस संस्थापिली
दे अत्यद्भुत धैर्य, त्याग, शुचिता, अद्वैत, श्रद्धाबल.
" माझा भारत मी स्वतंत्र करतों " केली प्रतिज्ञा नवी–
' माझा तो जन्मसिद्ध हक्क! मजला कोणी न रोधूं शके.'
आतां राष्ट्रसभा प्रचंड बनली स्वातंत्र्य-संजीवनी
आतां जाहलीं त्या सुमंगल दिना पन्नास संवत्सरें.

नागपूर ते नागपूर
काँग्रेसच्या अधिवेशनाचा आलेख

सन	स्थळ	अध्यक्ष
१९२०	नागपूर	विजयराघवाचार्य
१९२१	अहमदाबाद	दास (तुरुंगांत म्हणून हकीम अजमलखान)
१९२२	गया	चित्तरंजन दास
१९२३	कोकोनाडा	मौ. महंमदअल्ली
१९२४	बेळगांव	म. गांधी
१९२५	कानपूर	सौ. सरोजिनी नायडू
१९२६	गौहत्ती	श्रीनिवास अयंगार
१९२७	मद्रास	डॉ. अन्सारी
१९२८	कलकत्ता	पं. मोतीलाल नेहरू
१९२९	लाहोर	पं. जवाहरलाल नेहरू
१९३१	कराची	सरदार वल्लभभाई पटेल
१९३४	मुंबई	डॉ. राजेंद्रप्रसाद
१९३६	लखनौ	पं. जवाहरलाल नेहरू
१९३६	फैजपूर	पं. जवाहरलाल नेहरू
१९३८	हरिपुरा	सुभाषचंद्र बोस
१९३९	त्रिपुरी	सुभाषचंद्र बोस
१९४०	रामगड	मौ. आझाद
१९४६	मीरत	आचार्य कृपलानी
१९४८	जयपूर	डॉ. पट्टाभिसीतारामय्या
१९५०	नाशिक	पं. पुरुषोत्तमदास तंडन
१९५१	दिल्ली	पं. जवाहरलाल नेहरू
१९५३	हैद्राबाद	पं. जवाहरलाल नेहरू
१९५४	कल्याणी	पं. जवाहरलाल नेहरू
१९५५	आवडी	उत्संगराय ढेबर
१९५६	अमृतसर	उत्संगराय ढेबर
१९५७	इंदूर	उत्संगराय ढेबर
१९५८	प्राग्ज्योतिषपूर	उत्संगराय ढेबर
१९५९	नागपूर	उत्संगराय ढेबर

अनुक्रम

१. प्रगतीचीं पांच पर्वें - - - - - - १
२. नागपूरचें पहिलें अधिवेशन - - - - - - ८
३. असहकारितेचें बीजारोपण - - - - - - १४
४. क्रांतिकारक अधिवेशन - - - - - - १७
५. गांधीयुगीन कॉंग्रेस - - - - - - ६१
६. समाजवादाची दीक्षा - - - - - - ७५
७. स्वातंत्र्यकालीन कार्य - - - - - - ११०
८. पुनः नागपूर - - - - - - ११४

• • •

१ प्रगतीचीं पांच पर्वें

“ प्रथम प्रथम भावल्यांच्या खेळासारखा या सभांचा खेळ होईल; पण तसा झाल्याखेरीज पार्लमेंटचें स्वरूप त्यास कधींच येणार नाहीं. ”

केसरी (ता. ८ डिसेंबर १८८५)

नागपूर नगरी भाग्यवान खरी ! राष्ट्राच्या इतिहासांतील ऐन महत्त्वाच्या क्षणीं, राष्ट्रीय सभेचें आधिवेशन भरविण्याचें भाग्य, तिला लाभलेलें आहे. या वर्षी तेथें भरणारें काँग्रेसचें अधिवेशन हें तिसरें होय. अगदीं प्रथम १८९१ सालीं नागपूर शहराला काँग्रेस भरविण्याची संधि लाभली होती. त्यानंतर १९२० सालीं नागपूर येथें जी काँग्रेस भरली, तिला तर ‘ भारताची थर्मापिली ’ म्हणून गौरविण्यांत येतें. त्या अधिवेशनापासून राष्ट्रसभेंत—आणि एकूण राष्ट्रचर्येंत-आमूलाग्र क्रांति झाली. आतां तिसऱ्यांदा नागपूर येथें जें हें अधिवेशन भरत आहे; तेंहि राष्ट्रीय विकासाच्या एका महत्त्वपूर्ण स्थित्यंतराचे वेळीं.

आदिपर्व

अशीं स्थित्यंतरें, काँग्रेसच्या ७५ वर्षांच्या आयुष्यांत ५ वेळां तरी घडून आलीं. परतंत्र हिंदुस्थानाच्या अंतःकरणांत गुप्तपणें जळत असणाऱ्या असंतोषाला वाट करून देण्याचें एक ‘ द्वार ’ (safety-valve) म्हणून

काँग्रेसची स्थापना १८८५ सालीं मुंबईस झाली. तिला ७२ प्रतिनिधि उपस्थित होते. तिचें जनकत्व मि. ह्यूम या सेवानिवृत्त आय्. सी. एस्. कडे होतें. एवढेंच नव्हे तर, तेव्हांचे गव्हर्नर–जनरल लॉर्ड डफरिन यांचेंहि मार्गदर्शन काँग्रेसच्या स्थापनेला लाभलेलें होतें. केवळ सामाजिक विषयाचीच चर्चा करण्यासाठीं ही राष्ट्रसभा अस्तित्वांत यावी अशी ह्यूमप्रभृतींची इच्छा, पण ती देशांतील राजकीय विचारांचें मुख बनावी असा सल्ला देऊन, डफरिन यांनीं तिचा सारा पिंडच बदलून टाकला. ‘ भारतीय पार्लमेंटचें बीज ’ असें स्वरूप तिला येत गेलें. दुसरें अधिवेशन कलकत्त्यास भरलें असतां, त्याच्या प्रतिनिधींना लॉर्ड डफरिन यांनीं आपल्या राजभवनांत थाटाचा उद्यानोपाहार दिला.

अशा प्रकारें गव्हर्नर जनरलचा वरदहस्तच जिला जन्मकाळीं लाभला, तिला प्रांतोप्रांतींच्या गव्हर्नरांचे आशीर्वाद मिळावेत यांत नवल काय ? तिसऱ्या अधिवेशनाच्या प्रतिनिधींचा सत्कार मद्रास गव्हर्नरानें केला. पहिलीं तीनहि अधिवेशनें गव्हर्नरांच्या कृपाछत्राखालींच—त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितींतच–भरलीं. तेव्हां काँग्रेसचा पहिला ठराव राजनिष्ठेचाच असावयाचा. महर्षि दादाभाई नौरोजी यांनींहि १८८६ सालीं कलकत्ता काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून असेंच घोषित केलें कीं, “राजनिष्ठा आमच्या हाडीमासीं खिळलेली आहे.” (We are loyal to the backbone) यानंतर काँग्रेसचें तेज वाढत गेलें. अरुणोदयाचे वेळीं, सूर्याचें लाल बालबिंब पाहण्यांत ज्यांना आनंद वाटतो, त्यांना तोच सूर्य आकाशांत वरवर येऊं लागला व प्रखर प्रकाश पसरूं लागला, म्हणजे मग त्याचेकडे डोळे वर करून पाहण्याची छाती होत नाहीं, उलट त्याचा ताप कसा निवारावा याचीच चिंता पडते. तसेंच सरकारचें झालें. तें काँग्रेसला विरोधूं लागलें.

१८८७ सालीं मद्रास येथें काँग्रेसचें अधिवेशन भरलें असतांना एक सरकारी अधिकारी त्याला हजर राहिले, म्हणून सरकारनें त्यांचेकडून २० हजार रुपयांचा जामीन घेतला. १८९० सालीं हिंदुस्थान सरकारनें आपल्या सेवकांना, काँग्रेसला प्रेक्षक म्हणूनहि उपस्थित राहण्यास बंदी केली. बंगालच्या गव्हर्नरला पाठविलेल्या सात निमंत्रण-पत्रिका त्याच्या चिटणिसानें तशाच परत पाठवून दिल्या. आणि १८९१ सालीं तर हिंदुस्थान सरकारनें एक

पत्रक काढून हिंदी संस्थानांतहि आपलें हें विरोधी धोरण शिरकविलें. त्या वर्षी नागपूर येथें भरलेल्या काँग्रेसनें या सरकारी धोरणाचा निषेध केला. ना. गोखले यांजसारख्या मृदु मनाच्या मुत्सद्द्यानेंहि ज्याला औरंगजेबाची उपमा दिली, त्या व्हाइसरॉय लॉर्ड कर्झननें १९०० सालीं भारत-मंत्र्याला आपली अशी वासना कळविली कीं, " काँग्रेसला आतां घरघर लागलीच आहे, तिचें निवांत थडगें बांधण्याची माझी मोठी महत्त्वाकांक्षा आहे."

(The Congress is tottering to its fall and one of my great ambitions, while in India, is to assist it to a peaceful demise).

सभापर्व

सरकारचा कल पाहून बोलणारे व त्यांच्या भलेपणावर विश्वास ठेवून चालणारे नेमस्त पुढारी हे काँग्रेसचें नेतृत्व १९०५ सालापर्यंत बिनखटका चालवीत होते. परंतु लॉर्ड कर्झन यांनीं केलेल्या वंग–भंगामुळें, नेमस्तांच्या निष्कंटक नेतृत्वाला तडा गेला. वंगभंगाच्या क्षोभांतून लढाऊ, तेजस्वी व प्रतिकारशाली असा 'राष्ट्रीय पक्ष' जन्मास आला. सरकारच्या चरणापेक्षां जनतेच्या मनगटावर त्याची भिस्त अधिक. १९०७ सालच्या काँग्रेसचे अध्यक्ष कोणी व्हावें हा या दोन पक्षांतील वादाचा मोठा मुद्दा होता. नागपूरच्या नेमस्त नेत्यांनीं आपल्या शहरीं काँग्रेसचें अधिवेशन भरविण्याचें निमंत्रण दिलें. स्वागत-समितिहि स्थापन झाली. पण तींत बहुसंख्य असलेल्या राष्ट्रीय पक्षांतील तरुणवर्गाला लो. टिळकच अध्यक्ष हवे होते. म्हणून त्या सालचें अधिवेशन नेमस्तांनीं नागपूरहून सुरतेस नेलें. परंतु या स्थलांतरानें काँग्रेसमधील दुही मिटली नाहीं. उलट ती सुरत येथें उग्र व उत्कट स्वरूपांत प्रगट झाली आणि त्यामुळें काँग्रेसचीं शकलें उडालीं.

१९०८ सालीं नागपूरच्या तरुण राष्ट्रीय पक्षानें आपल्या गांवीं काँग्रेस भरविण्यासाठीं पुनः कंबर बांधली. त्याप्रमाणें अधिवेशनाच्या कामास प्रारंभहि झाला. पण या खेपेस त्याला खो देण्याचें पाप ब्रिटिश सरकारनें केलें. डिसेंबरच्या मध्यास, सरकारनें अकस्मात् १४४ वें कलम पुकारून, तेथें काँग्रेस भरविण्यास बंदी केली. सुरतेपासून नेमस्त नेते काँग्रेस न भरवितां आपली एक परिषदच भरवूं लागले. पण ती केवळ 'मवाळांची मजलस'

ठरली. राष्ट्रीय पक्ष किंवा सर्वसामान्य जनता यांचा पाठिंबा तिला मिळेनासा झाला.

विराटपर्व

काँग्रेसला लोकाभिमुख व सामर्थ्यसंपन्न करणारा नेता तेव्हां कोण होता? जो होता तो दूर मंडालेच्या तुरुंगांत, सहा वर्षें कोंडला गेला होता. तो १९१४ सालीं बंधमुक्त होऊन परत आल्यानंतर, सर्व राष्ट्रांत नवे विचार, नवें चैतन्य, नवें वारें संचरूं लागलें. त्याचें फल म्हणजे १९१६ सालीं लखनौ येथें भरलेली काँग्रेस. तेथें सुरतेची दुही मिटली आणि प्रागतिक व राष्ट्रीय या दोन्ही पक्षांची एकी झाली. तेथपासूनचा चार वर्षांचा काळ म्हणजे लो. टिळकांच्या काँग्रेसवरील अधिराज्याचाच काल.

मंडालेच्या बंदिवासांतून लो. टिळक बंधमुक्त होऊन आल्यामुळें सर्व राष्ट्राला नवाच जोम आल्यासारखें वाटलें. त्याप्रमाणें नागपूर येथील राष्ट्रीय पक्षालाहि नवा उत्साह चढला. त्यांनीं आपल्या येथें काँग्रेस बोलावण्याचा विचार १९१६ पासून चालविला. परंतु लो. टिळक १९१८ सालीं इंग्लंडला गेले. तेथून ते १९१९ सालीं परत येतांच त्यांचा आशीर्वाद घेऊन नागपूरकर मंडळींनीं आपल्या प्रांतांत काँग्रेस भरविण्याचें निश्चित केलें आणि त्याप्रमाणें अमृतसरच्या काँग्रेसमध्यें निमंत्रणहि दिलें.

हा निश्चय करण्यापूर्वी व निमंत्रण देण्यापूर्वी मध्यप्रदेशांतील हिंदी व मराठी भाषिक भागांतील पुढाऱ्यांची संमति घेण्यांत आली होती. पण प्रत्यक्ष काँग्रेस भरविण्याचा मान जसजसा डोळ्यांपुढें दिसूं लागला, तसतसा मराठी-भाषिक व हिंदी-भाषिक यांच्यामध्यें मतभेद सुरू झाला, वाद माजला व अखेर तंटाहि झाला. काँग्रेसचें अधिवेशन नागपूर येथें भरवावें कीं जबलपूर येथें? या प्रथम प्रश्नानेंच मक्षिकापात केला. या प्रारंभींच्या साध्या प्रश्नानें तयारीचें अर्धें वर्ष खाऊन टाकलें. निर्णय म्हणून कांहीं होईना. उभय भाषांचे कट्टे अभिमानी अधिवेशनाला आपापल्याकडे ओढूं लागले. ही ओढाताण थांबविण्यासाठीं 'अखिल भारतीय काँग्रेस कमिटीला' मध्यें पडावें लागलें. तिनें असा निर्णय दिला कीं, अधिवेशन नागपूरलाच भरवावें.

हा आपला जय झाला असें वाटून मराठी–भाषिकांना जसें कार्याचें स्फुरण चढलें, तसेंच हा आपला मनोभंग झाला असें वाटून हिंदी-भाषिक काँग्रेसपासून दूर राहिले. स्वागत-समितीच्या निधीला ते फारशी मदत करीनासे झाले. म्हणून स्वागत-समितीच्या कांहीं कार्यकर्त्यांनीं स्वतः १०००। ५०० रुपये कर्जाऊ देऊन १०,००० रुपयांचा निधि प्रारंभीं जमविला. त्यानंतर जुलै महिन्यापासून काँग्रेसच्या तयारीस जोरानें प्रारंभ झाला. वरुण राजाच्या विघ्नाला न जुमानतां ही तयारी जोरांत चालू होती. परंतु सर्व कार्यकर्त्यांचा उत्साह नष्ट करणारी एक महान् आपत्ति पुढील महिन्यांतच या राष्ट्रावर आली. ती म्हणजे लो. टिळकांचें निधन.

या दैवी आपत्तीनें नागपूरमधील काँग्रेस कार्यकर्ते हतबुद्धच झाले. परंतु त्या देवमान्य झालेल्या लोकमान्यांचा कर्मयोगी आदर्श आपल्या डोळ्यांपुढें ठेवून, अपराजित हृदयानें, ते द्विगुणित उत्साहानें कार्यास लागले. सुदैव असें कीं, प्रारंभींचा वाद विसरून हिंदी-भाषिक व मराठी-भाषिक हे दोन्ही विभाग हातांत हात घालून काम करूं लागले. आणि त्यांच्या पाठीशीं येऊन उभा राहिला, समृद्ध व समर्थ असा विदर्भ !

उद्योगपर्व

गव्हर्नरांच्या कृपाछत्राखालील तीन वर्षांचा पहिला टप्पा, नेमस्तांच्या नेतृत्वाखालील वीस वर्षांचा दुसरा टप्पा, १९०८ ते १९१४ या सुषुप्तावस्थेचा सहा वर्षांचा तिसरा टप्पा, आणि लोकमान्यांच्या गुरुत्वाचा चार वर्षांचा चौथा टप्पा—अशा अवस्थांतून मार्ग आक्रमीत आलेली काँग्रेस १९२० सालापासून म. गांधींच्या मुठींत जाऊन बसली. या पांचव्या टप्प्याचा प्रारंभ म्हणजे १९२० सालची नागपूर काँग्रेस. तेथपासून १९४२ सालापर्यंत सतत बावीस वर्षें गांधीजींचेंच एकछत्री साम्राज्य काँग्रेसमध्यें चालू होतें. त्यामध्यें १९३६ सालापासून पं. जवाहरलाल नेहरू यांच्या प्रेरणेनें व प्रयत्नानें समाजवादाचा नवा मार्ग आंखला जात असला, तरी काँग्रेसचीं सर्व सूत्रें गांधीजींच्या हातीं होतीं. तेच तिचे निर्माते, नियंते व नेते होते. ‘ गांधीजी म्हणजे काँग्रेस व काँग्रेस म्हणजे गांधीजी ’ असें समीकरणच ठरून गेलें.

गांधीजींच्या सत्याग्रह—मंत्राप्रमाणें वागून काँग्रेसनें आपलें स्वराज्याचें ध्येय १९४७ सालीं प्राप्त करून घेतलें. तपाची सांगता झाली——तपस्वी राष्ट्राला सिद्धि प्राप्त झाली—युयुत्सु काँग्रेस सत्ताधारी बनली. स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या १० वर्षांतील काँग्रेसचें ध्येय व मार्ग पूर्वकालापेक्षां भिन्न झालें. १९५१ सालच्या आवडी येथील काँग्रेसनें 'समाजवादी पद्धतीचें राज्यशासन' निर्माण करण्याचें ध्येय राष्ट्रापुढें ठेवलें. काँग्रेसच्या जीवनांतील हा सहावा टप्पा अभिनव स्वरूपाचा होता. आतां यावर्षी नागपूर येथें भरणाऱ्या काँग्रेसच्या शिरावर सातव्या टप्प्याचें उद्‌घाटन करण्याची जबाबदारी आहे. शेतीचा प्रश्न सोडवून व पंचवार्षिक योजना सफल करून भारताला आर्थिक स्वातंत्र्य मिळवून देण्याचें कार्य तिला करावयाचें आहे.

आपल्या साठ हजार पितरांचा उद्धार करण्यासाठीं भगीरथानें स्वर्गांतून पृथ्वीवर गंगेचा लोट आणला. विष्णूला विनवीत, शंकराला शमवीत, जन्हुराजाचे आर्जव करीत आणि त्याचबरोबर पहाड फोडीत, दऱ्या ओलांडीत, तट बांधीत, गंगेचा पापताप-हारक प्रवाह या पृथ्वीतलावर भगीरथानें आणून सोडला; तसे प्रार्थनेचे, आर्जवाचे, युक्तिवादाचे आणि त्याबरोबरच लोकजागृतीचे, जागृत लोकांच्या संघटनेचे आणि त्या संघटित लोकांच्या शौर्याचे नाना उपाय योजून स्वदेशाला स्वराज्य मिळवून देण्याचे अनेकानेक प्रयत्न काँग्रेसनें आजवर केले आणि त्या सर्वांचें यश स्वराज्याचे रूपानें तिला प्राप्तहि झालें. पण आतां स्वराज्याचें सुराज्य करण्याची जबाबदारी सर्व राष्ट्रावर——विशेषतः राष्ट्रसभेवर–येऊन पडलेली आहे. स्वतंत्र राष्ट्राला समृद्ध व संपन्न कसें करतां येईल हाच आतां काँग्रेस-नेत्यापुढें प्रश्न आहे. आपल्या राष्ट्राला एक राजकीय स्वातंत्र्य मिळालें, परंतु आर्थिक, सामाजिक व नैतिक अशीं तीन स्वातंत्र्यें अद्याप प्राप्त करून घ्यावयाचीं आहेत. त्याविना भारताचा सर्वांगीण विकास होणें अशक्य. तो विकास कोणत्या मार्गानें घडवून आणावा ही महान् समस्या आज भारतापुढें खडी आहे.

अनुशासनपर्व

आज सर्व जगांत दोन विचार–प्रवाह प्रबल व प्रभावी असलेले दिसून येतात. एक इंग्लंड–अमेरिकेचा लोकशाहीप्रधान व दुसरा रशियांतील

साम्यवादाचा. पहिल्या प्रवाहांत सहिष्णुता, बुद्धिवाद व व्यक्तिस्वातंत्र्य या मानवी मूल्यांना महत्त्व दिलेलें आहे; पण वर्गावर्गांतील—किंबहुना मानवा-मानवांतील—समता तेथें निर्माण झालेली नाहीं. गरीब–श्रीमंत या वर्ग-भेदाप्रमाणेंच काळा–गोरा असा वंशभेदहि तेथें जारी आहे. उलट साम्य-वादी रशियांत वर्ग नाहीं कीं पक्ष नाहीं. ‘कामगारांची लोकशाही’ आहे असा पुकारा केला जातो. पण तेथें व्यक्ति-स्वातंत्र्य, सहिष्णुता व बुद्धिवाद यांना अजिबात थारा नाहीं. मानवतेचा आत्माच गमावून रशिया आपली भौतिक प्रगति साधीत आहे. त्याची सुबत्ता व संरक्षणशक्ति जगाला चकित करण्याइतकी वाढली आहे. पण त्याची किंमत म्हणून किती जणांची प्राणहानि व आत्महानि त्यानें केली आहे याची कल्पनाच करवत नाहीं.

म्हणून हे दोन्ही मार्ग टाळून, स्वतंत्र भारताला आपला पुढील मार्ग स्वतंत्रपणें आंखावयाचा आहे. त्याला समतापूर्ण पण हिंसाशून्य अशी लोक-शाही दृढमूल करावयाची आहे. अहिंसक, शोषणशून्य, भेदभावरहित व समताधिष्ठित असें कल्याणकारी राज्य स्वतंत्र भारताला हवें आहे. गांधीजींचें ‘रामराज्य’ तें हेंच !—आणि विनोबांचा ‘सर्वोदय समाज’ तो हाच ! तो निर्माण कसा करावा ह्याचें विधिविधानाहि या दोघां द्रष्ट्यांनीं सांगून ठेवलेलें आहे. नेत्यांची शक्ति व प्राप्त परिस्थिति—यांचा मेळ घालून भारत आपला विकास स्वतंत्र मार्गानें करून घेऊन सर्व जगापुढें नवा आदर्श ठेवीत आहे.

• • •

२ नागपूरचें पहिलें अधिवेशन

नागपूर येथें काँग्रेसचें अधिवेशन प्रथम भरलें १८९१ सालीं. तें सातवें अधिवेशन. त्यामानानें त्याचा विस्तार व वैभव. त्या काळाला शोभेसाच त्याचा आकार व आशय होता. १८० × १२० फूट लांबी-रुंदीच्या मंडपांत हें अधिवेशन भरलें होतें. रेल्वे-स्टेशनाजवळील 'लालबागेंत' हा मंडप उभारलेला होता. मंडप छोटाच, पण सुंदर होता. त्यांत चार हजार खुर्च्या मांडलेल्या होत्या. त्या सर्व भरून गेल्या. मुंबई-कलकत्त्याएवढें नागपूर हें शहर मोठें नसलें, तरी तेथल्याइतकीच प्रेक्षकांची गर्दी झाली होती.

ता. २८ डिसेंबर रोजीं अधिवेशनास प्रारंभ झाला. नागपूरच्या नगरपालिकेचे अध्यक्ष बॅ. सी. नारायणस्वामी नायडू हे स्वागताध्यक्ष होते. त्यांनीं त्या काळास अनुसरून ब्रिटिश बादशहाविषयीं राजनिष्ठा, ब्रिटिश जनतेविषयीं प्रेम आणि ब्रिटिश सरकारच्या सद्हेतूबद्दल विश्वास—यांची नांदी म्हटली व आपलें भाषण सुरू केलें. "ब्रिटिशांचें राज्य हें ईश्वराचें वरदान आहे." अशी पुष्पांजलि त्यांनीं वाहिली, आणि भरतवाक्यांत अशी प्रार्थना केली कीं, "सरकारनें आपल्या राज्यकारभारांत सुधारणा कराव्यात, त्यासाठीं आम्ही राजनिष्ठेनें व सनदशीरपणें प्रयत्न करूं."

त्याच वर्षीच्या जानेवारी महिन्यांत व्हाइसरॉयनें मोठ्या औदार्यानें असें जाहीर केलें होतें कीं, "कॉंग्रेस ही कायदेशीर संस्था आहे. तेव्हां तिच्या वाटेंत सरकारी नोकरांनीं अडथळे आणूं नयेत. मात्र त्यांनीं कॉंग्रेसमध्यें भाग घेऊं नये. पण बाकीच्या लोकांना भाग घेण्यास मोकळीक आहे." एवढ्याशा सवलतीनें तेव्हांचे कॉंग्रेसचे पुढारी किती आनंदित झाले होते ! तो काळच तसा होता ! अधिवेशनाच्या कामकाजास सुरुवात करण्यापूर्वी, इंग्लंडचे प्रधान ग्लॅडस्टन यांना ८२ वर्षें पूर्ण झालीं म्हणून, तीनदां टाळ्या वाजवून आनंदाचा गजर करण्यांत आला. आणि अधिवेशनाच्या अंतीं इंग्लंडच्या राणीच्या नांवानें पुनः तीनदां टाळ्यांचा गजर करण्यांत आला. प्रवेशद्वाराचे आंतले बाजूस 'ईश्वर महाराज्ञीस चिरायु करो' अशीं सुवर्णाक्षरें चमकत होतीं.

अध्यक्षस्थानीं मद्रास हायकोर्टाचे एक वकील रायबहादूर आनंद-चार्लू हे होते. कॉंग्रेसच्या स्थापनेपासून ते तिच्या कार्यांत भाग घेत होते. त्यांच्याहि भाषणाचा सूर असाच राजनिष्ठेचा व आर्जवाचा.

तो काळ किती पारतंत्र्याचा होता--आणि त्यामुळें किती भय, किती नम्रता, किती सावधानता, पुढाऱ्यांनाहि बाळगावी लागत होती, याचें स्वच्छ प्रतिबिंब अध्यक्षाच्या भाषणांत दिसून येतें. कॉंग्रेसचे जनक मि. ह्यूम यांचा प्रारंभींच निर्देश करून ते म्हणाले, "या देशाची भक्ति व कृतज्ञता ह्यूम यांनीं आपल्या अखंड श्रमानें व त्यागानें संपादन केली आहे, एवढेंच नव्हे तर, आपल्या पुत्रपौत्रांनाहि त्यांनीं निरंतरचे ऋणी करून ठेवलें आहे."

मि. ह्यूम हे हिंदुस्थानांत ४३ वर्षें होते. ते आय्. सी. एस्. अधिकारीहि झाले होते. १८५७ च्या धामधुमीच्या झळा त्यांना चांगल्याच पोंचल्या होत्या, आणि त्यांना पुनः तसा उत्पात होण्याचा धोका वाटत होता. या पहिल्या नागपूर कॉंग्रेसच्या सुमारासच त्यांना असें वाटत होतें, "हिंदुस्थानांत शेतकऱ्यांचें बंड पेटण्याचा दाट संभव आहे. कारण गरिबी ही अराजकाची जननी होय. ती गरिबी दिवसेंदिवस वाढत आहे आणि हिंदी प्रजेची पायमल्ली करीत आहे. उपासमार, अन्याय व निराशा हे तीन एकत्र झाले म्हणजे लोकक्षोभाचा केवढा भडका उडेल हें सांगणें कठीण. हिंदी प्रजा राजनिष्ठ आहे--सोशिक आहे, हें सारें खरें; पण तशी फ्रेंच प्रजाहि

होतीच. परंतु, क्रांतीचा क्षण येतांच, ज्या शेळ्या असतात, त्याच लांडगे बनतात. तसें हिंदुस्थानांत होईल. बंडखोर प्रजाजन रूळ उखडतील, तारा तोडतील, पूल उडवतील, सारी वाहतूक बंद पाडतील आणि आपली सारी राज्यव्यवस्था धुळीस मिळवितील. म्हणून हिंदुस्थानाला वेळींच शांत करा--त्याचेवरील अन्याय दूर करा—त्यांचें दारिद्र्य नाहींसें करा. ''

असे सत्य, स्पष्ट व सडेतोड विचार ह्यूम ह्यांनीं पुढें एका पत्रकांत मांडले. तें कळतांच साम्राज्यांध ब्रिटिश मुत्सद्दी खवळले. '' ह्यूम ह्यांना देशद्रोही म्हणून फांसावर लटकविलें पाहिजे किंवा गोळी घालून ठार केलें पाहिजे. '' असे उद्गार कॉमन्स सभेंत काढण्यापर्यंत एका सभासदाची मजल गेली. उलट, जाणत्या हिंदी लोकांना ह्यूम हे आपले वाली आहेत, कैवारी आहेत, मित्र–तत्त्वज्ञ–गुरु आहेत असेंच वाटत होतें. त्या मताचें प्रतिबिंब मि. चार्लू यांच्या भाषणांत उमटलें आहे. ह्यूम ह्यांनींच काँग्रेसचें सरचिटणीस राहावें असा आग्रहहि त्यांनीं केला.

त्या वेळच्या अध्यक्षाला हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे, हें युक्तिवादानें सिद्ध करण्याची आवश्यकता वाटली. '' हिंदी प्रजा एका देशांत राहणारी आहे, एका राजसत्तेखालीं नांदणारी आहे, एक वरिष्ठ कायदेमंडळ मानणारी आहे, एका सत्तेच्या नियमाप्रमाणें कर देणारी आहे, एकाच शासनव्यवस्थेखालीं सुखदुःखें भोगीत आहे आणि एकच ध्येय साध्य करण्यासाठीं एकाच भावनेनें भारलेली आहे, म्हणून आम्ही एक राष्ट्र आहों. '' असें चार्लू यांनीं जीव तोडून सांगितलें.

ते पुढें म्हणाले, '' एक भाषा व एक धर्म, सहभोजन व सहविवाह, अशा कांहीं गोष्टी राष्ट्रैक्याला पोषक असतात हें खरें, पण त्या कांहीं प्राणभूत नव्हेत. भावनात्मक ऐक्य हेंच महत्त्वाचें असतें. तें गेल्या सात वर्षांत आपण पुष्कळ प्रमाणांत साधलें आहे. हिंदु व मुसलमान हे आतांपर्यंत दुरावलेले समाज होते. पण आतां ते एका बंधुभावानें निगडित झाले आहेत. हें काँग्रेसच्याच कार्याचें एक फल होय. ''

काँग्रेसचें दुसरें यश चार्लू यांनीं सांगितलें तें म्हणजे सरकारी दृष्टिकोनांतील बदल. '' काँग्रेस ही सनदशीर मार्गानें व सर्वमान्य साधनानें राष्ट्रहिताचें कार्य करणारी प्रतिष्ठित संस्था आहे, असें प्रशस्तिपत्रक व्हॉइसरॉयानें दिलें.'

याचा चार्ल्स यांनीं अभिमानानें उल्लेख केला; हें साहजिकच आहे. कारण गव्हर्नर–कलेक्टरादि छोटे छोटे ग्रह काँग्रेसकडे वक्रदृष्टीनें पाहात होते. पण त्यांची दृष्टि निवळविण्याचें काम काँग्रेसच्या धिम्या प्रयत्नानें बजावलें.

केवळ दृष्टिकोनच नव्हे, तर सरकारची कृतिहि बदलत चालल्याचा पुरावा चार्ल्स यांनीं दिला. काँग्रेसच्या मागणीप्रमाणें लॉर्ड क्रॉस यांनीं ' इंडिया बिल ' आणलें, सीमा–प्रांताला विधिमंडळ दिलें आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची वयोमर्यादा वाढविली. त्याबद्दल संतोष प्रदर्शित करून चार्ल्स यांनीं सरकारकडे अधिक हक्कांची व नव्या सुधारणांची मागणी केली. काँग्रेसच्या मोठमोठ्या मागण्यांना सरकार पानेंच पुसत आहे, अशी तक्रार त्यांनीं केली. ती स्थिति दूर करण्यासाठीं त्यांनीं कोणता उपाय सुचविला? तर, इंग्लंडांतील लोकमत आपल्या बाजूचें करून घेणें. हिंदुस्थानची माहिती ब्रिटिश जनतेला देण्यासाठीं आपण पराकाष्ठेचे प्रयत्न केले पाहिजेत–किंबहुना काँग्रेसचें अधिवेशनच लंडन येथें भरविलें पाहिजे, असा आग्रह त्यांनीं धरला, तो त्या काळाला योग्यच होता.

हिंदुस्थानांतील जनशक्ति जागृत केली पाहिजे, संघटित केली पाहिजे असे विचार सुचण्याचा काळ अद्यापि यावयाचा होता. काँग्रेसचा झेंडा खांद्यावर घेण्याची त्यांची तयारी होती, पण त्या झेंड्यावर त्यांना ' युनियन जॅकची ' सुवर्णमुद्रा हवी होती. " इंग्लंडमध्यें काँग्रेस भरविण्यासाठीं समुद्रगमन करावें लागेल, तें पाप समजून सनातनी हिंदु आपल्यावर बहिष्कार टाकतील तरी राष्ट्रहितार्थ तो आपण सहन केला पाहिजे" असाहि विचार चार्ल्स यांनीं मांडला. यावरून तेव्हांच्या काँग्रेस-पुढाऱ्यांना, एकीकडे सरकार व एकीकडे जनता, या दोघांनाहि तोंड कसें द्यावें लागत होतें, हें दिसून येतें. इंग्लंडमध्यें काँग्रेस भरविल्यानें आपल्या येथील कौन्सिलांत लोकनियुक्त प्रतिनिधि पाठवितां येतील आणि मग आपल्याला देशस्थिति सुधारतां येईल, अशी आशा त्यांनीं प्रदर्शित केली आहे. त्या वेळीं लोकांच्या भावना प्रगट करण्याचीं साधनें फारच थोडीं होतीं.

याबरोबरच हिंदी जनतेपर्यंत काँग्रेसच्या विचाराचें लोण पोंचविलें पाहिजे, अशी सूचनाहि त्यांनीं केली. पण तिच्यावर फारसा भर दिलेला नाहीं. सारा भर आहे तो, ब्रिटिश सरकार व ब्रिटिश प्रजाजन यांना आपली

मागणी पटविण्यावर. आपल्या भाषणाचे अखेरीस अध्यक्षांनीं अशी नवलाईची सूचना केली आहे कीं, " ब्रिटिशांचें राज्य हें परक्यांचें राज्य समजूंच नका, अशी शिकवण आपण हिंदी जनतेला दिली पाहिजे. पूर्वी क्षत्रिय वर्ग आपल्या समाजांत होता, त्याची जागा आतां ब्रिटिशांनीं घेतली आहे एवढेंच. या देशाच्या राज्यकारभाराचें ब्रिटिश लोक हें अविभाज्य अंग आहे. इंग्लंडच्या राणीविषयीं आपल्याला गाढ प्रेम व राजनिष्ठा वाटत आहे. " असे कांहीं विचार आजच्या पिढीला चमत्कारिक वाटले, तरी ऐतिहासिक दृष्टीनें पाहतां, उत्क्रांतीच्या त्या अवस्थेंत, ते योग्य व उपयुक्तच ठरतात. अध्यक्षांच्या इंग्रजी भाषणाचा अनुवाद उर्दूतून सांगण्यांत आला.

या कॉंग्रेसमध्यें जे अठरा ठराव मंजूर झाले, त्यांतहि जंगलखात्यांतील अडचणी दूर करा, मिठावरील कर कमी करा, पांच कोटी हिंदी लोक उपासमारीच्या सीमेवर आहेत आणि लाखों लोक दरवर्षी अन्नान्न करीत मरण पावत आहेत, म्हणून राज्यकारभाराचा व लष्कराचा खर्च कमी करा—अशा मागण्या व विनवण्याच होत्या. हत्याराचा निर्बंध शिथिल करून देशांत लष्करी विद्यालयें काढा, अशा आशयाच्या ठरावावर लो. टिळकांनीं भाषण केलें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

अशा किरकोळ सुधारणांचें मूलस्थान म्हणजे राज्यशासनाचे अधिकार. ते मिळविण्यासाठीं कॉंग्रेसनें आपल्या दुसऱ्या ठरावांत अशी आकांक्षा प्रदर्शित केली कीं, " विधिमंडळामध्यें जनतेचा आवाज प्रभावीपणें उमटावा. ब्रिटिश जनतेच्या सद्भावाबद्दल आम्ही कृतज्ञ आहोंत. त्या जनतेला आम्ही आदरपूर्वक आग्रहानें विनंति करतों कीं, न्याय्य अशा या सुधारणा देण्याचे कामीं यापुढें विलंब करूं नये. "

त्या वेळचें मागणेंहि किती थोडें!—आणि तेंहि किती अदबीचें व अजीजीचें! जणुं रांगत्या मुलाचे बोबडे बोलच! १९२० सालच्या कॉंग्रेसमधील भाषणें म्हणजे जाणत्या तरुणाचे आत्मविश्वासाचे उद्गार! आणि आतां १९५९ सालीं कॉंग्रेस जें बोलेल, ते कर्त्या पोक्त माणसाचे जबाबदार विचार असतील.

कॉँग्रेसच्या व्यासपीठावरून, जीव तोडून, केलेला आक्रोशहि अरण्यरुदन ठरत आहे, असें त्या वेळच्या कॉँग्रेस-नेत्यांनाहि वाटूं लागलें. म्हणून नागपूरच्या आदल्या वर्षी, १८९० सालीं, कलकत्ता येथें भरलेल्या अधिवेशनानें असा ठराव केला होता कीं, १८९२ सालीं कॉँग्रेसचें अधिवेशन खुद्द इंग्लंडांत भरवावें आणि त्याला १०० हून अधिक प्रतिनिधि जावेत. परंतु त्याच वर्षी इंग्लंडमध्यें सार्वत्रिक निवडणुका निघाल्या. म्हणून हें विलायती अधिवेशन तहकूब करण्याचा ठराव नागपूर कॉँग्रेसनें केला.

'कॉँग्रेस पुढें चालू ठेवावी कीं नाहीं?' असाहि प्रश्न या सातव्या अधिवेशनापुढें होता. तिच्या खर्चापुरते पैसे जमत नव्हते हें मुख्य कारण. पण कॉँग्रेसच्या बाल्यावस्थेंतील हें गंडांतर श्री. सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्या प्रौढ वक्तृत्वानें टळलें—आणि म्हणून कॉँग्रेसचें ६४ वें अधिवेशन आतां भरत आहे.

कॉँग्रेसच्या भवितव्याचा निर्णय ठरविण्यासाठीं वीस प्रतिनिधींची समिति नेमण्यांत आली. तिनें एक दिवस विचार करून निर्णय दिला कीं, 'कॉँग्रेसचें अधिवेशन इंग्लंडांत भरेपर्यंत तरी ती चालू ठेवावी.'

ह्यूम यांनीं ४० सभासदांचीं नांवें वाचलीं. त्यांचीच 'विषय-नियामक समिति' बनली.

कॉँग्रेसचे जनक मि. ह्यूम ह्यांचा मोठा गौरव करण्यांत येऊन, तें नको नको' म्हणत असतांहि, त्यांना पुनः कॉँग्रेसचे सरचिटणीस निवडण्यांत आलें. त्यांचे फोटोहि सभेंत वांटण्यांत आले.

१८९१ च्या कॉँग्रेसनें नागपूरमध्यें स्वदेशी भावनेला मोठी चालना दिली. हातमागाच्या धंद्याला प्रोत्साहन देण्यासाठीं 'स्वदेशी वस्तु प्रचारिणी सभा' पूर्वीच स्थापना झालेली होती. १८९१ सालीं नागपूर येथें 'स्वदेशी मिल' उघडली गेली.

३ असहकारितेचें बीजारोपण

अमृतसर काँग्रेसपासून राष्ट्राच्या राजकारणाला एक नवीच दिशा लागली. १९१९ सालीं अमृतसर येथें भरलेल्या अधिवेशनापुढें माँटफर्ड सुधारणा स्वीकाराव्यात कीं नाहीं हा मुख्य प्रश्न होता. म. गांधी, पं. मालवीय प्रभृति मृदु प्रकृतीच्या पुढाऱ्यांचा विश्वास ब्रिटिश सत्तेच्या भलेपणावर होता आणि म्हणून या सुधारणांचा स्वीकार करावा असें त्यांचें मत होतें. उलट लो. टिळक, बॅ. दास इत्यादि तीव्र वृत्तीच्या अनुभवी नेत्यांना त्या सुधारणा 'अपुऱ्या, असमाधानकारक व निराशाजनक' वाटत होत्या. आणि म्हणून ते ब्रिटिश पार्लमेंटला बजावीत होते, "महायुद्धांत मान्य केलेल्या स्वयंनिर्णयाच्या तत्त्वानुसार हिंदुस्थानला पूर्ण जबाबदारीचें राज्य तत्काळ द्या."

इंग्लंडच्या बादशहांनीं अशी घोषणा केली होती कीं, "हिंदुस्थानांतील प्रजेनें व अधिकारी वर्गानें समान ध्येयासाठीं, समान निश्चयानें नवीन युग निर्माण करण्याच्या कामास लागावें." या बादशाही शब्दावर विसंबून व बादशहांच्या भावनांना मान देऊन, गांधीजीप्रभृतींनीं काँग्रेसमध्यें अशी उपसूचना मांडली होती कीं, "जनतेनें व अधिकारी-वर्गानें सहकार्य करून ह्या सुधारणा अमलांत आणाव्या व त्यायोगें पूर्ण जबाबदारीचें राज्य येथें सत्वर स्थापन व्हावें. भारतमंत्री मि. माँटेग्यू यांनीं या सुधारणांच्या कामीं

जे परिश्रम घेतले, त्याबद्दल त्यांचे हार्दिक आभार काँग्रेस मानते." "निराशाजनक" हें सुधारणांना लावलेलें विशेषण गाळावें, अशीहि गांधीजींनीं सूचना केली.

परंतु गांधीजींची ही सहकाराची वृत्ति बहुसंख्य प्रतिनिधींना मान्य नव्हती. त्यामुळें अमृतसरची काँग्रेस म्हणजे लो. टिळकांचें जयस्थान असेंच ठरलें. गांधीजींच्या उपसूचनेंतील शिष्टाचाराचा भाग घेऊन दास यांनीं नवी उपसूचना मांडली व ती मंजूर झाली.

पंजाबमध्यें, खुद्द अमृतसर येथें, जालियनवाला बागेंत, जनरल डायर यानें जी अकारण व अनन्वित अशी निःशस्त्र व निरपराधी हिंदी स्त्री-पुरुषांची कत्तल केली, तिचा कडकडीत निषेध करणारा ठराव अमृतसर काँग्रेसनें करावा हें स्वाभाविकच होतें. पण त्याबरोबरच पंजाब व गुजरात या प्रांतांतील लोकांनीं जे अत्याचार केले, त्यांचाहि निषेध करावा, असा आग्रह गांधीजींनीं, आपल्या सत्याच्या ब्रीदास व अहिंसेच्या तत्त्वास, धरून केला. त्यांचें म्हणणें असें कीं, "मला आणि डॉ. किचलू–सत्यपाल यांना अटक करण्यांत सरकारनें वेडेपणा केला, त्यामुळें लोकहि वेडे झाले. पण वेडेपणाला वेडेपणानें उत्तर देऊं नये असें माझें मत आहे. वेडेपणाला शहाणपणानें उत्तर दिलें, तरच आपण परिस्थितीवर मात केल्यासारखें होईल."

गांधीजींचा हा सुविचार ऐकण्याइतका शांतपणा संतप्त झालेल्या प्रतिनिधींचे अंगीं नव्हता, त्यामुळें विषयनियामक समितीनें गांधीजींचा ठराव फेटाळून लावला. गांधीजी निराश झाले. त्यांनीं आपल्या शांत–मृदु स्वरांत आपला वज्रकठोर निश्चय जाहीर केला. "माझें हें धोरण काँग्रेसला मान्य नसेल, तर मी काँग्रेसमध्यें राहूं शकत नाहीं." या असहकाराचा प्रभाव विजेसारखा झाला. दुसरेच दिवशीं गांधींचा ठराव संमत झाला.

काँग्रेसला ही एक नवी दिशा लागली. सत्य–अहिंसेच्या तत्त्वज्ञानाचा काँग्रेसमध्यें हा शुभ प्रवेश होता. "राजकारण धर्ममय करावें." हें रानडे–गोखल्यांचें उदात्त ध्येय साकार करण्याचा हा प्रथम प्रयत्न होता. सरकारवर केवळ टीका न करतां लोकांनीं अंतर्मुख होऊन प्रत्यक्ष कार्यास लागावें, अशा स्वायत्त व स्वावलंबी कार्यक्रमाचा हा पाहिला पाया होता. काँग्रेसच्या व्यावहारिक राजकारणावर उमटलेला गांधीजींच्या सात्त्विक अध्यात्म वृत्तीचा हा आद्य संस्कार होता.

आगगाडीची दिशा एकदां बदलली म्हणजे पुढील सारीं स्टेशनेंहि आपोआपच बदलतात. इंग्लंडचे युवराज हिंदुस्थानांत येतील, तेव्हां त्यांचें स्वागत करावें, असा सहकार्याचा ठरावहि फारशी खळखळ न होतां मंजूर झाला. दिल्लीच्या अधिवेशनांत तो ठराव डावलण्यांत आला होता.

अमृतसरनंतर कलकत्ता येथें, ता. ४ सप्टेंबर रोजीं, काँग्रेसचें खास अधिवेशन भरलें. या दोन काँग्रेसच्या मध्यकालांत, हिंदुस्थानाच्या क्षोभाचा पारा चढावा, अशाच घटना ब्रिटिश सत्तेकडून घडल्या. ज्या डायरच्या राक्षसी अत्याचारामुळें सारें राष्ट्र बेभान झालें होतें, त्याचाच गौरव ब्रिटिश सरकारनें व ब्रिटिश जनतेनें केला. हें पाहून हिंदी जनतेला जखमेवर मीठ चोळल्यासारखें वाटलें. त्याच्याच जोडीला खिलाफत प्रकरण आलें. महायुद्धांतील आपल्या सर्व वचनांना हरताळ फांसून ब्रिटिश सरकारनें मुसलमानांची दारुण निराशा केली—आणि त्यांच्याशीं सहानुभूति म्हणून हिंदुसमाजहि ब्रिटिशांविरुद्ध खवळला. आणि तिसरा अन्याय सरकारनें केला तो म्हणजे, हिंदुस्थानांतील साऱ्या चळवळी मारून टाकण्यासाठीं, सर्व नागरिक–स्वातंत्र्य नष्ट करणारे रौलट कायदे हिंदुस्थानावर लादले.

या त्रिविध अन्यायामुळें सर्व राष्ट्र क्रुद्ध होऊन गेलें. त्या क्रोधाचा आविष्कार कलकत्त्याच्या अधिवेशनांत उत्कटतेनें प्रकट झाला. त्या अधिवेशनाचें अध्यक्षत्व लाला लजपतरायासारख्या तेजस्वी नेत्याला देण्यांत आलें होतें. अन्यायाचे व पापाचे डोंगर सरकार इतके रचीत चालले होते कीं, त्यामुळें त्यांच्याशीं संबंध ठेवणें स्वाभिमानी भारतीयाला अशक्यच व्हावें. आणि म्हणून कलकत्ता काँग्रेसमध्यें गांधीजींनीं मांडलेला असहकारितेचा ठराव प्रचंड बहुमतानें संमत झाला. पंजाब प्रकरण, खिलाफत निवाडा व रौलट कायदे–हे त्रिविध अन्याय दूर होईपर्यंत राष्ट्रानें कोर्ट-कौन्सिल-कॉलेज यांवर बहिष्कार घालावा आणि सरकारी नोकऱ्या-पदव्या सोडाव्या अशा आशयाचा असहकारितेचा ठराव १८८६ विरुद्ध ८८४ मतांनीं मंजूर झाला, यांत विशेष कांहीं नाहीं. पण अशा सर्व अन्यायांची जननी असणारी परतंत्रता नष्ट होईपर्यंत–म्हणजेच स्वराज्य मिळेपर्यंत–हा असहकारितेचा कार्यक्रम चालू राहावा अशीहि पुष्टि कलकत्त्याच्या अधिवेशनांतच दिली गेली, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

४ क्रांतिकारक अधिवेशन

आशय व आविष्कार या दोन्ही दृष्टींनीं नागपूरची काँग्रेस अपूर्व होती. ही तिची अपूर्वाई तिच्या नव्या धोरणांत, नव्या ठरावांत व नव्या कार्यक्रमांत जशी दिसून आली, तशी तिच्या नवीन व्यवस्थेंत, अतुल्य प्रतिनिधिसंख्येंत आणि सर्व सुखसोईंत प्रगट झाली. याच अपूर्वाईचा एक अंश म्हणजे स्वागताध्यक्ष शेठ जमनालाल बजाज यांचें असामान्य व्यक्तिमत्त्व! त्यांचें सारें चरित्र विरोधी घटनांनीं विणलेलें व उदात्त तेजाची झांक मारणारें आहे.

स्वागताध्यक्षांचें चरित्र

जमनालालजींचा जन्म राजस्थानांतील काशिकावास या गांवीं ता. ४ नोव्हेंबर १८८९ रोजीं झाला, पण त्यांचें बहुतेक सर्व जीवन मध्यप्रदेशांतील वर्धा या शहरीं गेलें. त्यांचा जन्म झाला एका गरीब कुळांत, पण ते दत्तक गेल्यानें लक्ष्मीपुत्र बनले—तथापि सर्व जन्म त्यांनीं साधेपणानें, विरक्तीनें, विश्वस्त भावनेनेंच घालविला. वयाचे पांचवे वर्षी ते वडिलांच्या इच्छेनें तर एकदां दत्तक गेले होतेच, पण वयाच्या ३० व्या वर्षी स्वेच्छेनें ते गांधीजींना पुनः दत्तक गेले. "महात्माजी, आपण मला आपला पांचवा पुत्र माना." अशी प्रार्थना त्यांनीं केली—आणि गांधीजींनीं ती मान्यहि केली. त्यामुळें त्यांच्या सर्व जीवनाचा प्रवाहच गांधीवादी मार्गानें वाहूं लागला. त्यांतच आचार्य विनोबा भावे यांना गुरु

मानून जमनालालजींनीं त्यांना वर्ध्यास नेलें, त्यामुळें जमनालालजींच्या जीवनांतील अध्यात्म-वृत्तिचीं बीजें चांगलींच अंकुरलीं.

लाखों रुपयांची जिंदगी डोळ्यापुढें दिसत असतां, जमनालालजींनीं वयाच्या अवघ्या १७ व्या वर्षी, आपल्या दत्तक आजोबाला एक त्यागपत्र लिहून, त्या सर्व जिंदगीवर पाणी सोडलें, ही केवढी अलौकिक घटना! "कोणी कोणाचा पिता नाहीं आणि कोणी कोणाचा पुत्र नाहीं; जो तो आपल्या सुखाचा सोबती! आपल्या जिंदगीवर आजपासून माझा थोडाहि हक्क राहिलेला नाहीं. द्रव्याची वासनाच मला नाहीं." असे वैराग्याचे विचार सतरा वर्षांच्या मुलानें लिहिले. हें कदाचित् कोणाला खरेंहि वाटणार नाहीं, पण तें संपूर्ण सत्य आहे.

जशी संपत्ति, तशीच कीर्ति. संपत्तीच्या पाठोपाठ धांवत आलेल्या कीर्तीकडेहि जमनालालजींनीं पाठ फिरविली. ते लक्ष्मीपुत्र, म्हणून सरकारनें त्यांना १८ वे वर्षी "ऑनररी मॅजिस्ट्रेट" चा हुद्दा दिला आणि त्यानंतर ९ वर्षांनीं 'रायबहादूर' ही बहुमानाची पदवीहि दिली. पण त्या दोहोंचाहि मोह त्यांना अणुमात्र नव्हता. त्या दोहोंचाहि त्याग त्यांनीं क्षणमात्र विचार न करतां केला.

जमनालालजी हे मुंबई येथें कापसाचा मोठा व्यापार करीत, पण तो पूर्ण सचोटीनें. व्यापारी असून ते सत्यनिष्ठ होते. कापसावर पाणी शिंपडून तो लबाडीनें विकण्याचें त्यांनीं बंद केलें, एवढेंच नव्हे तर अडतीसाठीं निरनिराळ्या व्यापाऱ्यांच्या कापसाचे जे नमुने येत, त्यांचेहि पैसे ते देऊं लागले. दुसरे कोणीहि व्यापारी असा चोखपणा सहसा ठेवीत नव्हते. तसेंच सरकारला भरावयाच्या कराबाबतहि जमनालालजींचे सारे व्यवहार निखळ चोख असत. एकदां ते देशासाठीं तुरुंगांत गेले असतांना, त्यांच्या मुनिमानें, इतरेजनाप्रमाणें, सरकारला जमाखर्च न दाखवून व १० हजार रुपये लांच देऊन, सुमारें ८० हजार रुपयांचा प्राप्तीवरील कर वांचविला. परंतु तुरुंगांतून सुटून येतांच जमनालालजींनीं वांचलेल्या कराची रक्कम, गांधीजींच्या सल्ल्यानें, राष्ट्रकार्याला अर्पण केली.

सुवर्णाला सुगंध सुटावा, त्याप्रमाणें या सत्यनिष्ठ उद्योगपतीचे अंतः-करणांत औदार्याचा अपार सांठा होता. व्यापारी असून उदार, असा

त्यांचा लौकिक. पैपैनें पैसा जोडणारे व सांचविणारे जमनालालजी मुक्त-हस्तानें राष्ट्रकार्यास मदत करीत—आणि तशीच नानाविध संस्थांनाहि. त्यांनीं आपल्या आयुष्यांत असा दानधर्म २५ लक्षांहून अधिक केला. आणि तो त्यांच्या एकंदर मिळकतीच्या मानानें पाहून शेठ बिर्लासारख्या कोट्यधीशानें आश्चर्य व्यक्त केलें.

नागपूर काँग्रेसचे स्वागताध्यक्ष म्हणून जमनालालजींची निवड झाली, तेव्हां ते अवघ्या ३० वर्षांचे होते. त्या उच्च पदाच्या मानानें आपलें वय लहान आणि आपलें शिक्षणहि अल्प, तसेंच आपला राष्ट्रसेवेचा अनुभवहि थोडा. म्हणून त्यांनीं प्रांजळपणें गांधीजींना एक पत्र लिहून स्वागताध्यक्ष होण्याची आपली अपात्रता व अनिच्छा निःसंदिग्ध शब्दांनीं कळविली. पण गांधीजींनीं आग्रह केल्यामुळें जमनालालजींनीं त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानली. काँग्रेसमध्यें हिंदी या राष्ट्रभाषेंत भाषण करणारे ते बहुधा पाहिलेच स्वागताध्यक्ष असावेत.

नागपूरच्या काँग्रेसपासून जमनालालजी राष्ट्राच्या राजकारणांत बद्धमूल झाले. आपण संमति दिलेल्या ठरावांचें कांटेकोरपणें पालन करण्यास ते सदैव दक्ष असत. १९०६ सालापासूनच ते स्वदेशी गिरण्यांचें कापड वापरीत. पण नागपूरनंतर, सोळा आणे स्वदेशी असलेली हातसुताची खादी त्यांनीं स्वीकारली. आणि स्वीकारली म्हणजे अगदीं नखशिखान्त–घरींदारींहि! त्यांचें सर्व कुटुंबच खादीधारी बनलें, एवढेंच नव्हे तर देवाच्या अंगावरहि खादीचे कपडे चढले. आपल्या घरांतील उंची उंची विदेशी वस्त्रें गाडींत भरून जमनालालजींनीं गांवांतून मिरवणूक काढली. त्यांत वर्ध्यांच्या नागरिकांनीं आपल्या विदेशी कपड्यांची भर टाकली. शेवटीं २०–२५ हजार रुपयांच्या विदेशी कापडांची होळी करण्यांत आली.

खादीचें व्रत जमनालालजींनीं मनोभावें पाळलें. 'चरखा संघाचे' ते अध्यक्ष होते. तसे ते असतांना त्यांच्या भागीदारांनीं एक कापडाची गिरणी विकत घेण्याचें ठरविलें. ही विसंगति त्यांच्या पत्नी–जानकीदेवी–ह्यांच्या हृदयाला जाऊन झोंबली. आपल्या पतीच्या या तत्त्व-च्युतीची तक्रार त्यांनीं गांधीजीं-कडे केली. पण आश्चर्य हें कीं, खुद्द जमनालालजींचें देशप्रेमी चित्तच बंड

करून उठलें! गांधीजींचें पत्र येण्यापूर्वींच, स्वतःच्या विचारानें, त्यांनीं गिरणीचा सौदा रद्द केला आणि तो वृत्तान्त गांधीजींना कळविला.

खादीविषयीं जमनालालजींची श्रद्धा किती गाढ होती, हें त्यांच्या पुढील उद्‌गारांवरून कळून येण्यासारखें आहे. " मी खादीला भारताचा युगधर्म मानतों. गिरणीचा कपडा गरिबांची रोटी व रोजगार छिनावून नेतो आणि खादी गरिबाला संजीवन देते, हें ज्या दिवशीं मला उमगलें, तेव्हांपासून मी असें मानूं लागलों, -- खादी वापरणें हें पुण्य व गिरणीचें कापड वापरणें हें पाप! खादी ही आपलें चारित्र्य सुधारण्याचे बाबतींत एक महान् उपदेशक आहे, देशाचें दारिद्य दूर करण्याचे बाबतींत ईश्वरी वरदान आहे आणि स्वराज्यप्राप्तीचे संग्रामांत एक सेनापति आहे. "

अशा नित्याच्या विधायक कार्याप्रमाणेंच, राजकारणाच्या प्रासंगिक लढ्यांतहि जमनालालजी आघाडीवर राहण्याची धडाडी दाखवीत. १९२३ सालीं नागपूर येथील झेंडा-सत्याग्रहाचें नेतृत्व त्यांनीं स्वीकारलें आणि त्यासाठीं १॥ वर्षांची कैद व ३ हजार रुपये दंड सोसला. तसेंच १९३० सालीं मिठाच्या कायदेभंगांत भाग घेऊन व विलेंपार्लें येथील छावणीचें सेनापतित्व पत्करून त्यांनीं सत्याग्रहाचा लढा दिला व त्यासाठीं २ वर्षांची कैदेची शिक्षा भोगली. तिसरा कारागृहवास १९३२ सालीं त्यांनीं धुळें, येरवडा व नाशिक या तीन ठिकाणीं भोगला. १९३९ सालीं जयपूर संस्थानांतील सत्याग्रह-संग्रामाचे तर ते अध्वर्युच होते. त्यापायीं ते त्या संस्थानांत सहा महिने स्थानबद्ध होते. पुढें १९४१ सालीं, दुसऱ्या महा-युद्धाचे वेळीं, कॉंग्रेसच्या आदेशानुसार, त्यांनीं युद्धविरोधी घोषणा केली. त्यामुळें त्यांना कांहीं महिने तुरुंगवास सोसावा लागला. अशा प्रकारें, गांधीजींच्या नेतृत्वाखालीं, कॉंग्रेसनें चालविलेल्या सत्याग्रह-संग्रामांत, पांच वेळां भाग घेऊन, जमनालालजींनीं प्रत्यक्ष देहदंड सोसला.

याशिवाय जमनालालजींनीं इतर नाना प्रकारांनीं जनतेची जी सेवा केली, ती अमापच आहे. त्यांनीं कैक तरुणांना कॉंग्रेसच्या राजकारणांत ओढलें; तर कैक कॉंग्रेसनेत्यांचे स्नेहसंबंध सांधले. किती तरी कॉंग्रेसभक्तांना चरितार्थासाठीं त्यांनीं ' गुप्तदानें ' दिलीं आणि किती तरी संस्थांना त्यांनीं सढळ हातानें मदत केली. " गांधी-सेवा-संघाची " कल्पना, योजना व

स्थापना त्यांचीच. त्यासाठीं त्यांनीं लक्षावधि रुपये खर्च केले—आणि मुख्य म्हणजे जिव्हाळ्याच्या प्रेमानें गांधीवादी कार्यकर्त्यांना एका सूत्रांत गोवलें.

त्याचप्रमाणें त्यांनीं, त्या जुन्या काळांत, १९२८ सालीं, सनातनी विश्वस्तांचें हृदय-परिवर्तन करून, वर्धा येथील आपलें ' लक्ष्मीनारायणाचें मंदिर ', सर्व देशांत प्रथम, हरिजन-बांधवांना खुलें केलें. १९४२ सालीं त्यांनीं ' गो-सेवा-संघा ' ची स्थापना करून आपलें जीवित गोरक्षणास वाहिलें. जमनालालजींच्या जीवनांत गांधीवाद अंतर्बाह्य व ओतप्रोत भरलेला होता. त्यांनींच आपल्या मालकीचें शेगांव हें खेडें गांधीजींना दान दिलें——तेंच पुढें ' सेवाग्राम ' म्हणून सर्व जगांत ख्याति पावलें व काँग्रेसच्या राजकारणाची राजधानीच बनलें.

खादी, हिंदी, हरिजन-सेवा, हिंदु-मुस्लिम ऐक्य, स्वदेशी, ग्रामोद्योग इत्यादि विधायक कार्यांत जमनालालजी मनापासून भाग घेत. या प्रवृत्तींचीं बीजें त्यांच्या अंतःकरणांत, गांधीजींची भेट होण्यापूर्वींच, स्वतंत्रपणें रुजलेलीं होतीं. त्यांच्या ह्या अलौकिक व्यक्तिमत्त्वाची पारख गांधीजींनीं आरंभींच केली होती. त्यामुळें त्यांनीं त्यांना नागपूर काँग्रेसचें स्वागताध्यक्ष-पद स्वीकारण्याविषयीं आग्रह केला.

स्वागताध्यक्षपद त्यांनीं मोठ्या कौशल्यानें व यशस्वी रीतीनें संभाळलें, एवढेंच नव्हे तर, त्यानंतर त्यांचेकडे काँग्रेसचे खजिनदार हें स्थान सुमारें २० वर्षें सतत राहिलें. त्या स्थानाचा कारभारहि त्यांनीं चोखपणें, सचोटीनें व निर्लोभी वृत्तीनें चालविला. स्त्री व संपत्ति या बाबतींत कोणाचाहि कसाहि संशय घेण्याची कुटिल जनांची सहज प्रवृत्ति. अशा संशयानें फणा उगारतांच पं. जवाहरलाल नेहरू यांनीं त्यांचेवर जोराचा तडाखा मारला. काँग्रेसचे दीर्घकाळचे चिटणीस या नात्यानें पंडितजींनीं एक पत्रक प्रसिद्ध करून, जमनालालजींवरील संशयाचें पूर्ण निराकरण केलें. त्या पत्रकांत पंडितजींनीं जाहीर केलें कीं,

" आमचे सर्व हिशोब सालोसाल काळजीपूर्वक तपासले जातात व जनतेच्या माहितीसाठीं वृत्तपत्रांत प्रसिद्धहि केले जातात. काँग्रेसचे हिशोब व्यवस्थितपणें ठेवल्याबद्दल मी कोषाध्यक्ष जमनालाल बजाज यांना धन्यवाद

देतों. योग्य कारण असलें तरी कोर्टाकडे धांव घेण्याची काँग्रेसची वहिवाट नाहीं. तथापि कोणी दुष्टबुद्धीनें बदनामीकारक आरोप सतत करीत राहील तर त्याला काँग्रेस कोर्टांत खेचील."

अशा शुद्ध चारित्र्याचा व निःस्वार्थ सेवाभावाचा स्वागताध्यक्ष नागपूर काँग्रेसला लाभला हा शुभ शकुनच होय.

अधिवेशनाचा श्रीमन्महा

नवयुगाची प्रभात आपण आतां पाहणार आहोंत, अशा उल्हासानें नागपूर काँग्रेसचें वातावरण भरून गेलेलें होतें. कलकत्त्याच्या असहकाराच्या ठरावामुळें—आणि त्याला राष्ट्रानें दिलेल्या जोरदार जबाबामुळें—आतां काँग्रेसचा कायाकल्प होणार व राष्ट्राच्या राजकारणास निराळेंच वळण लागणार अशी उत्सुकता व उमेद प्रत्येक प्रतिनिधीच्या व प्रेक्षकाच्या मुद्रेवर खेळत होती आणि नेत्रांत तरळत होती. गांधीजी एक 'बडे जादूगार' आहेत आणि ते आफ्रिकेंतल्याप्रमाणें येथेंहि, आपल्या सत्याग्रहाच्या जादूच्या कांडीनें, कांहीं चमत्कार घडवून, हां हां म्हणतां, स्वराज्य हस्तगत करतील, अशी आशा व आकांक्षा प्रत्येकाच्या कुजबुजींतून व हालचालींतून प्रगट होत होती.

भारताच्या राजकीय क्षितिजावर उदय पावणाऱ्या या नवीन सूर्याला अर्घ्य देण्यासाठीं हजारों स्त्री-पुरुष काँग्रेसच्या मंडपांत जमलेले होते. केवळ प्रतिनिधींचीच संख्या १४५८२ होती. या सुमारें पंधरा हजार प्रतिनिधींमध्यें एक हजारावर मुसलमान होते व १६९ स्त्रिया होत्या. स्वागत-मंडळाच्या सभासदांची संख्या ३३०० होती. स्वर्गांतून अवतरणाऱ्या एखाद्या दिव्य देवदूताकडे भक्तीनें पाहावें, त्याप्रमाणें सारे लोक मोठ्या औत्सुक्यानें व अभिमानानें काँग्रेसच्या कामकाजाकडे लक्ष देत होते.

अशा विद्युत्-संचारित वातावरणांत, ता. २६ डिसेंबरचा दिवस उगवला. दुपारचा दीड वाजला. काँग्रेसचा मंडप प्रेक्षकांनीं गच्च भरून गेला. पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांनीं आपल्या खड्या आवाजांत 'वंदे-मातरम्' हें राष्ट्रगीत गायिलें; तेव्हां सर्वांचीं अंतःकरणें थरारून गेलीं व शरीरें रोमांचित झालीं. त्यानंतर कांहीं मुलींनीं राष्ट्रगीतें म्हटलीं.

मग स्वागताध्यक्ष शेठ जमनालाल बजाज यांनीं आपलें हिंदी भाषण तासभर वाचून दाखविलें. त्या वेळीं मंडपांत २०,००० वर लोक होते व मंडपाबाहेरहि ५०००-६००० माणसें दाटीवाटीनें उभीं होतीं. या मंडपाचें काम पुण्याच्या एका बोहऱ्यानें २२००० रु. स घेतलें होतें. प्रतिनिधीं-साठीं २०० झोपड्या बांधण्यांत आल्या होत्या. अध्यक्षांचे टेबलावर, त्याच वर्षीं दिवंगत झालेले लो. टिळक, यांचा छोटासा संगमरवरी पुतळा ठेवलेला होता, खालचे बाजूस हिंदमाता, म. गांधी व लो. टिळक यांच्या मोठ्या रंगीत तसबिरी ठेवल्या होत्या. शिवाय व्यासपीठावर लोकमान्यांची भव्य तसबीर ठेवलेली होती.

यापूर्वीच्या अधिवेशनांना देशांतील प्रांतोप्रांतींचे प्रतिनिधि किती हजर असत, याचे आंकडे उद्बोधक आहेत. प्रारंभापासून प्रतिनिधींच्या संख्येची कमान चढत असलेली दिसते. ती काँग्रेसची लोकप्रियता वाढत गेल्याची खूणच होय. परंतु, सुरत–काँग्रेसनंतर, मवाळांच्या मुठींत अडकून पडलेल्या काँग्रेसला कमी कमी प्रतिनिधि येत गेले असें दिसून येतें. १९१२ ची काँग्रेस म्हणजे अमावस्येची ओहोटीच ! पुढें लो. टिळक मंडालेहून सुटून आल्यानंतर प्रतिनिधींच्या संख्येला पुनश्च भरती आलेली दिसते. त्या भरतीची पौर्णिमा झाली १९२० सालच्या नागपूर-काँग्रेसमध्यें. त्यानंतर प्रतिनिधींच्या संख्येला काँग्रेसनें कार्य-सौकर्यासाठीं आपल्या नियमांनींच मर्यादित केलें. काँग्रेसच्या लोकाभिमुखतेचें मापक-यंत्र असणारा हा प्रतिनिधींच्या संख्येचा आलेख पुढें दिला आहे.

१८८५	७२	१८९५	१५८४
१८८६	४३६	१८९६	७८४
१८८७	६०७	१८९७	६९२
१८८८	१२४८	१८९८	६१४
१८८९	१८८९	१८९९	७३९
१८९०	६७७	१९००	५६७
१८९१	८१२	१९०१	८९६
१८९२	६२५	१९०२	४७१
१८९३	८६७	१९०३	५३८
१८९४	११६३	१९०४	१०१०

१९०५ –	७५७	१९१४ –	८६६
१९०६ –	१६६३	१९१५ –	२२५९
१९०७ –	१६००	१९१६ –	२२९८
१९०८ –	६२६	१९१७ –	४९६७
१९०९ –	२४३	१९१८ –	४९६८
१९१० –	६३६	१९१९ –	४८६५
१९११ –	४४६	१९२० –	७०३१
१९१२ –	२०७	१९२० –	१४५८२
१९१३ –	३४९		

स्वागताध्यक्षांचें भाषण

" आजवरच्या माझ्या आयुष्यांतील अत्यंत भाग्यशाली असा आजचा दिवस मी मानतों. आपल्या मातृभूमीच्या या पवित्रतम मंदिरामध्यें तिची सेवा व साधना करण्यासाठीं एकत्र झालेल्या आपणासारख्या सज्जनांचें स्वागत करण्याचें सौभाग्य व्यापाराच्या मायाजालांत सांपडलेल्या माझ्यासारख्या व्यक्तीला लाभलें आहे. मी माझी अयोग्यता योग्य प्रकारें जाणतों. तथापि पूज्य जनांची आज्ञा व सहकार्यांचें आश्वासन मिळाल्यामुळें मी हें कर्तव्य स्वीकारलें आहे. अत्यंत हर्ष व उल्हास यांनीं भरलेल्या हृदयानें मी आपलें स्वागत करीत आहें.

"काँग्रेसच्या प्रतिनिधींची जबाबदारी दिवसेंदिवस वाढत आहे. काँग्रेसचें ध्येय जितकें जितकें पवित्र व महान् होत आहे, तितका त्याच्या संपादनाचा मार्ग संकटांच्या कंटकांनीं अधिकाधिक भरून जात आहे. अशा वेळीं देशाच्या कोनाकोपऱ्यांतून, दूरदूर भागांतून, प्रवासाचे कष्ट सोसून, आपण सर्वजण यावेळीं, या मंडपांत एकत्रित झालेले आहांत. ते कोणत्या शक्तीच्या प्रेरणेनें ? माझ्या मतें, ती शक्ति म्हणजे शुद्ध देशप्रेमाची पवित्र भक्ति. आपल्या देशाची अवनति दूर करण्याच्या प्रबळ उत्कंठेनेंच आपल्याला आज येथें आणलेलें आहे. भारतमातेच्या कन्या-पुत्रांमध्यें दिसून येणारी चढती-वाढती देशभक्ति ही, आमच्या राष्ट्राचा विजय निकट असल्याची, सर्वांत

मोठी खूण होय. म्हणून मी पुनः एकवार आपल्या पावन व अपार भावनांचें अंतःकरणपूर्वक स्वागत करितों.

त्याचप्रमाणें अनेक कष्ट सहन करून येथें उपस्थित झालेले आपले निमंत्रित मित्र कर्नल वेजवूड व श्री. बेनस्पूर यांचेंहि स्वागत मी करितों. सांप्रतच्या संकटकालीं, आपल्याला आपल्या स्वतंत्र मताप्रमाणें वाटचाल करावयाची आहे. आणि स्वावलंबनाचा मार्ग चोखाळावयाचा आहे, हें खरें; तरी या दोन मित्रांच्या प्रामाणिक सल्ल्याचा आपल्याला उपयोग होईल याविषयीं कांहीं संदेह नाहीं.

यापूर्वी या शहरांत कॉंग्रेसचें अधिवेशन फक्त एकदांच भरलें होतें. १८९१ सालीं कॉंग्रेसचें सातवें अधिवेशन श्री. आनंद चार्लू यांचे अध्यक्ष-तेखालीं नागपूर शहरीं भरलें होतें. त्यानंतर १९०६ सालीं कलकत्ता येथें, भरलेल्या कॉंग्रेसमध्यें असें ठरलें कीं, पुढील अधिवेशन नागपूरमध्यें भरावें. परंतु त्या वेळीं कॉंग्रेसचीं सूत्रें ज्या महाभागांच्या हातीं होतीं,त्यांना कोणत्या कां कारणानें होईना, पण नागपूर हें कॉंग्रेसला योग्य स्थान आहे असें वाटलें नाहीं, म्हणून कलकत्ता कॉंग्रेसचा निर्णय बाजूस सारून, नागपूर-ऐवजीं सुरतसारख्या सुरक्षित ठिकाणीं तें अधिवेशन भरविण्याचा निश्चय झाला. तो निश्चय योग्य होता कीं नाहीं, याची शहानिशा आज करणें उचित नाहीं व अवश्यहि नाहीं. परंतु एवढें सांगणें अवश्य आहे कीं, तेव्हांपासून या प्रांतांतील लोकांना आपल्या प्रांतांतून कॉंग्रेस गेल्याचें तीव्र दुःख स्वाभाविकपणें झालें. त्यांची ती तक्रार आजपर्यंत धुमसत होती, पण तेरा वर्षांनंतर ती तक्रार पूर्णपणें दूर करण्यांत आली आहे, याबद्दल मी नागपूरवासियांचें अभिनंदन करतों.

कॉंग्रेसचा जन्म झाल्यापासून—म्हणजे १८८५ सालापासून—आतांपर्यंत जितकीं अधिवेशनें भरलीं, त्या सर्वांमध्यें माझ्या दृष्टीनें दोन अधिवेशनें विशेष महत्त्वाचीं आहेत. एक १९०६ सालीं कलकत्ता येथें भरलेलें. तेथें कॉंग्रेसनें, राज्यकारभारांतील छोट्या—मोठ्या, निरर्थक सुधारणांची मागणी करण्याचें आपलें धोरण टाकून दिलें आणि स्वराज्याचें ध्येय प्रथमच निश्चित केलें, एवढेंच नव्हे तर, त्या स्वराज्यप्राप्तीसाठीं " भिक्षांदेही "चा जुनापुराणा मार्ग निरुपयोगी समजून, स्वावलंबनाच्या मार्गावर कॉंग्रेसनें

पदार्पण केलें. दुसरें महत्त्वाचें अधिवेशन म्हणजे गेल्या सप्टेंबर महिन्यांत कलकत्ता येथेंच भरलेलें जादा अधिवेशन. त्यामध्यें गेल्या बारा वर्षांतील शैथिल्य दूर सारून कॉंग्रेसनें असहयोगाचा ठराव केला, आणि त्याचे द्वारां आपलें ध्येय पुनः स्पष्ट केलें, एवढेंच नव्हे, तर त्याच्या प्राप्तीसाठीं सक्रिय संग्रामाच्या मंत्राचा आदेश देशाला दिला गेला.

कलकत्त्याच्या जादा अधिवेशनांत जो ठराव मंजूर झाला, त्याचा तीन महिन्यांचा अनुभव आशाजनक आहे, त्या अनुभवानें असें स्पष्ट केलें आहे कीं, आतां पुनः त्या ठरावाला अधिक जोरानें अनुमोदन देणें इष्ट व अवश्य आहे. कलकत्ता कॉंग्रेसनें केवळ ठराव करून जें ध्येय निश्चित केलें, तें अधिक स्पष्ट शब्दांनीं कॉंग्रेसच्या व्यवस्थेमध्यें अंतर्भूत करणें आवश्यक आहे. त्याचप्रमाणें नवा राष्ट्रीय कार्यक्रम सफल होण्यासाठीं, कॉंग्रेसच्या कारभारामध्यें, समयोचित परिवर्तन करणें, हेंहि आवश्यक आहे. हें सर्व महत्त्वपूर्ण कार्य आपणांपुढें उभें आहे. यामुळें मी या अधिवेशनास कलकत्त्याच्या जादा अधिवेशनापेक्षांहि जादा महत्त्व देतों. ही मोठी जबाबदारी पार पाडण्याची शक्ति आपणां सर्वांना परमेश्वरानें द्यावी, अशी मी त्याची प्रार्थना करितों.

देशबंधूंनो, आतां मी आपल्यापुढें विद्यमान राजकीय परिस्थितीविषयीं माझे विचार संक्षेपानें मांडतों. आपल्या मातृभूमीचें सर्वश्रेष्ठ रत्न, आदर्श देशभक्त, धुरंधर मुत्सद्दी आणि आपल्या अंतकालापर्यंत भारतवासीयांचे अनन्य नेते होऊन राहिलेले, प्रातःस्मरणीय, लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या स्वर्गस्थ आत्म्याला प्रणाम केल्याविना मला राहावत नाहीं. त्यांच्या अनुपास्थितीचें दुःख आज आपण सर्व लोक अनुभवीत आहों. त्यांच्या मृत्यूनें सर्व राष्ट्रच दुःखित झालें आहे. त्यांचें निर्भय, निःस्वार्थ आणि ध्येयनिष्ठ जीवन भारतीय देशभक्तांना अनंत कालपर्यंत आदर्श वाटेल असा माझा विश्वास आहे. या कॉंग्रेसच्या सर्व कार्यक्रमांमध्यें उत्साह उत्पन्न करून आम्हांला मार्गदर्शन करण्याचें कार्य लोकमान्यांचा उच्च आत्मा करील, अशी माझी श्रद्धा आहे.

विद्यमान राजकीय परिस्थितीवर दृष्टिक्षेप करतांना, पहिल्या महायुद्धाचे पूर्वी जाण्याची कांहीं गरज आहे असें मला वाटत नाहीं. महा-

युद्धापूर्वीची स्थिति, देशांतील वाढतें दारिद्र्य, काँग्रेसचें दौर्बल्य, 'राष्ट्रीय' म्हणविल्या जाणाऱ्या पक्षाची विकल अवस्था आणि सर्वत्र पसरलेलें नैराश्य- हें सर्व आपणांपैकीं बहुतेकांचे डोळयांसमोर आहे. महायुद्धानें भारताच्या राजकारणांत नवा प्राण ओतला. 'इंग्लंडची आपत्ति तीच आमची संधि' असें अनेक देशभक्तांनीं मानलें. इंग्लंडनें व त्याच्या दोस्त राष्ट्रांनीं आपल्या संकटकालीं आपल्याला अन्य राष्ट्रांचें साहाय्य लाभावें म्हणून भारतादि पीडित राष्ट्रांपुढें जबाबदार-राज्यपद्धति, स्वयंनिर्णय आणि छोट्या दुर्बल राष्ट्रांची स्वतंत्रता–इत्यादि प्रलोभनें ठेवलीं. खुद्द भारत देशाशीं असा स्पष्ट वायदा करण्यांत आला कीं, साम्राज्यान्तर्गत समानता व पूर्ण जबाबदारीची राज्यपद्धति, युद्धसमाप्तीनंतर देण्यांत येईल. 'राष्ट्रसंघाच्या' स्थापनेची घोषणा करण्यांत आली आणि त्या नव्या जागतिक संस्थेंत भारताला बरोबरीचें स्थान देण्यांत आलें. 'राष्ट्रसंघ' ही संस्था छोट्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची संरक्षक देवता बनणारी होती. युद्धकालांत मुसलमानांचीं मनें खूष राखण्यासाठीं आणि तुर्कस्तानाविरुद्ध साहाय्य मिळविण्यासाठीं अशी स्पष्ट प्रतिज्ञा केली गेली कीं, "युद्धामध्यें इंग्लंडचा विजय झाल्यावर तुर्की साम्राज्याला कोणतीहि बाधा पोहोंचणार नाहीं."

भारतीयांचें भोळें हृदय अधिकच उत्साहानें व आशेनें भरून गेलें. या दुःखी देशांतील अनेक नागरिकांना ब्रिटिशांच्या कृपाछत्राखालीं, सुख-समृद्धि व स्वतंत्रता आपल्याला लाभल्याचीं स्वप्नें दिसूं लागलीं. ब्रिटिश साम्राज्याच्या मदतीसाठीं भारताचें धान्य, धन व रक्त पाण्यासारखें वाहिलें. तथापि कांहीं दूरदर्शी लोकांच्या चित्तांत त्याच वेळीं संशय येत होता, कारण तेव्हां "भारतरक्षक कायद्याचा" वापर भयंकर रीतीनें होत होता. तरीहि लोकांची अशी समजूत करून देण्यांत आली कीं, हा कायदा केवळ युद्ध-कालापुरता आहे आणि अशा संकटकालीं, दोषी व निर्दोषी यांचा अचूक निर्णय करणें शक्य नसतें.

परंतु जेव्हां जर्मनीचा आणि त्याच्या साथीदारांचा पराभव झाला. तेव्हां इंग्लंड व त्याचीं दोस्त राष्ट्रें यांचीं सारीं आश्वासनें खोटीं ठरलीं, छोट्या छोट्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याऐवजीं विजयी राष्ट्रांनीं एकेक छोटा देश गडप करण्यास सुरुवात केली. भारताला "जबाबदारीची

राज्यपद्धति " म्हणून ज्या नवीन राजकीय सुधारणा दिल्या, त्यांवर राष्ट्रांतील बहुतेक सर्व नेत्यांनीं एकमतानें "असंतोषप्रद व नैराश्यजनक" असा शिक्का मारला. तेव्हांपासून या सुधारणांमध्यें जे थोडे–बहुत गुण होते, तेहि नियमा–उपनियमांच्या जंजाळांनीं नष्ट करण्यांत आले. त्यानंतर 'भारत–रक्षण कायद्याचे' अत्याचार वाढविण्यासाठीं व कायम करण्यासाठीं आणि या चिर–पीडित देशाच्या सर्व राजकीय आकांक्षांची व कार्यांची कायमची गळचेपी करण्यासाठीं, पोलिस व वैयक्तिक सरकारी अधिकारी यांची सत्ता अनिर्बंध करणारे 'रौलट' कायदे घडविण्यांत आले. छोट्या राष्ट्रांच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्यासाठीं म्हणून जन्मास आलेला 'राष्ट्रसंघ' हा केवळ आंतरराष्ट्रीय सशस्त्र लुटारूंचा एक जमाव असल्याचें सिद्ध झालें. तसेच इंग्लंडचे मुख्य मंत्री व त्यांचें मंत्रिमंडळ यांच्या प्रकट प्रतिज्ञांना हरताळ फासून तुर्की साम्राज्याचे तुकडे तुकडे करण्यांत आले आणि खलीफा हा व्यवहारतः दोस्त राष्ट्रांच्या लष्कराच्या हातांतील कैदी बनला. हें सारें पाहून भारतांतील हिंदु–मुसलमान इत्यादि सर्वांचे डोळे उघडले.

अशा संकटकाळीं महात्मा गांधींनीं राष्ट्रीय जीवनावर रौलट कायद्याचे परिणाम भावी काळांत किती भयंकर होतील, हें अचूक जाणलें, आणि त्याच्या प्रतिकारार्थ सत्याग्रहासारखें निर्दोष व अहिंसक आंदोलन सुरू केलें. परंतु या पवित्र आंदोलनास कलंकित व नियंत्रित करण्यासाठीं म्हणून व आपल्या सत्तेचा दरारा जनतेवर बसविण्यासाठीं म्हणून पंजाबादि प्रांतांत सरकारनें जे अमानुष अत्याचार केले, ते पूर्वी कोणी कधींच ऐकले नसतील. त्याचें स्मरण आतां करून देऊन आपणा सज्जनांच्या हृदयांतील सुप्त दुःख व क्रोध मी जागृत करूं इच्छित नाहीं. माझ्या अल्प बुद्धीप्रमाणें डायर–ओडवायर आणि त्यांचे पाठीराखे मॉंटेग्यु–चेम्सफर्ड इत्यादि ब्रिटिश अधिकाऱ्यावर भारतानें क्रुद्ध होण्याऐवजीं, त्यांचेशीं कृतज्ञच राहिलें पाहिजे. कारण याच लोकांनीं आमच्या डोळ्यांवर ब्रिटिश साम्राज्याविषयीं गेल्या दीडशें वर्षांत जें भ्रमाचें पटल आलें होतें, तें कायमचें दूर केलें. भारतवासीयांच्या चित्तांतील मोह व अज्ञान नष्ट करून या विशाल साम्राज्यामध्यें आपली स्थिति काय आहे व काय होणार आहे याची स्पष्ट जाणीव त्यांना झाली.

तुर्की साम्राज्याच्या विच्छेदामुळें आमच्या मनांत असा लख्ख प्रकाश पडला कीं, ब्रिटिश मुत्सद्दी व राज्यकर्तें यांच्या वचनांवर व प्रतिज्ञांवर अणुमात्रहि विश्वास ठेवणें शक्य नाहीं. पंजाबमधील अत्याचारांनीं व त्यांना इंग्लंडमध्यें मिळालेल्या अनुमोदनानें आम्हांस असा चरचरीत धडा मिळाला कीं, या मुत्सद्द्यांच्या व राज्यकर्त्यांच्या हृदयामध्यें आम्हां भारत-वासियांचें जीवित, वित्त, रक्त व स्त्रियांचा मान—यांना काडीमात्र किंमत नाहीं. आमची सत्यस्थिति आम्हांस स्वच्छपणें कळून आली. आमच्या पुढाऱ्यांचे मनांत तर अशी भीति उत्पन्न झाली कीं, यापुढें महायुद्धाचे शेवटीं इंग्लंड विजयी होऊन त्याची शक्ति व गर्व वाढेल आणि त्याचा परिणाम म्हणजे भारताला आपला राष्ट्रीय अभिमान, किंबहुना अस्तित्वहि टिकविणें अधिकच कठिण होईल.

अशा परिस्थितीमध्यें, भारताला अपमानाचें जिणें व अपमानाचा मृत्यु यांच्यापासून वांचविण्याचे दोनच उपाय मला दिसतांत. एक सशस्त्र बंड व दुसरा सार्वत्रिक असहकार. यांपैकीं भारतानें आपल्या प्राचीन संस्कृतीस अनुरूप असा दुसरा मार्ग स्वीकारला, आणि त्याचा प्रयोग करून पाहण्याचा निश्चय केला. याचा आनंद पाश्चात्य संस्कृतींतील दोष व भारतीय संस्कृतींतील गुण जाणणाऱ्या कोणा भारतवासियास होणार नाहीं? ज्या लोकांना धार्मिक दृष्टीनें दोन्ही मार्ग सारखेच वाटतात, त्यांनाहि व्यावहारिक राजनीतीच्या दृष्टीनें दुसरा उपायच समयोचित व स्वीकारार्ह वाटेल.

सज्जनहो, सांप्रतकाळीं, असहकाराचा सूर्य इतका वर चढलेला आहे कीं, आतां त्याच्या कार्यक्रमाचा ऊहापोह करणें, हें माझ्या दृष्टीनें धाष्टर्याचेंच होईल. कॉंग्रेसनें असहकाराचें तत्त्व, त्याची नीति व त्याच्या कार्यक्रमाचा पहिला भाग—या तिन्हींचा स्वीकार पूर्वींच केलेला आहे. मुस्लिम लीग, शीख लीग, आदि अन्यजातीय संस्थाहि त्याचा स्वीकार करून चुकल्या आहेत. भारतीय जनतेनें तर चोहों बाजूंनीं मोठ्या उत्साहानें असहकाराचा अंगीकार केला आहे.

कशामुळें कां होईना, पण मध्यप्रांत व वऱ्हाड यांचें मत कलकत्ता कॉंग्रेसमध्यें असहकाराच्या ठरावाविरुद्ध होतें. परंतु मी असें विश्वासानें

सांगूं इच्छितों कीं, त्या प्रांतांतील जनतासुद्धां असहकाराच्या आंदोलनांत अंतःकरणपूर्वक सहकार देत आहे. कौन्सिल.—बहिष्काराचे बाबतींत तर मध्यप्रांतानें जितकी उत्तम कामगिरी केली आहे, तितकी बहुधा कोणत्याहि दुसऱ्या प्रांतानें केली नसेल. पहिल्या निवडणुकींत या प्रांतांत ६ जागा पूर्णपणें रिकाम्या राहिल्या, आणि इतर १५ जागांसाठीं केवळ एक एक उमेदवार उभा राहिला. त्यामुळें मतदानाची गरजच उरली नाहीं. बाकीच्या जागांसाठींसुद्धां मत देणाऱ्यांची संख्या फारच कमी होती. याशिवाय काँग्रेसच्या प्रचारासाठीं अनेक शहरीं व गांवीं मला जावें लागलें. तेव्हां मला असें स्पष्ट दिसून आलें कीं, या प्रांतांतील जनता पूर्णपणें असहकाराच्या बाजूची आहे. अशा परिस्थितींत असहकाराच्या तत्त्वाची चर्चा करून मी आपला अधिक वेळ घेऊं इच्छित नाहीं. परंतु दोन शब्दांत मी हें सांगूं इच्छितों कीं, हें असहकाराचें आंदोलन म्हणजे भारतीय जनता व भारतीय राज्यकर्ते यांच्यामध्यें सुरू झालेलें एक रक्तपातशून्य व शांतिपूर्ण परंतु व्यवस्थित व गंभीर असें युद्ध आहे. या युद्धांत राज्यकर्त्यांचें सर्व प्रकारचें साहाय्य व संबंध तोडून टाकून आपण आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सर्व आवश्यक गोष्टी करूं शकतों कीं नाहीं, हें भारतीय प्रजा अजमावून पाहात आहे. उलट भारतीय जनतेच्या साहाय्याशिवाय, आपण आपला राज्यकारभार चालवूं शकतों कीं नाहीं, याचा ठाव राज्यकर्तेहि घेत आहेत.

या युद्धांतील आमचें अंतिम लक्ष्य हें आहे कीं, शक्य तितक्या लवकर भारतामध्यें स्वावलंबी व स्वतंत्र संस्था स्थापन करून, आम्ही आमच्या राष्ट्रीय जीवनाचे सर्व व्यवहार सुखानें चालवावेत आणि भारतामध्यें परदेशीं लोक राहिले तरीसुद्धां आम्ही स्वतंत्र होऊन जावें. विदेशी लोकांची दखल न घेतां, आम्ही खरेखुरें व पूर्ण स्वराज्य प्राप्त करून घ्यावें, ही आमची मनीषा आहे, आणि असहकाराचा खरा अर्थ व अभिप्राय थोडक्यांत हाच आहे.

किताब, पदव्या, सरकारी दरबार यांचा त्याग करणें, सरकारी शाळा–कॉलेजें व कोर्ट–कौन्सिलें यांवर बहिष्कार पुकारणें, मेसोपोटेमियामध्यें जाण्यासाठीं लष्करांत भरती होण्यास नकार देणें, विदेशी वस्तूंचा अव्हेर

करणें—इत्यादि असहकाराच्या प्राथमिक कार्यक्रमाच्या विविध अंगांसंबंधीं मी आपणांस विशेष सांगण्याची गरज नाहीं. मी एवढेंच सांगणें अवश्य मानतों कीं, या बाबतींतील आपली कामाची गति नवीन वर्षी अधिक जोराची झाली पाहिजे. या कार्यक्रमाविरुद्ध आमच्या कांहीं देशबांधवांनीं जे आक्षेप घेतले आहेत, त्यांनाहि उत्तरें दिलीं गेलीं आहेत असें मला वाटतें. आणि त्यांचें आधिक समाधान करण्याची जरुरी असेल तर, तें काम माझ्यापेक्षां अधिक योग्य व्यक्तीकडे सोंपाविलें पाहिजे. तथापि मी एक दोन आक्षेपांचा थोडक्यांत विचार करूं इच्छितों.

असहकारितेवर मुख्य आक्षेप हा घेतला जातो कीं, तिचा कार्यक्रम विध्वंसक आहे ––रचनात्मक नाहीं. रचनात्मक कार्याची उपयुक्तता मी नाकारीत नाहीं. परंतु सध्यांच्या काळीं, आपलें मुख्य काम नाश करणें, हेंच आहे.––रचना करणें हें नाहीं; कारण सध्यांच्या राज्यकर्त्यांची प्रतिष्ठा, त्यांची भारतवासीयावरील मानसिक व नैतिक पकड आणि त्यांची इभ्रत, —हेंच त्यांच्या राज्यकारभाराचे आधार आहेत. त्यांचा विध्वंस केल्यानंतर आम्ही अत्यंत लवकर जरूर तें रचनात्मक कार्यहि करूं, असा आम्हांस विश्वास आहे. आधीं संहारणी नंतर उभारणी.

असें असूनहि ज्या सज्जनांचा रचनात्मक कार्यावर विश्वास असेल, त्यांना मी विचारतों कीं, आम्ही आमचें काम करीत असतांना आपण आपल्या आवडीचें विधायक कार्य हातीं कां घेत नाहीं ? राष्ट्रीय शाळांच्या स्थापनेचा काळ अद्याप आला नसला, तर तो केव्हां येणार आहे ? कलकत्ता कॉंग्रेस-पासून आतांपर्यंत, अहमदाबाद व अलीगड येथें, राष्ट्रीय विश्वविद्यालयांचा पाया घातला गेला, तो कोणाकडून ? सरकारी शिक्षणपद्धतीचा नाश करण्यास सिद्ध झालेले महात्मा गांधी व अल्लीबंधु यांचेकडूनच. वेळ प्रत्यक्ष काम करण्याची आहे, टीका करण्याची नव्हे.

शाळा-कॉलेजासंबंधीं मी आणखी एक गोष्ट सांगूं इच्छितों, ती ही कीं, त्यांतील शिक्षण आज जें वाईट आहे तें चांगलें असतें––विषाचे जागीं अमृत असतें––तरीहि त्यांचा त्याग करणें, हा आमचा या काळचा राष्ट्रीय धर्म आहे. मी पूर्वीं सांगितल्याप्रमाणें, राज्यकर्त्यांकडून मिळणाऱ्या सर्व वस्तूंचा त्याग करणें आणि सर्व बाबतींत आपण आपल्या पायावर स्वतंत्र

पणें उभें राहाणें, हें आमचें कर्तव्य आहे. या पवित्र संग्रामामध्यें, ज्या राज्यकर्त्यांचे हात पंजाबमधील अत्याचारांनीं रंगलेले आहेत, आणि ज्यांनीं तुर्कस्तान व इतर मुसलमान यांचा विश्वासघात केलेला आहे, त्यांच्या हृदयांतून निघणारें विष व अमृत--हे दोन्हीहि आम्हांला सारखेच आहेत.

वकिलांनीं वाकिली सोडावी या ठरावावर असा एक आक्षेप घेतला जातो कीं, प्रथम अशीलांनींच कोर्टात खटले नेणें बंद करावें, मग वाकिलांचा धंदा आपोआप बंद पडेल. हें ऐकून मला आश्चर्य वाटतें. कारण कलकत्त्याच्या ठरावांत, वकील व अशील या दोघांनाहि कोर्टावर बहिष्कार घालण्याची प्रार्थना केली आहे. आधीं कोण व मग कोण हा प्रश्न नाहीं. प्रश्न हा आहे कीं, आपल्या या दुःखित व अपमानित देशासाठीं स्वार्थ-त्यागाचा धडा आधीं कोण घालून देणार ? आतांपर्यंत देशाच्या राजकारणाचीं सूत्रें ज्यांचे हातीं होतीं, त्यांनीं सर्वांचे आधीं स्वार्थत्याग करावा, अशी आशा धरण्यांत गैर काय आहे ? या पवित्र संग्रामामध्यें विजय प्राप्त करून घेण्यासाठीं आपल्याला अशा अनेक एकनिष्ठ, सच्च्या व स्वार्थ-त्यागी नेत्यांची आवश्यकता आहे कीं, जे कॉलेजें व विश्वविद्यालयें यांतून बाहेर पडणाऱ्या व इतरहि अन्य हजारों युवकांची सेना संघटित करून तिच्या द्वारें देशामध्यें चारी दिशांना स्वतंत्र संस्था स्थापन करतील. या कार्यामध्यें वकीलवर्गास आपली वकिली सोडून देशाची सेवा करण्यास फार मोठें क्षेत्र आहे.

याशिवाय आणखीहि कांहीं आक्षेप असहकाराच्या कार्यक्रमावर घेतले जातात, परंतु त्यांपैकीं बहुतेक सर्वांमध्यें अर्जुनासारखा मोह, संदेह व कार्पण्य हेच दोष दिसून येतात, असें मला वाटतें. अशा अवस्थेंत माझी ईश्वरापाशीं एवढीच प्रार्थना आहे कीं, " प्रभो, तूं आमच्या व आमच्या पुढाऱ्यांच्या हृदयांतून मोहकार्पण्यादि दोष सत्वर दूर कर, आणि आम्हांस या राष्ट्रीय युद्धासाठीं समर्थ बनव. "

शेवटीं मी आपणां सर्व सज्जनांना अत्यंत नम्रतेनें पण दुःखित अंतःकरणानें विनंति करतों कीं, " या कठिण प्रसंगीं आपलें देशासंबंधीं काय कर्तव्य आहे आणि देशानें कोणत्या प्रतिज्ञा केल्या आहेत व कोणत्या आशा धरल्या आहेत, याचा तुम्ही गांभीर्यानें विचार करा. " भारतीय

जनतेचे प्रतिनिधि म्हणून राष्ट्रीय मंदिराच्या या पवित्र मंडपांत आपण एकत्र जमलेले आहांत. खरोखर आपणच भारताचे विचार, आकांक्षा व आदर्श यांचे निर्माते आहांत आणि आपल्यापैकीं कांहीं नेते तर असे आहेत कीं, हा देश त्यांच्या अमूल्य सेवेनें आदरणीय झाला आहे. अशा सर्व सज्जनांना माझी ही विनंति आहे. देशाची अंतर्गत स्थिति व बाह्य जगांतील परिस्थिति यावर नजर फेकली असतां, असें कळून येईल कीं, अशा प्रकारचा प्रसंग वारंवार येत नसतो. बाह्य परिस्थितीसंबंधीं मी कांहीं बोलून आपला वेळ घेऊं इच्छित नाहीं. पण आपल्या देशांतील दोन गोष्टीं-कडे मी आपलें लक्ष वेधूं इच्छितों. एक सध्यांचें हिंदु–मुस्लिम ऐक्य व दुसरी गोष्ट म्हणजे जनतेंतील असाधारण जागृति.

आपल्याला हें मान्य होईल कीं, या दलित देशाचीं दुःखें दूर करण्या-साठीं प्रथम हिंदु-मुस्लिम ऐक्य व्हावयास हवें. ती पहिली अट आहे. दिल्ली व अमृतसर येथें हिंदु-मुस्लिमांचें जें रक्त एकत्र सांडलें, त्यानें हें ऐक्य पक्कें झालें आहे. तुर्कस्तानचा विच्छेद व खिलाफत प्रकरण यामुळें आमच्या मुसलमान–बंधूच्या डोळ्यांसमोर ब्रिटिश राज्यनीति आणि आपली मातृभूमि भारतवर्ष यासंबंधींचें आपलें कर्तव्य, या दोहोंचें खरें चित्र उभें केलें आहे. अशा अपूर्व प्रसंगीं, देशाचीं दुःखें दूर करण्याचा जो एकमेव उपाय, असहकार, त्यामध्यें पूर्ण उत्साहानें भाग न घेणें, म्हणजे दिल्ली व जालियनवाला बाग येथील हुतात्म्यांचा अनादर करणें नव्हे काय ? मुसलमानांच्या सहकार्याचा हात आतां आपण झिडकारणें म्हणजे हिंदु-मुसलमान ऐक्याचें मूळ उपटून स्वदेशाशीं विश्वासघात केल्याचें पाप आपल्या शिरावर घेणेंच नव्हे काय ?

देशबंधूंनो, राष्ट्राच्या जीवनामध्यें अशा प्रकारचे प्रसंग वारंवार येत नसतात. ही गोष्ट आपण आपल्या हृदयावर उत्तम रीतीनें कोरून ठेवली पाहिजे. अशा अपूर्व प्रसंगीं एक चूक घडली तरी तिचा परिणाम, शतकावर, किंबहुना कायमचा, भोगावा लागतो.

दुसरी गोष्ट म्हणजे जनतेची असाधारण जागृति. या जागृतीची पुरी जाणीव आपणांपैकीं पुष्कळांना झाली असेल वा नाहीं, याविषयीं मला

शंका वाटते. सुशिक्षित पुढारीवर्गास मी अत्यंत नम्रतेनें अशी सूचना देतों कीं, आपण या सार्वजनिक जागृतीचा पूर्ण फायदा जर घेतला नाहीं आणि देशाच्या या चालू लढ्यांत अग्रेसर होऊन आपली निःस्वार्थता व सत्यता यांचा परिचय जनतेला करून दिला नाहीं, तर या लढ्याचा शेवट कांहींहि होवो, पण जनतेचा तुमच्यावरील विश्वास कायमचा उडून जाईल, हें मात्र खास. मी हेंहि इच्छितों कीं, कलकत्ता कॉंग्रेसनें स्वीकारलेल्या कार्यक्रमांमध्यें कोणत्याहि प्रकारें, ढिलेपणा करणें वा मागें हटणें याचा परिणाम त्यांचें पुढारीपण व राजकीय जीवन यांना अत्यंत अहितकर होईल. म्हणून मी आपणा सज्जनांना पुन्हा विनंति करतों कीं, आपण आपल्या कर्तव्याचा व जबाबदारीचा विचार गांभीर्यानें करून त्याप्रमाणें वागण्याचें धैर्य दाखवावें.

" यानंतर मी माझ्या व्यापारी बंधूंना दोन शब्द सांगू इच्छितों. आतांपर्यंत त्यांनीं आपल्या राष्ट्राच्या गरजांकडे व राजकारणाकडे फारसें लक्ष दिलेलें नाहीं. पण बंधूंनो, आपण याच भूमींत जन्म घेतलेला आहे, म्हणून तिची विशेष जबाबदारी आपल्या शिरावर आहे. सध्यांच्या राष्ट्रीय संकटाचे काळांत आपल्या जबाबदारीचा विचार आपण शांतपणें करावा. आतांपर्यंत आपण ब्रिटिश राजवटींत जें धन जमविलें, तें देशाला सुखी करून नव्हे, तर त्याला अधिकाधिक निर्धन बनवून. परदेशाशीं व्यापार करून, अथवा सट्टे खेळून आपण लाखों–करोडों रुपयांची जी जिंदगी जमवितां तिचेविषयीं आपणांस अभिमान वाटतो. पण तसें करतांना, बंधूंनो, आपण असा विचार करा कीं, आपल्या देशाच्या वाढत्या दारिद्र्या-मुळें या वेळीं कमींत कमी तीन कोटी माणसें अशीं आहेत कीं, ज्यांना दिवसाच्या चोवीस तासांत एक वेळेसहि पोटभर अन्न मिळणें कठीण आहे. माझ्या व्यापारी बंधूंनो, आपली ही परीक्षेची वेळ आहे.––आपलें जीवन सफल करण्याची ही नामी संधि आहे. आपण जर बारकाईनें विचार कराल, तर आपणांस हें कळेल कीं, आपण आपली अनेक वर्षांची उपेक्षाबुद्धि व भीरुता यांचा त्याग करून, या राष्ट्रीय यज्ञामध्यें पूर्णपणें भाग घेण्यांतच आपलें व आपल्या भावी व्यापाराचें खरें कल्याण आहे. या क्षणीं आपल्या हातून चूक झाली, तर केवळ आपल्याच नव्हे तर, आपल्या पुढील

पिढ्यांच्या प्रामाणिक व्यापाराचीं दारें कायमचीं बंद होतील. एवढेंच नव्हें तर राष्ट्राविषयींच्या कर्तव्यभ्रष्टतेचें पाप तुम्हांस लागून तुमचा आत्माहि कलंकित होईल. परंतु आपण जर आपल्या संपत्तीच्या आहुति आपल्या हातीं घेऊन या राष्ट्रीय यज्ञाची ज्वाला भडकविण्यासाठीं पुढें सरसावलांत, तर त्या यज्ञाची पूर्तता करण्याचें श्रेय आपल्याला व आपल्या वर्गास कायमचें मिळेल. मला असा विश्वास वाटतो कीं, भारतांतील व्यापारी या परीक्षेमध्यें अवश्य उत्तीर्ण होतील.

भारतांतील तरुण-तरुणींना मी एवढेंच सांगूं इच्छितों कीं, तुम्हांला राष्ट्रीय चळवळीची आपल्यावर जबाबदारी काय आहे, हें समजून घ्यावयाचें असेल तर, अन्य राष्ट्रांतील अशा संग्रामांचे इतिहास वाचा म्हणजे झालें. रशिया, आयर्लंड, इराण, चीन इत्यादि देशांतील क्रांतिकालांत तेथील युव-युवतींनीं आपल्या देशासाठीं जें कांहीं केलें तसेंच तुम्ही येथें कराल, अशी मला आशा आहे. देशांत सर्वांत अधिक स्वार्थत्याग युव-युवतींच्या पवित्र हृदयांतूनच होईल, अशी आशा वाटते.

सर्वसाधारण जनतेला मी काय सांगूं ? कारण आपल्या राष्ट्राच्या सध्यांच्या अधोगतीचा सर्वांत अधिक भार, आणि आमच्या पापांचे घोर परिणाम तिलाच सोसावे लागत आहेत. आणि आतांपर्यंत या राष्ट्रामध्यें ज्या ज्या चळवळी झाल्या, त्यांत सर्वसाधारण जन-समुदाय, सुशिक्षित वर्गाच्या मागें पूर्वी राहिला नाहीं—व पुढेंहि राहणार नाहीं.

खरी गोष्ट ही आहे कीं, या महान् यज्ञामध्यें महान् आहुतीची आवश्यकता आहे.स्वार्थत्याग व बलिदान केल्याशिवाय कोणतेंहि राष्ट्रीय कार्य सफल होत नाहीं. या प्राचीन देशाला दास्य व अपमान यांच्या बंधनांतून मुक्त करणें, हें केवढें महान् कार्य आहे ! तेव्हां आपल्यापैकीं कोणीहि बलिदानाचे बाबतींत मागें पडतां कामा नये. त्यासाठीं अवश्य काय असेल तर, आमच्या हृदयांत सत्य, श्रद्धा व प्रेम यांचें बल निर्माण झालें पाहिजे.

सज्जनहो ! या सर्व गोष्टींचा विचार केला म्हणजे माझें हृदय आशेनें भरून येतें. या चळवळींत अखेरचा जय आपला आहे, याविषयीं मला काडीमात्र शंका नाहीं. त्याचें एक विशेष कारण हें कीं, या चळवळीचें मार्गदर्शन एका अलौकिक व्यक्तीकडे आहे. त्या व्यक्तीनें आपली दीर्घ

तपस्या, आपली अनन्य सत्यनिष्ठा, आपलें स्पष्ट व सरल जीवन, आपली आश्चर्यकारक निर्भयता आणि आपली अनुपम निःस्वार्थता—या गुणांच्या योगानें आपलें आत्मबल वाढविलेलें आहे. तसेच अनेक राजकीय संग्रामांचा अनुभव त्या व्यक्तीचे पाठीशीं आहे. म्हणून भारतांतील दुःखित जनतेनें आपल्या राजकारणाचीं सूत्रें त्या व्यक्तीचे हातीं सोंपविलीं आहेत. राष्ट्रांतील लहान लहान मुलांच्याहि हृदयांत या अलौकिक नेत्यानें स्थान मिळविलें आहे. आपण आपले क्षुद्र व संकीर्ण विचार या वेळीं सोडून देऊन, केवळ चळवळ सफल करण्याकडेच आपली दृष्टि ठेवली पाहिजे.

एवढ्या मोठ्या चळवळीसाठीं पैशाचीहि जरूरी लागेल. ऑ. इं. काँग्रेस कमिटीकडे पैशाचा भरपूर पुरवठा होणें अवश्य आहे. यासाठीं सधन काँग्रेस-भक्तानें आपल्या इन्कमटॅक्सइतकी रक्कम काँग्रेसला दरसाल द्यावी. हा 'राष्ट्रीय टॅक्स' कोणीहि चुकवूं नये अशी माझी विनंति आहे.

काँग्रेसच्या घटनेमध्यें या अधिवेशनांत कांहीं फरक केले जाणार आहेत. त्याबद्दल मी कांहीं सांगूं इच्छितों. माझा जन्म राजपुतान्यांतील एका संस्थानांत झाला आहे. म्हणून माझी अशी इच्छा आहे कीं, आपल्या घटनेंतून संस्थानी प्रजेचा प्रश्न वगळूं नये. संस्थानी जनता हीसुद्धां भारतीय राष्ट्राचें एक प्रधान अंग आहे. एवढेंच नव्हे तर, अनेक संस्थानिकांची आपल्या कार्यास हार्दिक सहानुभूति आहे. आणि जर एखाद्या संस्थानांत राजाची सहानुभूति नसेल, तर प्रजेची खास आहे, याविषयीं मुळींच शंका नको, अशी खात्री मी तुम्हांस देतों. संस्थानिकांचेंहि हित आपल्याशीं सहकार्य करण्यांतच आहे. म्हणून आपण संस्थानिक व त्यांची प्रजा या दोघांना आपल्या घटनेंत स्थान द्यावें; अशी माझी व इतर अनेकांची उत्कंठा आहे.

तसेंच, आपण आपल्या घटनेमध्यें सर्व भारताची राष्ट्रभाषा म्हणून हिंदुस्तानीचा समावेश करावा, कारण तीच भाषा भारतांतील अधिक लोक बोलतात. काँग्रेसच्या कारभारामध्यें विदेशी भाषेचा वापर कमी झाला पाहिजे, म्हणजे त्यामध्यें अधिकाधिक हिंदवासियांना भाग घेणें शक्य होईल."

या भाषणाचा श्रोत्यांवर उत्कृष्ट परिणाम झाला. तेव्हांचा 'म हाराष्ट्र'

लिहितो, " शेठ जमनालाल यांचें भाषण कट्टया असहयोगवाद्यास शोभण्याजोगेंच झालें. त्यांनीं आपलें काम उत्कृष्टपणें बजावलें. "

अध्यक्षांच्या चरित्राची रेखा

स्वागताध्यक्षांचें भाषण संपल्यानंतर पं. बिसनदत्त शुक्ल यांनीं अध्यक्षांची सूचना हिंदींतून केली. तिला अनुमोदन दिलें म. गांधींनीं—आणि तेंहि हिंदींतूनच. मात्र लाला लजपतराय व बॅ. दास यांनीं पाठिंबा देतांना इंग्रजीमधून भाषण केलें. मौलाना महंमदअल्ली यांनीं उर्दूतून भाषण केलें. अध्यक्षांची सूचना टाळ्यांच्या कडकडाटांत सर्वांनीं संमत केली आणि अध्यक्षांना पुष्पहार घालण्यांत आले. मंडपाबाहेर लोक गडबड करूं लागलें—आंत घुसूं लागलें. त्यांना गांधीजी व शौकतअल्ली यांनीं बाहेर जाऊन शांत केलें.

अध्यक्ष श्री. विजयराघवाचार्य हे ७० वर्षांचे नाणावलेले वकील होते. या महत्त्वपूर्ण आधिवेशनास लो. टिळक अध्यक्ष व्हावयाचे, तर ते दिवंगत झालेले, अरविंदबाबू व गांधीजी यांनीं नाहीं म्हटलेलें आणि लालाजी चार महिन्यांपूर्वींच कलकत्ता काँग्रेसचे अध्यक्ष झालेले. तेव्हां नऊ प्रांतापैकीं सहांनीं विजयराघवाचार्यांचें नांव सुचविलें होतें; बाकीच्यांनीं आपलीं मतेंच कळविलीं नाहींत.

विजयराघवाचार्य यांना हिंदु-मुसलमानांचे दंग्यांत जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा झाली होती, पण हायकोर्टांत ते निर्दोषी ठरून सुटले. मद्रासच्या विधिमंडळांत व वरिष्ठ कौन्सिलांत लोकपक्षाचे सभासद म्हणून त्यांनीं त्या वेळीं करतां येईल तितकी तेजस्वी कामगिरी केली. व्हाइसरॉय लॉर्ड हार्डिंजवर बॉम्बफेक झाल्यावर सरकारनें दिल्लीच्या कौन्सिलांत "कॉन्स्पिरेटर्स बिल " आणलें होतें. त्याला विरोध करणारा एकटा ' विकर्ण ' म्हणजे विजयराघवाचार्यच ! सरकाराची ' दिवाणबहादुरी ' तर त्यांनीं लीलेनें लाथाडली. मॉटफर्ड सुधारणांनाहि त्यांनीं रोखठोक विरोध केला होता. यामुळें त्यांचेविषयीं लोकांना आदर वाटत होता.

अध्यक्षीय भाषणाचा आशय

अध्यक्षांनीं भाषण वाचून दाखविण्यास सुरुवात केली, परंतु तें अफाट जनसमुदायाला ऐकूं जाईना. कारण, त्या वेळीं ध्वनि-क्षेपक यंत्रें नव्हतीं. परंतु

ध्वनि-क्षेपकाचें कार्य करणारे बंगाली वक्ते तेथें होते. त्यांपैकीं श्री. बिपिनचंद्र पाल यांनीं टेबलावर उभे राहून तें वाचून दाखविलें. पण तें भाषण म्हणजे एक प्रदीर्घ प्रबंधच होता. प्रस्तुत पुस्तकाचीं ५०।६० पानें भरतील, इतकें विस्तृत तें भाषण होतें. तेव्हां त्याच्या अखेरच्या भागाचा सारांश खुद्द अध्यक्षांनींच निवेदन केला. अध्यक्ष आपल्या भाषणांत म्हणाले,

"आपल्यापुढील कार्य जितकें मोठें आहे, तितकेंच कठीणहि आहे. आपले बादशहा व जगांतील श्रेष्ठ राष्ट्रें यांना आपण एक संदेश पाठविणें अवश्य आहे. आणि तो हा कीं; हिंदुस्थानांतील प्रजेची येथील सरकारनें अत्यंत दुर्दशा केली आहे. ती यापुढें सहन करणें अशक्य आहे. हिंदी लोकांनीं आपला देश समृद्ध व सुरक्षित बनविण्याचा निश्चय केला आहे. तो सिद्धीस जाण्यास विलंब लागेल तर, त्यांचा सर्वनाश होईल, एवढेंच नव्हे तर, ब्रिटिश साम्राज्यहि धोक्यांत येईल व जागतिक शांततेवर पुढें संकट ओढवेल. हिंदी राष्ट्राचा उद्धार व्हावा म्हणूनच आपल्या या काँग्रेस संस्थेचा जन्म झालेला आहे. तिच्या प्रयत्नानें राष्ट्रांत राजकीय जागृति निर्माण झालेली आहे. या राष्ट्रांत स्वायत्त राज्यपद्धतीची स्थापना तत्काळ होणें अवश्य आहे. इंग्लंडच्या व स्वायत्त वसाहतींच्या राज्यघटनेसारखी राज्यघटना हिंदुस्थानला देऊन प्रजेच्या मूलभूत हक्कांचें संरक्षण केलें पाहिजे."

संकल्पित राज्यघटनेचा एक मसुदा अध्यक्षांनीं आपल्या भाषणास जोडला होता. त्याच्या कलमांचें विवेचन त्यांनीं मोठ्या पांडित्यानें केलें आणि त्यासाठीं जगांतील नाना देशांच्या इतिहासाचे आधार दिले. राज्य-सत्तेविषयीं हिंदु व मुसलमान या लोकांच्या परंपरागत कल्पना काय होत्या याचाहि आढावा त्यांनीं विद्वत्तापूर्ण रीतीनें घेतला. पहिल्या महायुद्धांत हिंदुस्थाननें इंग्लंडला किती साहाय्य केलें आणि त्या उपकाराची फेड इंग्लंडनें पंजाब, खिलाफत, रौलट ॲक्ट, वगैरे अन्यायांच्या रूपानें कशी केली, हा ताजा इतिहास त्यांनीं आपल्या भाषणांत उभा केला. हिंदुस्थाना-वरील या अन्यायांचें यथार्थ चित्रण करण्यास, 'बर्कसारखा प्रतिभासंपन्न उदात्त वक्ताच हवा,' असें म्हणून त्यांनीं सरकारच्या एकेका अन्यायावर जोराचे हल्ले चढविले. नंतर ते म्हणाले,

"या सर्व अन्यायांवर रामबाण मात्रा म्हणजे जबाबदार राज्यपद्धति. ती आपल्याला कशी मिळणार? बंडाशिवाय दुसरा उपाय कोणता? याचें उत्तर म. गांधींनीं दिलें आहे. त्यांच्या असहकारितेला 'बेकायदा' म्हणणें चुकीचें आहे. कारण या चळवळीचीं मुख्य तत्त्वें म्हणजे त्याग, आत्मबलिदान व अहिंसा हींच आहेत. सरकार मात्र आपल्या स्वार्थामुळें हिंदी जनतेशीं आक्रमक असहकारिता आचरीत आहे."

यानंतर अध्यक्षांनीं कलकत्ता कॉंग्रेसमध्यें मंजूर झालेल्या असहकारितेच्या ठरावाची छाननी केली आणि त्यांतील कौन्सिल–बहिष्काराची तरफदारी केली. त्याचबरोबर त्यांनीं शाळा–कॉलेजांवरील व कोर्टावरील बहिष्कारावर प्रांजलपणें टीकाहि केली. सर्व जनतेला प्राथमिक शिक्षण मोफत देण्यावर त्यांनीं भर दिला. लोकमत सुजाण व दक्ष असल्याविना कोणतीहि लोकशाही यशस्वी होणार नाहीं, असा इषाराहि त्यांनीं दिला. "सार्वत्रिक शिक्षण व सार्वत्रिक मताधिकार" हाच लोकशाहीचा खरा आधार, असा सिद्धान्त त्यांनीं मांडला. राष्ट्राच्या उभारणीसाठीं शिक्षणाचा प्रसार, कामगारांचे संप, विदेशी मालावर बहिष्कार आणि इंग्लंडांतील मजूर पक्षाशीं सख्य–असा कार्यक्रम त्यांनीं सुचाविला.

"ही कॉंग्रेस म्हणजे 'थर्मापिली'!"

शेवटीं ते म्हणाले, "आपल्या राष्ट्राचें राजकीय व आर्थिक जीवन गेल्या दोन वर्षांत अत्यंत दुर्घट झालें आहे आणि आतां तर आपलीं संकटें कळसास पोंचलीं आहेत. त्यामुळें कॉंग्रेसच्या इतिहासांत, हिंदुस्थानच्या इतिहासांत, हें नागपूरचें अधिवेशन 'थर्मापिली' ठरेल असें मला वाटतें. आपल्या राष्ट्राचा इतिहास घडविण्याची संधि आज तुमच्या हातीं आहे. आपलें भवितव्य आतां दोन माणसांच्या हातीं आहे–मॉंटेग्यू व महात्माजी. या दोघांना आपण दोन संदेश पाठवूं–'हें करा' असा मॉंटेग्यूला व 'हें करूं नका' असा महात्माजींना. या दोघांनीं या संदेशांना मान दिला, तर आपल्या राष्ट्राचा उद्धार या क्षणींच होईल. आम्हांला आर्थिक स्वातंत्र्य सरकारनें तत्काळ दिलें नाहीं, तर आम्ही एक वर्षभरसुद्धां जगूं शकणार नाहीं. इंग्लंडनें आम्हांला बरोबरीचे भागीदार बनवावें; नाहीं तर येथून चालते व्हावें."

अध्यक्षांच्या भाकिताप्रमाणें, नागपूरची काँग्रेस ही खरोखरच थर्मापिली (म्हणजे राणा प्रतापचा हळदीघाट किंवा बाजी प्रभूची पावनखिंड) ठरली, एवढेंच नव्हे तर, ब्रिटिशांना येथून " चालते होण्यास " काँग्रेसनें भाग पाडलें.

काँग्रेसच्या ब्रीदांत बदल

अध्यक्षांचें भाषण झाल्यावर श्री. विठ्ठलभाई पटेल यांनीं अधिवेशनाला आलेले शुभसंदेश वाचून दाखविले. नंतर विषय-नियामक समितीच्या सभासदांची निवड प्रतिनिधींनीं केली.

ता: २७ रोजीं विषय-नियामक-समितीची सभा भरली.

ता. २८ डिसेंबर हा काँग्रेसच्या कामकाजाचा दुसरा दिवस. दुपारीं १२ वा. २० मिनिटांनीं कामास सुरुवात झाली. प्रारंभीं मुलींनीं एक देशभक्तिपर गीत म्हटलें. आणि नंतर श्री. आनंदराव टेकाडे या नागपूरच्या नामांकित कवीनें एक राष्ट्रगीत गायिलें. त्यांतील पुढील समयोचित चरण सर्वांच्या काना-मनांत गुणगुणत राहिले.—

हे राष्ट्ररूपिणी गंगे । घेई नमस्कार माझा ॥
स्वतंत्रतेची मूर्ति त्रिभुवनीं म्हणुनि तुझी कीर्ति ।
स्वातंत्र्याचें दान कुणा कधिं मागुनि कुणिं दिधलें ।
याचक वृत्ति सोड सोड ही—कुणीं तुला हें कथिलें ॥
ध्यानिं आण सामर्थ्य आपुलें स्वयंप्रकाशी गंगे ।
स्वतंत्रता मिळविण्या समर्था तुझी तूंच अभंगे ॥

यानंतर अध्यक्षांनीं पहिला ब्रीदाचा ठराव मांडण्यासाठीं म. गांधींचें नांव उच्चारलें, तेव्हां टाळ्यांचा प्रचंड गजर दीर्घकाल झाला. गांधीजींनीं उभे राहून, सर्वांना वंदन करून, प्रथम हिंदीमध्यें व नंतर इंग्रजीमध्यें, आपलें भाषण केलें.

'या भारतीय काँग्रेसचें ध्येय, सर्व कायदेशीर व शांततापूर्ण साधनांनीं, हिंदी लोकांनीं स्वराज्य प्राप्त करून घ्यावें, हें आहे.'

अशा आशयाचा ठराव गांधींजींनीं मांडला. तो मांडतांना म. गांधींनीं जें भाषण केलें, त्याचा आशय पुढीलप्रमाणें:—

गांधींजींचें भाषण

" हा ठराव काँग्रेसनें एकमतानें स्वीकारला, तर काँग्रेसनें एक अत्यंत उत्तम गोष्ट केली असें मी समजेन. या ठरावावर फक्त दोनच आक्षेप घेतले जातील, असें मला वाटतें. पहिला आक्षेप हा कीं, ब्रिटिशांचा संबंध तोडण्याचा विचार आज आपण कां करावा ? माझें मत असें कीं, कोणत्याहि परिस्थितींत ब्रिटिशांचा संबंध आपल्याशीं कायमचा राहावा असें मानणें हें आपल्या राष्ट्रीय प्रतिष्ठेला कमीपणा आणणारें आहे. आपण सर्व-जण एक चुकीची कल्पना करून बसलों आहोंत. ती दूर करणें हें प्रत्येकाचें काम आहे.

आपल्यावरील अन्यायाचें निवारण करण्यास हें ब्रिटिश सरकार नाखूष आहे, एवढेंच नव्हे तर, तें स्वतःच्या चुका कबूल करण्यासहि तयार नाहीं. जोंपर्यंत सरकारची ही वृत्ति कायम आहे, तोंपर्यंत आपल्याला जें जें म्हणून इष्ट आहे किंवा हवें आहे, तें मागणेंसुद्धां कठीण होऊन बसलें आहे. ब्रिटिश जनता जर हा मामुली न्याय आम्हांला मिळवून देणार नसेल, तर आम्हांला ब्रिटिश राष्ट्रांशीं संबंध ठेवणें जमणार नाहीं, अशी स्पष्ट घोषणा आपण अखिल भारताला—आणि सर्व जगालाहि—ऐकविली पाहिजे.

कांहींहि झालें तरी ब्रिटिशांचे संबंध संपुष्टांत आणलेच पाहिजेत असें मला क्षणभरहि सुचवावयाचें नाहीं. जर ब्रिटिशांचे स्नेह–संबंध हिंदुस्थानच्या प्रगतीला पोषक असतील, तर ते नष्ट करण्याची आमची मुळींच इच्छा नाहीं. पण जर का, आमच्या राष्ट्रीय स्वाभिमानाचे आड त्यांचा स्नेह येऊं लागला, तर मात्र त्यांचें सारें नातेंगोतें तोडून टाकणें हें आमचें नियत कर्तव्य ठरतें.

या ठरावांत उभय पक्षांची सोय आहे. ब्रिटिशांच्या मैत्रीमुळें आपली व ब्रिटिश जनतेची शुद्धि व उन्नति होईल असें ज्यांना वाटतें, त्यांचा समावेश या ठरावांत केलेला आहे आणि ज्यांचा तसा विश्वास नाहीं, त्यांचाहि विचार या ठरावांत केलेला आहे. नमुन्यादाखल मि. ॲन्ड्र्यूज यांचें एकांतिक उदाहरण घ्या. ब्रिटिशांचा स्नेह हिंदुस्थाननें राखण्याची सारी आशा धुळीस मिळाली आहे असें त्यांचें मत. ब्रिटिशांपासून हिंदु-

स्थानानें पूर्ण विभक्त व्हावें—पूर्ण स्वतंत्र व्हावें, असें ते म्हणतात. अशा लोकांनाहि या ठरावांतील ब्रीदामध्यें स्थान आहे.

दुसरें उदाहरण माझ्यासारख्या माणसाचें—किंवा माझे बंधु शौकतअल्ली यांचें. ब्रिटिश सरकार आपले अन्याय दूर करो वा न करो, आपण आपला विकास ब्रिटिश साम्राज्याच्या अमलाखालींच करून घेतला पाहिजे, असें जर आमचें कायमचें मत असतें, तर कॉंग्रेसच्या या नव्या ब्रीदामध्यें आम्हांला स्थान मिळालें नसतें. पण हें नवें ब्रीद लवचिक आहे. त्यामुळें दोन्ही मतांच्या लोकांना तें सामावून घेऊं शकतें. आतां ब्रिटिश लोकांनीं हें समजावून घ्यावें कीं, ते जर आम्हांला न्याय न देतील, तर त्यांच्या साम्राज्याचा विध्वंस करणें हें प्रत्येक भारतीयाचें नियत कर्तव्य ठरेल.

शेवटीं मला कालच्या एका घटनेबद्दल उल्लेख करणें जरूर वाटतें. तुम्हांला जर स्वराज्य हवें असेल, तर तें कसें मिळवावें याचें प्रात्यक्षिकच काल बंगाली प्रतिनिधींच्या छावणींत दिसून आलें. त्या प्रतिनिधींमध्यें किंचित् मतभेद निर्माण झाले. किंचित् वादविवाद झाले आणि किंचित् भांडाभांडीहि झाली. आणि जोंवर जग आहे, तोंवर मतभेद असावयाचेच. पतिपत्नींमध्येंहि मतभेद असतात हें मला ठाऊक आहे–कारण मी अद्याप पति आहें. तसेंच आईबाप व मुलें यांच्यामध्येंहि मतभेद असतात याची मला जाणीव आहे—कारण मी चार मुलांचा बाप आहें. आणि तीं चारी मुलें शरीरानें इतकी धट्टींकट्टीं आहेत कीं, तीं मनांत आणतील तर आपल्या बापाला होता कीं नव्हता करून टाकतील. तेव्हां मला पति म्हणून व पिता म्हणून विविध अनुभव आहेत. आपल्यामध्यें मतभेद, वादविवाद नेहमीं राहणारच हें मी जाणतों.

परंतु मी आपलें लक्ष कालच्या बंगाली छावणींतील घटनेकडे वेधतों, याचें कारण दुसरें आहे. त्या छावणींतील दोन्ही पक्षांना उद्देशून भाषण करण्याची संधि मला लाभली. माझें भाषण त्यांनीं एकाग्र चित्तानें ऐकलें, एवढेंच नव्हे तर, मीं त्यांना जो सल्ला दिला तो त्यांनीं बंधुभावानें, प्रेमभावानें व भक्तिभावानें स्वीकारला. मीं त्यांना उपदेश केला कीं,

मी कांहीं येथें न्याय देण्यास आलों नाहीं. तें काम आपल्या अध्यक्षांचें आहे. पण त्यांना तसदी देण्याचें काय कारण ? तुम्ही त्यांचेकडे

जाऊंच नका. जर तुम्ही शूर असाल, सामर्थ्यवान् असाल, स्वराज्य संपादण्यास आतुर असाल व त्यासाठीं तुम्हांला काँग्रेसचें ब्रीद बदलून घ्यावयाचें असेल, तर तुम्ही आपला क्रोध म्यान करा,आपल्या अंतःकरणामध्यें अन्याय झाल्याची जी भावना उकळत असेल, ती नाहींशी करा; आणि येथल्या गोष्टी येथेंच विसरून जा. ”

बंगाली छावणींतील सर्व प्रकरणाची हकीकत मी आपणाला देत बसत नाहीं. कदाचित् ती आपल्यापैकीं बहुतेकांना माहीतहि असेल. मी आपलें लक्ष फक्त एकाच गोष्टीकडे वेधतों. बंगाली बंधूंचे मतभेद मिटले असें नाहीं. पण त्यांनीं ठरविलें कीं, अध्यक्षांकडे जाऊन त्यांना त्रास द्यावयाचा नाहीं. आणि विषय-नियामक समितीमध्यें किंवा या खुल्या अधिवेशनामध्यें कोणतींहि निदर्शनें करावयाचीं नाहींत. या त्यांच्या निश्चयाबद्दल मी त्यांना धन्यवाद देतों.

या महासभेला जे बंगाली मित्र दृढनिश्चयानें आले आहेत--किंवा दुसरे जे मित्र कांहीं निश्चय करून आले आहेत,-या सर्वांना माझें सांगणें एवढेंच कीं, आपल्या राष्ट्राची उन्नति कशी होईल, आपल्या हक्कांची प्रगति कशी होईल आणि आपल्या राष्ट्राचा मान कसा राखला जाईल-- याच एका गोष्टीचा विचार त्यांनीं करावा. ज्या बंगाली बंधूंना, आपल्यावर अन्याय झाला आहे व आपल्या मस्तकावर घाव बसले आहेत, असें वाटत होतें, त्यांनीं किती शांततेनें व सलोख्यानें वागण्याचें ठरविलें; हें आपणापैकीं प्रत्येकानें ध्यानीं घेतलें पाहिजे.

काँग्रेसच्या या अधिवेशनांत ज्या महान् संग्रामाचा प्रारंभ आपण करीत आहों, तो समाप्त होण्यापूर्वी आपल्याला कदाचित्, नव्हे बहुतेक, रक्ताच्या पाटांतून चालत जावें लागेल. परंतु रक्तपाताचें पाप आपल्यापैकीं कोणी केलें असें मात्र म्हटलें जाऊं नये. यापुढें जन्मास येणाऱ्या पिढ्यांनीं असेंच म्हटलें पाहिजे कीं, ‘ आमच्या पूर्वजांनीं स्वराज्यासाठीं स्वार्थत्याग केला-स्वतःचें रक्त सांडलें, पण इतरांचें कधींच सांडलें नाहीं. ’

मी हें बिनदिक्कतपणें सांगतों कीं, ज्या माझ्या देशबांधवांचीं डोकीं फुटलीं असतील-किंवा फुटण्याचा संभव होता, त्यांचेबद्दल फारशी सहानु-

भूति दाखविण्याची गरज मला वाटत नाहीं. त्यांत काय आहे ? निदान आपल्या देशबांधवांच्या हातून मरण येणें हें बरेंच ! आपण सूड उगवावयाचा कशासाठीं व कोणावर ? म्हणून मी आपल्यापैकीं प्रत्येकाला विनंति करतों कीं, आपल्या एखाद्या देशबांधवाविरुद्ध–मग तो सरकारी नोकरींत असो, गुप्त खात्यांत असो किंवा गुप्तपोलीस खात्यांत असो–तुम्ही आपल्या मनांत क्रोधाचे कढ येऊं देऊं नका; आणि 'ठोशास ठोसा' असें वागूं नका. गुप्तपोलिसानें ठोसा देतांच, तुम्ही त्याला परत ठोसा दिला कीं, तुमचें कार्य संपुष्टांत आलेंच म्हणून समजा.

"अहिंसेनें एका वर्षांत स्वराज्य"

आपला हा संग्राम अहिंसक आहे. म्हणून मी आपल्यापैकीं प्रत्येकाला निक्षून सांगतों कीं, तुम्हीं सूड-भावनेनें कधींहि वागूं नका. तुम्ही क्रोधाचा त्याग केला म्हणजे अधिक शूर बनाल. ज्या बंगाली बंधूंनीं अध्यक्षाकडे जाऊन त्यांचेपुढें आपलें भांडण मांडण्याचें सोडून दिलें, त्यांचें मी अभिनंदन करतों. त्यांचा कित्ता डोळ्यापुढें ठेवून इतर बांधवांनींहि आपल्यावरील अन्याय विसरून जावेत.

या ठरावाला तुम्ही सर्वांनीं टाळ्या वाजवून संमति द्यावी ही तर माझी इच्छा आहेच, पण केवळ टाळ्या वाजवून तुमची जबाबदारी संपणार नाहीं. या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठीं तुम्ही श्रद्धा व निश्चय धारण केला पाहिजे. तुमची ती श्रद्धा आणि तो निश्चय यांना जगांतील कोणतीहि शक्ति हालवूं शकणार नाहीं, इतके ते दृढ असले पाहिजेत. तुम्ही श्रद्धेनें असा निश्चय केला पाहिजे कीं, आपल्याला लौकरांत लौकर स्वराज्य मिळवावयाचें आहे आणि त्यासाठीं जें साधन वापरावयाचें तें, कायदेशीर –म्हणजे सन्मान्य–म्हणजे अहिंसापूर्ण–म्हणजे शांततायुक्त–असलें पाहिजे.

या ठरावानें तुम्ही असा निश्चय करीत आहां कीं, आपल्या दृष्टीच्या टप्प्यांत येणाऱ्या काळांत, या सरकारशीं आपण शस्त्रानें सामना देऊं शकत नाहीं, तर ज्याला मी 'आत्मबल' म्हणतों त्यानेंच हा सामना देतां येईल. आत्मबल ही कांहीं कोणा एका साधूची वा संन्याशाची मिरास नव्हे. तें प्रत्येक मानवाचें—स्त्री-पुरुषाचें—हक्काचें साधन आहे. म्हणून मी माझ्या

देशबांधवांना विनंति करतों कीं, जर आपण हा ठराव स्वीकारणार असाल, तर तो दृढनिश्चयानेंच स्वीकारा. हा ठराव अत्यंत शुभ व अनुकूल परिस्थितींत पुढें आला आहे. तो एकमतानें संमत करण्याची बुद्धि ईश्वर आपणांस देवो. तसेंच त्या ठरावाचें उद्दिष्ट एका वर्षाचे आंत प्राप्त करून घेण्याचें धैर्य व सामर्थ्यहि ईश्वर आपणांस देवो. "

लालाजींची सिंह-गर्जना

श्रद्धा, निर्धार व आत्मबल या तेजस्वी गुणांनीं लखलखणारें गांधीजींचें हें भाषण जेव्हां संपलें, तेव्हां श्रोतृवर्गानें टाळ्यांचा प्रचंड व प्रदीर्घ कडकडाट केला. तशाच आनंदाच्या गजरांत लाला लजपतराय त्या ठरावाला पाठिंबा देण्यास उभे राहिले. त्यांचें भाषण ऊर्जस्वल व उद्दीपक झालें. ते पंजाबचे पुढारी–ब्रिटिश सरकारच्या एकंदर धोरणावर तर त्यांनीं कडक टीका केलीच, पण पंजाब-प्रकरणांतील अन्यायावर ते वाघासारखे आवेशानें तुटून पडले.

ब्रिटिश पार्लमेंटमध्यें लॉर्ड सेलबोर्न यांनीं हिंदी पुढाऱ्यांवर तोंडसुख घेतलें होतें. त्याला उत्तर देतांना लालाजी सिंहासारखे गरजले, " कॉंग्रेसच्या या खुल्या अधिवेशनांत—माझ्या २०,००० देशबांधवांच्या या समूहांत—राष्ट्रांच्या सद्गुणांचें सार असलेल्या या सभेंत—उभा राहून मी त्या लॉर्ड सेलबोर्न यांना असें सांगूं इच्छितों कीं, ' ब्रिटिशांच्या अभिवचनावर किंवा शब्दावर आमचा काडीमात्र विश्वास नाहीं. ब्रिटिशांचें हिंदुस्थानांतील राज्य-शासन म्हणजे मोडलेल्या वचनांची आणि न पाळलेल्या शब्दांची जंत्रीच आहे. '

लॉर्ड डलहौसी, लॉर्ड कर्झन अशा व्हॉइसरायांनीं व लॉइड जॉर्ज यांसारख्या ब्रिटिश पंतप्रधानांनीं आपल्या वचनांना कसा हरताळ फांसला, याचे आधार लालाजींनीं दिले आणि म्हटलें, " हा ठराव म्हणजे ब्रिटिश राष्ट्राला व ब्रिटिश सरकारला दिलेली नोटीसच होय. जुलमी राज्यसत्तेविरुद्ध सशस्त्र बंड करण्याचा कोणत्याहि राष्ट्रास जन्मसिद्ध हक्क आहे, असें मी मानतों; परंतु सध्यां आमच्याजवळ तशीं साधनें नाहींत व इच्छा पण नाहीं. पुढें काय होईल याची चर्चा मी करीत नाहीं. पण आज मात्र आम्हीं हिंसेचा—अत्याचाराचा तिटकारा करतों, व त्यागहि करतों. "

लालाजींचें असें सडेतोड व भावनापूर्ण भाषण समाप्त झाल्यानंतर सर्व मंडपांत 'वंदे मातरम्' च्या गर्जना उठल्या. त्यांच्या अनुमोदनानंतर बॅ. जिना ठरावाला विरोध करण्यास उभे राहिले. ते आपल्या भाषणांत गांधीजींना 'महात्मा' म्हणून न संबोधतां, 'मिस्टर' म्हणूं लागले. त्यांनीं केलेला हा सहेतुक उपमर्द श्रोतृवृंद सहन कसा करील? त्यांनीं आरडाओरड करून जिनांना 'महात्मा' म्हणावयास लावलें.

ठरावांतील 'स्वराज्याचा' अर्थ 'संपूर्ण स्वातंत्र्य' असा होतो आणि त्यामुळें ब्रिटिशांचे संबंध तुटण्याचा धोका संभवतो असा त्यांचा पहिला आक्षेप. आणि साधनांबद्दल ते म्हणाले, "रक्तपाताशिवाय तुम्हांला स्वातंत्र्य कधींहि मिळणार नाहीं. शांततापूर्ण व कायदेशीर साधनांनीं स्वातंत्र्यप्राप्ति होणार नाहीं. लालाजी म्हणतात त्याप्रमाणें तुम्हांला सरकारला नोटीसच द्यावयाची असेल, तर तसा ठराव करा.—ब्रीद बदलूं नका. ब्रिटिश साम्राज्याचा म. गांधींना विनाश करावयाचा आहे. पण तशी शक्ति आपल्याजवळ आहे काय? आज तें केवळ स्वप्न ठरेल! क्रोध, निराशा अशा भावनांना वश न होतां तुम्ही विचार करा."

परंतु जिनांच्या या साऱ्या विरोधाचा परिणाम पुसून टाकण्याइतकें दणदणीत भाषण श्री. बिपिनचंद्र पाल यांनीं केलें. ब्रीदांतील 'स्वराज्य' शब्दामागें 'लोकशाहीचें' हें विशेषण जोडावें अशी त्यांची इच्छा होती. परंतु तशी उपसूचना त्यांनीं मांडली नाहीं, फक्त आपली इच्छा त्यांनीं बोलून दाखविली.

'स्वराज्य' शब्दानें ब्रिटिश साम्राज्याचा संबंध तोडण्याचा ध्वनि निघतो असा बागुलबुवा जिनांनीं उभा केला होता. त्याचें खंडन करतांना पालबाबू म्हणाले, "कसलें आहे ब्रिटिश साम्राज्य? तें दुटप्पी आहे—एक खास गोऱ्या लोकांचें व दुसरें काळ्या लोकांचें. अशा साम्राज्यांत राहण्याचें व गुलामासारखें राबविलें जाण्याचें हिंदुस्थान नाकारीत आहे, हें सर्व जगाला कळविण्याची वेळ आतां येऊन ठेपलेली आहे, आणि तेंच काम या ठरावानें केलें आहे. संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे, असें म्हणणें हा गुन्हा असेल तर, तो करून त्यासाठीं शिक्षा भोगण्यास मी तयार आहें. आम्हांला स्वातंत्र्य पाहिजे आहे आणि त्यासाठीं कोणताहि स्वार्थत्याग करण्यास आम्ही तयार आहों."

यानंतर ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद कर्नल वेजवुड यांनीं भाषण केलें व मॉंटेग्यूचे गोडवे गाऊन, हिंदुस्थानला स्वराज्य मिळालेंच आहे आणि या ब्रीदांतील बदलानें आमच्यासारख्यांचें काम कठीण होऊन जाईल, असें सांगून ठरावाला विरोध केला. नंतर श्री. सत्यमूर्ति, श्री. भार्गव वगैरेंच्या उपसूचना पुढें आल्या. प्रांतवारीनें ठरावावर पुढें मत घेण्याचें अध्यक्षांनीं ठरविलें आणि त्या दिवसाचें कामकाज संपलें.

ब्रिटिश मजूरपक्षाचें सख्य

तिसऱ्या दिवशीं, ता. ३० डिसेंबर रोजीं, सकाळीं ८ वाजून १० मिनिटांनीं, राष्ट्रगीताचें गायन झाल्यानंतर, कामकाजास सुरुवात झाली. प्रारंभीं अध्यक्षांनीं मि. बेनस्पूर यांचें स्वागत केलें. ते ब्रिटिश पार्लमेंटचे सभासद होते आणि 'ब्रिटिश कॉंग्रेस कमिटीचे' प्रतिनिधिहि होते. पण त्यांच्या स्वागताचें विशेष कारण हें कीं, इंग्लंडांतील 'मजूर पक्षाचे' एक प्रतिनिधि म्हणून ते अधिकृतपणें उपस्थित झाले होते.

मि. बेनस्पूर हे भाषणासाठीं उभे राहिले, तेव्हां श्रोत्यांनीं टाळ्या वाजवून त्यांचा गौरव केला; त्याबद्दल आभार मानून ते म्हणाले, "ब्रिटिश मजूर पक्षाची आपल्या स्वातंत्र्य–संग्रामाशीं हार्दिक सहानुभूति आहे, हें निवेदन करण्यासाठींच मी येथें आलों आहें. आमच्या पक्षाला स्वयंनिर्णयाचें तत्त्व मान्य आहे. आणि तें जगांतील सर्व देशांना लागू करावें असें आमचें मत आहे. आमच्या पक्षाच्या गेल्या वार्षिक अधिवेशनांत अशा आशयाचा स्पष्ट ठराव मंजूर झाला आणि त्यांत हिंदुस्थानचा खास उल्लेख करण्यांत आला. कोणत्याहि सरकारला बहुसंख्य जनतेच्या इच्छेविरुद्ध कोणाहि राष्ट्रावर राज्य करण्याचा हक्क नाहीं. हिंदुस्थान खऱ्या अर्थानें स्वतंत्र व्हावा अशीच आमची इच्छा आहे. तें स्वातंत्र्य तुम्ही कोणत्या साधनांनीं मिळवावें हें सांगण्यासाठीं मी येथें आलों नाहीं. त्या कामीं तुमचे नेते समर्थ आहेत. तुमची एकी व उत्साह अलौकिक व आश्चर्यकारक आहे. तुमच्या राष्ट्रवादांत राजकीय व आर्थिक असें उभयविध स्वातंत्र्य अभिप्रेत आहे, हें पाहून मला आनंद वाटतो. सर्व जगांतील भांडवलशाही नष्ट करण्यासाठीं तुम्ही-आम्ही कंबर कसलेली आहे. पूर्वेच्या सहकार्याविना

एकटी पश्चिम काय करणार? आपलें संपूर्ण सहकार्य कायम राहील असा मला विश्वास वाटतो."

मि. ब्रेनस्पूर आपल्या भाषणाचे शेवटीं गांधीजींचा गौरव करतांना म्हणाले, "मी म. गांधींचीं कांहीं भाषणें ऐकलीं. त्यावरून मी देवाची प्रार्थना करतों कीं, महात्माजींसारखी आध्यात्मिक वृत्ति व आध्यात्मिक दृष्टि असलेला नेता आम्हांला लाभो. पाश्चात्य राष्ट्रें जडवादी बनत चाललीं आहेत, याचें आम्हांला अत्यंत दुःख होतें. या भयंकर संकटांतून मुक्त झाल्याविना आमची खरी प्रगति होणार नाहीं. या बाबतींत तुम्ही हिंदी लोक आम्हांला फार मदत करूं शकाल. तुमच्या स्वातंत्र्याची घटिका जवळ आलेली आहे. तुम्ही स्वतंत्र झाल्यानंतर आम्हांला आध्यात्मिक स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कामीं तुमची मदत होईल. मग 'हिंदुस्थान हिंदी लोकांसाठीं' 'इंग्लंड इंग्रजासाठीं' अशा संकुचित घोषणा हवेंत विरून जातील आणि 'अखिल जगत् स्वतंत्र मानवतेसाठीं' हाच एक ऐक्याचा व समतेचा मंत्र सर्वत्र, सदैव घुमत राहील."

अशा झगझगीत आशावादानें सर्व श्रोतृवृंद संतुष्ट झाला. स्वागताध्यक्ष शेठ जमनालालजी यांनीं मि. ब्रेनस्पूर यांचे आभार मानणारें भाषण हिंदींतून केलें व आभाराचा ठराव मांडला. त्याला पुष्टि पं. मोतीलाल नेहरू यांनीं दिली. ठराव एकमतानें मंजूर झाला.

असहकाराचा ठराव संमत

काँग्रेसच्या ब्रीदाचा ठराव जितका क्रांतिकारक, तितकाच क्रांतिकारक असा दुसरा ठराव म्हणजे असहकारितेचा. विषय-नियामक समितीमध्यें बॅ. दास यांचें या ठरावाविषयींचें प्रतिकूल मत बदललें—तें इतकें कीं, खुल्या अधिवेशनांत तो ठराव मांडण्यास ते स्वतःच सिद्ध झाले. तो मांडतांना त्यांनीं मोठें प्रभावी भाषण केलें. ते म्हणाले,

"कलकत्ता येथें असहकारितेचा जो ठराव मंजूर झाला, त्यापेक्षां आतांचा ठराव मवाळ आहे असा आक्षेप कोणी घेतात, पण तो फोल आहे. पंजाब, खिलाफत वगैरे इतके अन्याय सरकारनें आतांपर्यंत केलें आहेत कीं, ते पुनः होऊं नयेत म्हणून आम्हांला स्वराज्य तत्काळ मिळालें पाहिजे. त्यासाठीं

आम्ही आतांपर्यंत योजलेले उपाय निष्फळ ठरले. आतां आम्हांला अनत्याचारी असहकारिता हाच एक तरणोपाय उरला आहे. कलकत्त्याच्या ठरावापेक्षां हा ठराव अधिक व्यापक व सामर्थ्यशाली आहे. जरूर तर कर-बंदीचा उपायहि त्यांत समाविष्ट केलेला आहे. काँग्रेसची हांक आली कीं, वकील, विद्यार्थी, व्यापारी, शेतकरी सर्व वर्गांनीं सरकारी यंत्रणेशीं असलेला आपला सारा संबंध तत्काळ तोडून टाकावयाचा आहे."

या ठरावाला दुजोरा म. गांधींनीं हिंदी भाषण करून दिला. नंतर श्री. पाल, श्री. लाला लजपतराय, बाबू श्यामसुंदर चक्रवर्ती, डॉ. किचलू, शारदापीठाचे श्रीशंकराचार्य, हकीम अजमलखान, मौलाना महंमदअल्ली इत्यादि पुढाऱ्यांनीं पाठिंबा देणारीं भाषणें केलीं. लालाजी म्हणाले, "कौन्सिल-बहिष्काराचे बाबतींत राष्ट्रानें काँग्रेसची आज्ञा इतक्या निष्ठेनें पाळली आहे कीं, तिला तोड उभ्या जगांत सांपडणें कठीण ! लो. टिळकांच्या आत्म्याला या ठरावानें आनंदच होईल."

मौ. हजरत मोहानी यांच्या उपसूचनेला उत्तर देणारें भाषण गांधीजींनीं प्रथम हिंदींतून व नंतर इंग्रजींतून केलें. पं. मालवीय यांना बीदाच्या व असहकारितेचा—हे दोन्ही ठराव नापसंत असल्याची तार आली आहे असें गांधीजींनीं जाहीर केलें. शेवटीं गांधीजी म्हणाले, "प्रत्येकानें आपल्या सदसद्विवेकबुद्धीप्रमाणें चाललें पाहिजे. जालियनवाला बागेंत जनरल डायरच्या हाताखालीं जें पोलीस-दल होतें, त्यांतील एक शिपाई मीं जर असतों, तर वरिष्ठाचा गोळीबाराचा हुकूम मान्य करणें हें मीं पाप मानलें असतें, आणि त्या हुकुमाचा भंग केला असता—मग त्यासाठीं मला गोळी घालून जागच्या जागीं ठार करण्यांत आलें असतें तरी बेहेत्तर ! सैनिकाची शिस्त मी जाणतों. पण धर्मनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा किंवा विवेकनिष्ठा यांना विरोध करणारा हुकूम न मानणें व त्यासाठीं बलिदान करणें हें सैनिकाचें कर्तव्य होय."

असहकारितेचा ठराव संमत करून कृतींत आणण्याचा आदेश देतांना गांधीजी शेवटीं म्हणाले, "सरकारशीं वागतांना असो किंवा आपल्या-आपल्यामध्यें व्यवहार करतांना असो, आपण आपल्या विचारांत, उच्चारांत व आचारांत हिंसेला थारा देतां कामा नये. पूर्ण अहिंसा पाळून आपण

सर्वजण जर असहकारितेचा कार्यक्रम निष्ठेनें पार पाडाल, तर मी पुनः वचन देतों कीं, एका वर्षांतच काय, पण नऊ महिन्यांत आपल्याला स्वराज्य मिळेल. " या उद्गारांनीं श्रोत्यांचीं अंतःकरणें उचंबळून आलीं आणि त्यांनीं मुक्तकंठानें गांधीजींचा जयजयकार केला. ठराव मतास टाकण्यांत आला व तो मंजूर झाला. तसाच ब्रीदाचाहि ठराव संमत झाला. दोन्ही ठरावांना दोन दोनच विरुद्ध मतें पडलीं.

असहकारितेचे दोन विरोधक

असहकारितेचा ठराव कलकत्ता कॉंग्रेसमध्यें मंजूर झाला असला, तरी त्याला कांहीं मुख्य पुढाऱ्यांचा विरोध होता. त्यांतहि बंगाल व महाराष्ट्र यांचा विरोध कडवा होता. वंगभूमि म्हणजे क्रांतिकारकांची कर्मभूमि! तेथील लोकांना गांधीजींचा अहिंसात्मक असहकार कसा पटावा? तसेंच महाराष्ट्र म्हणजे बुद्धिवादाचें आगर! तेथें लो. टिळकांच्या राजकारणाची परंपरा निर्माण झालेली होती. तिच्याशीं गांधीजींचा असहकार विसंगत आहे, अशी प्रमुख टिळकानुयायांची समजूत झाली, त्यामुळें त्यांचा विरोध.

नागपूर येथें गांधीजींना विरोध करण्यासाठीं व कलकत्त्यास रुजलेला असहकारितेचा ठराव उपटून टाकण्यासाठीं बॅ. दास कडेकोट तयारीनिशीं नागपुरास डेरेदाखल झाले होते. त्यांनीं थेट बंगालहून आपल्या खास २५० अनुयायांची तुकडी नागपुरास नेली होती. आणि त्यासाठीं, आपल्या खिशांतून, त्या प्रतिनिधींच्या प्रवास-खर्चाकरितां ३६,००० रुपये खर्च केले होते. खुद्द नागपुरास गेल्यावरहि बंगालच्या गांधीवादी प्रतिनिधींच्या गटाशीं दासबाबूंच्या अनुयायांची खडाजंगी झाली. पण गांधीजींचें मन-जिंकें वक्तृत्व व उदार सहिष्णुता आणि लोकसमुदायांत उसळणारें नवचैतन्य पाहून, देशबंधूंच्या प्रांजल चित्तांतील सारा विरोध विरघळून गेला व असहकारितेचा ठराव खुद्द त्यांनींच मांडला, हा गांधीजींचा मोठाच विजय होता. त्यासंबंधीं नागपूरचें साप्ताहिक पत्र 'महाराष्ट्र' यानें त्या वेळीं अशी मीमांसा केली, "दास-लालाजींचा मतभेद टाळण्यासाठीं असहकारितेच्या ठरावाची पुनर्रचना करण्यांत म. गांधींनीं मोठाच चतुरपणा व मुत्सद्दीपणा दाखविला." अधिवेशन भरण्याच्या आधींचा सारा आठवडा असहकाराच्या

साधक-बाधक भाषणांनीं गजबजलेला होता. दास-लालाजी-केळकर-अणे इत्यादि विरोधी तोफा गडगडत होत्या, तर गांधी-शौकतअल्ली-गंगाधरराव-प्रभृति पुढारी आपलें ' मोहनास्त्र ' सोडीत होते व यशस्वी होत होते.

महाराष्ट्रांतील विरोधाला वाचा फोडण्याचें काम वऱ्हाडचे श्री.दादासाहेब खापर्डे यांनीं केलें. ता. १० डिसेंबर १९२० रोजीं त्यांनीं एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्यावर श्री. बापूजी अणे यांचीहि सही होती, असें कळतें. त्या पत्रकांत कलकत्ता येथें मंजूर झालेल्या असहकारितेच्या ठरावावर पुढील आक्षेप घेतले होते. (१) या ठरावानें कॉंग्रेसचें राजकारणावरील लक्ष कमी झालें आहे, आणि नीति व आत्मबल यांच्या आध्यात्मिक मार्गाकडे तिची शक्ति खर्च होत आहे. (२) हा ठराव सरकारशीं संबंध ठेवण्याचें टाळण्यास सांगत आहे. त्यामुळें सरकाराशीं संघर्ष व संग्राम करण्याची मनोवृत्ति मारली जाईल. (३) असहकारितेच्या कार्यक्रमामुळें कष्ट सहन करण्याची शक्ति वाढेल, पण राजकीय लढ्याला आवश्यक असलेलें व्यावहारिक शहाणपण, उत्साह व बुद्धिमत्ता यांची वाढ होणार नाहीं. (४) कोर्ट—कौन्सिल—कॉलेजें—यांवरील त्रिविध बहिष्कार निष्फळ होणारा आहे. कारण, त्याचा राजकारणाशीं दुरूनहि संबंध नाहीं. (५) एकंदर सर्व ठरावाचा रोख एका व्यक्तीच्या हातीं सर्व सूत्रें देण्याचा आहे. हें एकतंत्री धोरण लोकशाहीच्या विद्यमान युगाशीं विसंगत असल्यामुळें आक्षेपार्ह आहे. म. गांधी कितीहि थोर असले व उच्च नीतिमत्तेचे पुतळे असले, तरी त्यांच्या एकट्याच्या हातीं सर्व सत्ता सोंपविणें योग्य होणार नाहीं. ' होमरूल लीगचें ' ध्येय बदलून त्यांनीं तिला ' स्वराज्य-सभेचें ' जें स्वरूप दिलें आहे, त्यावरून त्यांच्या भावी कॉंग्रेस-कार्याची कल्पना येण्यासारखी आहे.

खुद्द नागपूर कॉंग्रेसमध्येंहि या विरोधाचे वादळी वारे वाहिले, परंतु कलकत्त्यापेक्षां नागपूरला गांधीजींच्या नव्या राजकारणाला अनुकूलता अधिक होती. कलकत्त्यास गांधीजींना पाठिंबा देणारा अव्वल पुढारी एकच उभा होता—पं. मोतीलाल नेहरू—आणि तेहि कोर्ट—कॉलेजावर बहिष्कार हळू हळू घालावा ही आपली उपसूचना गांधीजींनीं स्वीकारल्यावर. नागपूर कॉंग्रेस-मध्येंहि विरोधाचें वादळ उठलें, पण तें गांधीजींच्या शांतपणानें, धीमे-पणानें व अमोघ युक्तिवादानें शमलें आणि दास—लालाजींच्या पाठिंब्यानें

असहकारितेचा ठराव घसघशीत बहुमतानें संमत झाला. या ठरावांत पुढील कार्यें करण्याचा राष्ट्राला आदेश देण्यांत आला.

(अ) पदव्या व मानाच्या जागा यांचा त्याग करावा. स्थानिक संस्थेंतील सरकारनियुक्त जागांचा राजीनामा द्यावा. (ब) सरकारी दरबार, लेव्ही व सरकारी अधिकाऱ्यांनीं केलेले व त्यांच्या सन्मानार्थ भरविलेले सरकारी व निमसरकारी समारंभ यांना हजर राहण्याचें नाकारावें. (क) सरकारी किंवा सरकारची मदत घेणाऱ्या शाळा–कॉलेजांतून आपलीं मुलें हळू हळू काढून घ्यावीं व त्यांच्या जागीं निरनिराळ्या प्रांतांतून शाळा व कॉलेजें प्रस्थापित करावीं. (ड) ब्रिटिश कोर्टांवर वकिलांनीं व त्यांच्या पक्षकारांनीं हळू हळू बहिष्कार घालावा, व खाजगी पंचायत–कोर्टें स्थापन करून त्यांच्या साहाय्यानें आपले भांडण-तंटे मिटवावे. (इ) मेसोपोटेमियांतील लष्करी कामाकरितां सैनिक, कारकून व मजूर वर्गाच्या लोकांनीं भरती होण्याचें नाकारावें. (फ) सुधारणा कायद्यान्वयें सुरू होणाऱ्या कौन्सिलाकरितां उभे राहिलेल्या उमेदवारांनीं आपलीं नांवें परत घ्यावीं व काँग्रेसच्या विनंतीला मान न देतां जे उमेदवार या कौन्सिलाकरितां उभे राहतील त्यांना मतदारांनीं मतें देऊं नयेत. (ग) परकीय मालावर बहिष्कार घालावा.

या ठरावाच्या सरनाम्यांत राष्ट्राची अशी आकांक्षा प्रगट केली होती कीं, "हिंदी जनतेनें आतां स्वराज्य–स्थापनेचा पूर्ण निश्चय केलेला आहे. कारण विद्यमान सरकारवर या जनतेचा आतां विश्वास उरलेला नाहीं. पंजाब–खिलाफत–इत्यादि बाबतींतील अन्याय दूर करण्यासाठीं काँग्रेसनें केलेले सारे प्रयत्न फोल ठरले म्हणून सरकारशीं स्वेच्छेनें असहकार करण्यापासून करबंदीचा कार्यक्रम अमलांत आणण्यापर्यंत संपूर्ण असहकारिता, अहिंसात्मक रीतीनें, अंशतः किंवा पूर्णतः, अमलांत आणण्याचा या राष्ट्राचा निर्धार आहे. त्याची पूर्वतयारी म्हणूनच वरील सात–कलमी कार्यक्रम आंखलेला आहे."

या ठरावाचे शेवटीं कलकत्ता काँग्रेसनंतर राष्ट्रानें कौन्सिल–बहिष्काराचा कार्यक्रम पार पाडला म्हणून जनतेचें अभिनंदन केलें आहे. द्रव्य व श्रम खर्च करून जे उमेदवार कौन्सिलच्या निवडणुकी लढविण्यासाठीं उभे ठाकले होते, त्यांनीं काँग्रेसच्या आदेशानुसार तत्काळ आपलीं नांवें मागें

घेतलीं. आणि मतदारांनीं तर काय? निवडणुकीवर जवळ जवळ पूर्ण बहिष्कारच टाकला. शें. ८० मतदारांनीं मतदानच केलें नाहीं. कैक केंद्रांवरून मतदानाच्या पेट्या रिकाम्याच परत गेल्या. खुद्द सरकारनेंहि आपल्या अहवालांत अशी कबुली दिली कीं, "यापुढील इतिहासावर या बहिष्काराचा प्रभावी परिणाम झाल्याविना राहणार नाहीं. या बहिष्कारामुळें सार्वजनिक क्षेत्रांतील प्रमुख विचारवंत विधिमंडळांत येऊं शकले नाहींत." अशी हीं परित्यक्त विधिमंडळें राष्ट्रांतील लोकमताचीं प्रतिबिंबें नव्हेत असा स्पष्ट इशारा या ठरावानें दिला.

पोलिस व लष्कर यांनीं आपल्या वरिष्ठांच्या आज्ञा मानतांना आपल्या राष्ट्राला कमी लेखूं नये आणि इतर सरकारी नोकरांनींहि राष्ट्रांतील सभासंमेलनांना निर्भयपणें हजर राहावें व राष्ट्रीय आंदोलनांना उघडपणें आर्थिक साहाय्य करावें, अशाहि सूचना या ठरावांत समाविष्ट केलेल्या आहेत. त्याचप्रमाणें राष्ट्रांतील सर्व सार्वजनिक संस्थांना या ठरावानें असें आवाहन केलें आहे कीं,

"पंजाब व खिलाफत यांवरील अन्याय नष्ट व्हावेत म्हणून आणि एका वर्षाचे आंत स्वराज्य स्थापन व्हावें म्हणून कॉंग्रेसशीं संलग्न असलेल्या–व नसलेल्याहि–सर्व संस्थांनीं सरकारशीं अहिंसात्मक असहकार करावा आणि तो यशस्वी होण्यासाठीं हिंदु–मुसलमान, ब्राह्मण–ब्राह्मणेतर इत्यादिकांचें ऐक्य घडवून आणावें आणि अस्पृश्यतेचें निवारण करण्यासाठीं खास प्रयत्न करावेत."

महत्त्वाचे ठराव

ता. ३१ डिसेंबर रोजीं, दुपारीं ३ वाजतां, पद्यगायनानंतर कामकाज पुढें चालू झालें. तिसरा ठराव परराष्ट्रांतील चळवळींविषयीं असा होता कीं, इंग्लंडांतील "ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी" व 'इंडिया' हें वृत्तपत्र यापुढें बंद करण्यांत यावें. आपल्या कार्याची अचूक माहिती परदेशांत दिली जावी हें तत्त्व मात्र या ठरावानें स्वीकारलें. या ठरावाचा अर्थच असा दिसतो कीं, आपल्या राष्ट्राचें सामर्थ्य वाढविण्यावर सर्व भर द्यावा आणि तें एकदां वाढलें म्हणजे, सूर्य उगवतांच त्याची प्रभा

सर्वत्र फांकते त्याप्रमाणें, त्याचा प्रभाव जगभर पडलेला दिसेल. त्यासाठीं निराळे प्रयत्न करावयास नकोत. गांधीजींच्या स्वायत्त व स्वावलंबी धोरणाचा निदर्शक असाच हा ठराव आहे.

चौथ्या ठरावांत दिवंगत आयरिश देशभक्त मि. मॅकास्विनी यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यांत आलें आणि आयरिश जनतेला त्यांच्या स्वातंत्र्य–संग्रामाबद्दल सहानुभूतीचा संदेश पाठविण्यांत आला.

ब्रिटिश व्यापाऱ्यांचा व कारखानदारांचा फायदा व्हावा म्हणून ब्रिटिश सरकारनें हुंडणावळीच्या भावांत जो फरक केला, त्यानें हिंदी व्यापाऱ्याला खो बसला. म्हणून हिंदी व्यापाऱ्यांनीं नव्या दरानें आपले जुने सौदे पुरे करण्याचें नाकारावें असा सल्ला पांचव्या ठरावानें दिला.

१९२१ सालीं बादशहाचे चुलते कॅनॉटचे ड्यूक हिंदुस्थानास भेट देतील, तेव्हां असहकाराच्या अंगीकृत धोरणानुसार, भारतीय जनतेनें त्यांच्या सर्व समारंभावर बहिष्कार टाकावा असा आदेश सहाव्या ठरावानें दिला.

सातव्या ठरावानें, कामगार-वर्गाविषयीं सहानुभूति दाखविली, आणि "कायदा व शांतता" यांच्या नांवाखालीं सरकार कामगारांच्या जीविताला कःपदार्थ लेखतें या पाशवी धोरणाचा धिक्कार केला.

कामगार-वर्गाची संघटना करण्यासाठीं एक समिति नेमण्याचा उपक्रम आठव्या ठरावानें केला.

नवव्या ठरावानें शेतकऱ्यांच्या जमिनी हिरावून घेण्याच्या सरकारी धोरणाचा निषेध केला. विदेशी भांडवलवाल्यांच्या फायद्यासाठीं येथील जनतेचीं घरें व संसार धुळीस मिळविण्याचें हें अविचाराचें व अन्यायाचें धोरण पाहून जनतेनें सरकारशीं असहकार करण्यास पुढें यावें, असेंहि आवाहन या ठरावांत केलें आहे. त्याचप्रमाणें गरीब हिंदी शेतकऱ्यांची धूळधाण थांबविण्यासाठीं हिंदी भांडवलदारांनीं प्रयत्न करावेत अशी विनंति केलेली आहे.

दहावा ठराव श्री. न. चिं. केळकर यांनीं मांडला. "भांडवलवाल्यांच्या —विशेषतः विदेशी भांडवलवाल्यांच्या—फायद्यासाठीं सरकार 'लँड

ॲक्विझिशन ' कायद्याचा दुरुपयोग करून शेतकऱ्यांच्या जमिनी हिरावून घेत आहे आणि त्यांच्या घरादारांची राखरांगोळी करीत आहे. अशा वेळीं असहकार करण्याला सबळ कारण आहे. " अशा आशयाचा ठराव मांडून केळकरांनीं मराठींत भाषण केलें. सर्व अधिवेशनांतील हें एकटेंच मराठी भाषण. या भाषणांत केळकर म्हणाले,

" अशा प्रकारचे ठराव करून राष्ट्रीय सभा हा गोरगरिबांचा मामला आहे. हें आपण दाखविणार आहोंत. सरकारशीं असहकारिता करण्यास आपल्या-जवळ शेंकडों कारणें आहेत, त्यांतलेंच हें एक आहे. कित्येक लोक म्हणतील कीं, सरकारशीं या बाबतींत असहकारिता कां करावयाची ? अर्ज करून पाहावे. परंतु अर्ज केले तर सरकार सांगतें कीं, ' लँड ॲक्विझिशन ॲक्टा'-प्रमाणें जमीन घेण्यांत आली आहे, अथवा सार्वजनिक कार्याकरितां घेण्यांत आली आहे. यापुढें अपील नसतें ! यामुळेंच या बाबतींत सरकारकडे आतां अर्ज–विनंत्या करण्यांत फायदा नाहीं. " महाराष्ट्रांत मुळशी पेट्यां-तील शेतकऱ्यांच्या जमिनी टाटाच्या धरणाखालीं बुडणार होत्या, हें या ठरावाचें प्रासंगिक कारण.

अकराव्या ठरावानें आयुर्वेद व युनानी उपचार पद्धतींचा प्रसार करण्या-साठीं जनतेला प्रेरणा दिली.

बाराव्या ठरावानें संस्थानिकांनीं आपल्या राज्यांत पूर्ण जबाबदारीची राज्यपद्धति तावडतोब सुरू करावी, अशी विनंति त्यांना करण्यांत आली.

तेराव्या ठरावानें पंजाब, दिल्ली वगैरे ठिकाणीं सरकारनें पुनः दडपशाही सुरू केली, म्हणून जनतेनें द्विगुणित उत्साहानें असहकारिता आचरावी असा आदेश दिला.

चौदाव्या ठरावानें प्राथमिक शिक्षण मोफत देण्याचा प्रयत्न राष्ट्रीय हिताचे दृष्टीनें काँग्रेस-संस्थांनीं करावा असें सुचविलें.

हिंदुस्थानची सेवा केल्यामुळें ब्रिटिश सरकारनें हद्दपार केलेले मि. हॉर्निमन यांचेविषयींची कृतज्ञता पंधराव्या ठरावांत व्यक्त करण्यांत आली.

गो-हत्या–बंदीचे ठराव केल्याबद्दल मुस्लिम-संस्थांचे आभार सोळाव्या ठरावांत मानलेले आहेत. आणि त्यांत काँग्रेसचें असें मत नोंदलें आहे कीं, दुधाळ जनावरांचें संरक्षण करणें हें राष्ट्राच्या आर्थिक कल्याणासाठीं आवश्यक

आहे. म्हणून हिंदी जनतेनें दुधाळ जनावरें किंवा त्यांचीं चामडीं परदेशी पाठविण्यास बंदी करावी आणि इतरहि उपायांनीं दुभत्या जनावरांचें संरक्षण करावें.

सतराव्या ठरावानें, ईशर समितीच्या निवेदनाचा घातुकपणा जगजाहीर केला.

अठरावा ठराव कॉंग्रेसच्या घटनेसंबंधींचा आहे.

एकोणविसाव्या ठरावानें शीख-समाजाला असें आश्वासन दिलें. कीं, भारताला स्वराज्य मिळाल्यावर, मुस्लिमादि अल्पसंख्य समाजासारखेंच संरक्षण तुम्हांला मिळेल.

देशांत दुष्काळी परिस्थिति असतांना गहूं, तांदूळ वगैरे धान्य सरकार परदेशीं पाठवीत आहे. त्याचा निषेध विसाव्या ठरावानें केला आणि जनता व व्यापारी यांनीं या धान्य-निर्यातींत सहभागी होऊं नये असा सल्ला दिला.

आफ्रिकेंतील हिंदी बांधवांनीं जो उदात्त लढा शौर्यानें चालविला होता आणि शांततापूर्ण असहकाराचा अवलंब केला होता, त्याला पाठिंबा एकविसाव्या ठरावानें दिला. फिजी बेटांतील हिंदी बांधवांच्या गुलामगिरीची दखल घेऊन त्यांचेवरील अमानुष अत्याचार नष्ट करण्यासाठीं तरी असहकाराच्या मार्गानें स्वराज्य संपादन करणें अवश्य आहे अशी जाणीव या ठरावानें प्रगट केली व दीनबंधु मि. अँड्र्यूज यांच्या कामागिरीविषयीं कृतज्ञता व्यक्त केली.

पुढील दोन ठरावांत कॉंग्रेसच्या नव्या–जुन्या चिटणिसांचीं नांवें असून २४ व्या ठरावानें पुढील वर्षाचें अहमदाबादचें निमंत्रण कॉंग्रेसनें स्वीकारलें.

नव्या वर्षासाठीं पं. मोतीलाल नेहरू, डॉ. अन्सारी व श्री. राजगोपालाचार्य यांना चिटणीस नेमण्यांत आलें व अ. भा. कॉंग्रेस कमिटीचें कार्यालय अलाहाबाद येथें असावें असें ठरविण्यांत आलें.

टिळक स्वराज्य-निधीला भरती

“ टिळक स्वराज्य-फंडाचा ” ठराव मांडतांना गांधीजींनीं हृदयस्पर्शी भाषण केलें. प्रथम ते हिंदींत बोलले. ते म्हणाले, “ स्वराज्यप्राप्तीचा

प्रयत्न करणें, हाच लोकमान्यांची स्मृति चिरंजीव करण्याचा खरा मार्ग आहे. स्वराज्यासाठीं सर्व बंधुभगिनींनीं स्वार्थत्याग करणें आवश्यक आहे. लोकमान्यांच्या स्मारकासाठीं जे लोक स्वार्थत्याग करूं इच्छित नाहींत, ते स्वराज्याला लायक नाहींत असेंच समजलें पाहिजे. मारवाडमध्यें 'मी गांधींची मुलगी आहे' असें म्हणून कोणी स्त्री पैसा गोळा करीत आहे. अशा लबाडीनें तुम्ही फसूं नका.माझ्याकडे किंवा पं. मोतीलालजीकडे तुम्ही वर्गणी पाठवा."

याच भाषणांत गांधीजींनीं काँग्रेसला पुढील वर्षाचें निमंत्रण गुजरात-तर्फे अहमदाबाद येथील दिलें. त्या वेळीं ते म्हणाले, "आमच्या अहमदाबादमध्यें खुर्च्यांची फार कमतरता आहे. येथल्यासारखा भव्य मंडपहि आपल्याला तेथें दिसणार नाहीं. नवीन नियमानुसार फक्त सहा हजारच प्रातिनिधि तेथें येऊं शकतील."

स्वागताध्यक्षांची लाखाची देणगी

त्यानंतर गांधीजींनीं इंग्रजींत भाषण केलें आणि "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे." हा लोकमान्यांचा मंत्र आपल्या कृतीनें सिद्ध करा, असें आवाहन केलें. त्याला फलहि लागलेंच आलें. 'हिंदी सॅन्डो' प्रो. राममूर्ति यांनीं १००१ रुपयांची देणगी जाहीर केली. तशाच दोन सभासदांनीं सोन्याच्या अंगठ्या फंडाला अर्पण केल्या; आणि स्वागताध्यक्ष जमनालालजी यांनीं तर आपल्या उदार देणगीनें सर्वांना चकित व आनंदित केलें. अधिवेशनच्या जिगजिगीनें ते आजारी पडले होते आणि रुग्ण-शय्येवर निजून होते. तेथून त्यांनीं गांधीजीकडे आपला मनोदय कळविला कीं, "मी एक लाख रुपयांची देणगी देऊं इच्छितों. तिचा विनियोग मुख्यतः असहकारितेच्या आदेशानुसार जे आपली वकिली सोडतील, त्यांच्या चरितार्थासाठीं अल्प–स्वल्प मदत देण्याकडे व्हावा." याशिवाय अधिक द्रव्य जमविण्याचें आश्वासनहि जमनालालजींनीं दिलें होतें. हें सर्व जाहीर करून गांधीजींनीं असे समाधानाचे उद्गार काढले कीं, "या फंडाच्या यशाला हा शुभ आरंभच झाला म्हणावयाचा."

काँग्रेसच्या नव्या घटनेचा ठराव गांधीजींनींच मांडला व मोतीलालजींनीं अनुमोदिला. काँग्रेसच्या सभासदत्वाची वर्गणी चार आणे ठेवण्यांत आली

आयुर्वेद व युनानी औषध–पद्धति, संस्थानांतील जबाबदार राज्यपद्धति, पंजाबांतील नवी दडपशाही, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, मि. हॉर्निमन यांची हद्दपारी, दुधाळ जनावरांचें संरक्षण, शीख समाजाचें भावी स्थान, धान्य–निर्यातीला बंदी, आफ्रिका–फिजींतील हिंदी बांधव, कॉंग्रेसच्या नव्या चिटणिसांची नेमणूक व जुन्यांचे आभार–इत्यादि वादग्रस्त नसलेल्या विषयांवरील ठराव अध्यक्षांनीं मांडल्यामुळें भराभर मंजूर झाले.

शेवटीं अध्यक्षांचे आभार मानण्याची सूचना डॉ. मुंजे यांनीं केली. त्या वेळीं त्यांनीं स्वागताध्यक्ष जमनालालजी यांचेविषयीं असे धन्योद्गार काढले कीं, " आभार मानण्याचें काम खरें म्हणजे त्यांचें. पण ते आजारी पडले आहेत. ते आजारी पडले आहेत ह्यांत कांहींच आश्चर्य नाहीं. कारण ही कॉंग्रेस म्हणजे 'न भूतो न भविष्यति' अशा प्रचंड स्वरूपाची आहे. तिची व्यवस्था करण्याचे कामीं त्यांनीं आपल्या शारीरिक स्वास्थ्याकडे बिलकुल लक्ष दिलें नाहीं."

" युगप्रवर्तक कॉंग्रेस "

आभाराच्या सूचनेला पाठिंबा देतांना मि. बेनस्पूर यांनीं कॉंग्रेसच्या व एकंदर हिंदी राष्ट्राच्या गौरवाचें भाषण केलें. " ही युगप्रवर्तक कॉंग्रेस आहे. " असें वर्णन करून ते म्हणाले, " या अधिवेशनांतील ३०००० लोकांची व्यवस्था व शिस्त पाहून मी आश्चर्यचकित झालों. मी माझ्या देशबांधवांना असा संदेश सांगेन कीं, 'हिंदुस्थानांतील सर्व राष्ट्रीय वृत्तींच्या लोकांमध्यें संपूर्ण ऐक्य आहे.' तुमच्या मार्गांत विघ्नें येणार हें खरें, पण तुम्ही आपली चळवळ शुद्ध ठेवली म्हणजे झालें. म. गांधींप्रमाणें दिव्य ध्येयवाद व अचल कार्यनिष्ठा हे गुण आपल्या अंगीं आणण्याचा प्रत्येकानें प्रयत्न करावा. गेल्या महायुद्धामुळें जग हिंसेकडे झुकत चालल्याचें भय वाटत होतें. पण मानवी प्रगतीला आवश्यक अशा त्यागाच्या व शांततेच्या मार्गानें चालण्याचा निर्धार तुम्हीं केला आहे, हें पाहून मला आनंद वाटतो. तुमच्या आध्यात्मिक वृत्तींची आम्हां पाश्चात्यांना फार आवश्यकता आहे. तुम्ही आपला देश स्वतंत्र कराल, याविषयीं मला अणुमात्र शंका नाहीं. पृथ्वीतलावरील इतर देशांनाहि खरें स्वातंत्र्य म्हणजे काय असतें, हें तुम्ही शिकवूं शकाल, अशी मला आशा वाटते."

मौ. महंमदअल्लींनीं पुष्टि दिल्यावर आभाराची सूचना सर्वानुमतें संमत झाली. नंतर मौलाना शौकतअल्लींनीं स्वयंसेवकांचें व स्वागतसमितीचे आभार मानण्याचा ठराव मांडला. त्याला डॉ. किचलू यांनीं अनुमोदन दिल्यावर तो संमत झाला. सरदार वल्लभभाई पटेल यांनीं पुढील काँग्रेसला अहमदाबादचें रीतसर निमंत्रण दिलें व तें स्वीकारलें गेलें.

शेवटीं अध्यक्षांनीं समारोपाचें भाषण केलें. त्यांत त्यांनीं सर्व प्रतिनिधींचा उत्साह व ऐक्यभाव यांचें गुणगान केलें. श्री. आनंदराव टेकाडे यांनीं आपल्या सुस्वर आवाजांत ' जय हिन्द देविची बोला। हर हर महादेव बोला। ' हें राष्ट्रगीत गायिल्यावर, हें अभूतपूर्व, क्रांतिकारक व ऐतिहासिक महत्त्वाचें अधिवेशन समाप्त झालें.

या काँग्रेसचे वेळीं विदेशी कापडाची जंगी होळी करण्यांत आली.

या महान् अधिवेशनाचे अनुषंगानें लहान-लहान सभा-परिषदा किती तरी भरल्या. काँग्रेसच्या मंडपांतच, ' अखिल भारतीय सामाजिक परिषद ' श्री. विठ्ठलभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १ जानेवारी रोजीं भरली. तसेंच ' मुस्लिम लीग ' चेंहि अधिवेशन काँग्रेस–मंडपांतच भरलें. अध्यक्ष डॉ. अन्सारी होते व लीगचें ध्येय काँग्रेसप्रमाणेंच ' स्वराज्य हें होतें. ' ' खिलाफत परिषदेनें 'हि ' असहयोग ही धार्मिक अगत्याची गोष्ट ' आहे असें म्हणून काँग्रेसच्या सुरांत सूर मिळविला.

याशिवाय अ. भा. संस्थानी परिषद, अ. भा. वकील परिषद, अ. भा. मेडिकल परिषद, अ. भा. कोष्टी परिषद, अ. भा. गोरक्षण परिषद-इत्यादि कैक परिषदांची पर्वणी उसळली. त्यांत ' अ. भा. कॉलेज स्टुडंट्स परिषद ' विशेष खळबळीची झाली. ' बादशाही थिएटरांत ' भरलेल्या या परिषदेचे अध्यक्ष लाला लजपतराय हे होते. प्रांतोप्रांतींचे विद्यार्थी आले होते. ' विद्यार्थ्यांनीं राजकारणांत पडावें ' असें आपलें खणखणीत मत लालाजींनीं तरुणांना ऐकविलें; आणि ' मेडिकल व एंजिनियरिंग कॉलेजांतील विद्यार्थ्यांनीं कॉलेजें सोडूं नयेत, कारण त्यांची सैन्यांत भरती होते. ' असा इषारा दिला. तरी खूप खटके उडाल्यावर व भाषणांत मधून मधून प्रश्नोत्तरें झाल्यावर, असहकारितेचा ठराव तरुण हृदयांनीं उत्साहानें मंजूर केला व सरकाराशीं संग्राम करण्यास युवकवर्ग दंड थोपटून उभा राहिला.

पं. जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या अ. भा. स्वयंसेवक परिषदेंतहि चांगलेंच रण माजलें. ' काँग्रेसला एक कोटि लोक आले तरी नीट व्यवस्था राखा. ' असा उत्साहाचा संदेश गांधीजींनीं दिला.

काँग्रेसबाहेर रोज जाहीर सभाहि पुष्कळ होत. जमनालालजींच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या अशाच एका प्रचंड सभेंत गांधीजींनीं आपल्या सत्याग्रहाचें रहस्य सहज रीतीनें विशद केलें. ते म्हणाले, " दादासाहेब खापर्डे यांनीं असहकारितेला विरोध आरंभिला आहे, म्हणून कांहीं असहकारितावाद्यांनीं त्यांना पाणीहि मिळूं दिलें नाहीं असें मला सांगण्यांत आलें. पण हें बरोबर नाहीं. विरोधकावर असा बहिष्कार टाकणें चूक आहे. उलट आपण आपल्या स्वतःच्या हृदयाचें पाणी त्यांच्यासाठीं करून आत्मबलिदान करूं तेव्हांच त्यांच्यासारखे लोक आपल्याला येऊन मिळतील. " केवढा आत्मविश्वास !

• • •

५ गांधीयुगीन कॉँग्रेस

कॉँग्रेसच्या ठरावांना कृतीचे पाय जोडण्याची दक्षताहि नागपूरच्या अधिवेशनानें घेतली. तोंपर्यंत कॉँग्रेसचीं ३४ अधिवेशनें भरलीं होतीं व त्यांत पांचशेंवर ठरावहि पसार झाले होते. पण नागपूरपर्यंत कॉँग्रेसचें स्वरूप बहुधा असेंच असें कीं, वर्षभर सरकारी कचेऱ्यांत किंवा कोर्टांत काम करून थकलेल्या विद्वानांनीं वर्षअखेरीस एखाद्या सुखसोयींच्या शहरीं जमावें, फडर्या इंग्रजींत व खड्या आवाजांत, वर्षांतील राजकीय घडामोडीवर आपलें वक्तृत्व गाजवावें आणि शेवटीं राज्यकारभारांतील कांहीं सुधारणांची मागणी करणारे ठराव टाळ्यांच्या गजरांत मंजूर करावेत. या चार दिवसांच्या आतषबाजीनंतर, पुनः पुढील वर्षाची अखेर उगवेपर्यंत, तीं भाषणें व ते ठराव, झोंपी जात.

ही निष्क्रियता निवारण्यासाठीं गांधीजींनीं कॉँग्रेसच्या कारभाराचें एक नवेंच सुसंबद्ध व कार्यक्षम यंत्र निर्माण केलें. त्यामुळें वर्षाचे बारा महिने व अठरा काळ कॉँग्रेसचें कार्यचक्र सतत फिरत राहिलें. नागपूर कॉँग्रेसनें केवळ आपलें ब्रीदच बदललें असें नव्हे, तर आपलें कर्तृत्वहि विकसित केलें. अ. भा. कॉँग्रेस समितीच्या सभासदांची संख्या ३५० करण्यांत आली. त्या सभासदांतूनच १५ लोकांची वर्किंग-कमिटी निवडण्यांत आली. त्यामध्यें अध्यक्षांशिवाय चिटणीस व खजिनदार हीं अधिकारपदें निर्माण करण्यांत आलीं. कॉँग्रेसच्या खुल्या अधिवेशनाआधीं दोन-तीन दिवस

वर्किंग कमिटीची सभा भरावी व तिनें अधिवेशनांतील ठराव शिजवून तयार ठेवावे असें ठरलें.

काँग्रेसचें कामकाज अखंड चालावें म्हणून गांव, शहर, तालुका, जिल्हा व प्रांत यांच्या कमिट्या स्थापन करण्यांत आल्या. त्यांच्या निवडणुकीचे व अधिकाराचे नियम बांधून देण्यांत आले, एवढेंच नव्हे तर काँग्रेसनें आपल्या कारभाराच्या सोयीसाठीं भाषावार प्रांतहि पाडले.

निश्चित ध्येय, स्पष्ट मार्ग व रोकडी कृति—असा मेळ नागपूर काँग्रेसनें घातल्यामुळें, अधिवेशनांतील ठरावांना कृतीचें रूप तत्काळ प्राप्त झालें. असहकारितेचा ठराव प्रसिद्ध होतांच, राष्ट्रांतील तरुण-वर्गांत संग्रामाचें नवेंच चैतन्य सळसळूं लागलें. परंतु सरकारला वाटलें, हें केवळ हवेंतील बाण आहेत. कलकत्ता काँग्रेसमध्यें असहकाराचें बीजारोपण झालें तेव्हांच सरकारनें आपल्या अधिकाऱ्यांना असें भाकीत लिहून कळविलें कीं, "हा कार्यक्रम शेखमहंमदी आहे—मायावी आहे. त्याच्यामागें शहाणी जनता किंवा वरिष्ठ वर्ग मुळींच जाणार नाहीं. असहकारितेला यश मिळालें, तर सार्वत्रिक अंदाधुंदी माजेल, राजकारणांत अराजक बोकाळेल आणि ज्यांचे या देशांत कांहीं हितसंबंध आहेत, त्या सर्वांचा सत्यानाश होईल. अज्ञान व द्वेष ह्यांच्या पायावरच असहकारितेची इमारत उभी आहे. तिच्या ध्येयांत विधायक कार्याचें बीज मुळींच नाहीं."

परक्या सत्ताधारी सरकारला स्वार्थांधतेनें असें वाटावें यांत नवल काय? पण हिंदुस्थानाच्या आकांक्षांशीं समरस झालेले जे ब्रिटिश मुत्सद्दी होते, त्यांनाहि असहकारितेच्या अभिनव प्रयोगाचें सामर्थ्य आकळलें नाहीं. नागपूर काँग्रेसच्या विषय-नियामक समितीमध्यें कर्नल वेजवुड यांनीं असहकारितेच्या ठरावाला विरोध करतांना असे आक्षेप घेतले कीं, "असहकारितेचा ठराव मंजूर करून तुम्ही आपला कैवार घेणाऱ्या इंग्लंडांतील आपल्या मित्रांची परिस्थिति बिकट करून सोडाल. तुमच्या चळवळीच्या कार्यांत तुम्हांला अडथळा येईल. पोलीस तुमच्यामागें लागेल. राजांशीं एकनिष्ठ राहूं अशा प्रतिज्ञेवर वकील सल्ला करीत असतात; ते असहकारितेच्या चळवळींत काम करूं शकणार नाहींत. तुम्ही अरण्यांत प्रवेश करीत आहां, विधायक कार्यक्रमाला तुम्ही हात घातला पाहिजे."

पण या आक्षेपांचें धुकें गांधीजींच्या आत्मतेजापुढें कसें टिकणार ? त्यांनीं आपल्या ब्रिटिश मित्राच्या या सर्व आक्षेपांचें खंडण खडखडीतपणें केलें. त्यांनीं तेथल्या तेथेंच उत्तर दिलें कीं, " हिंदुस्थानाबाहेर आम्हांला कोणी मित्र नाहीं. या बाबतींत कोणीहि आपला गैरसमज करून घेऊं नये. आमचा उद्धार आमच्याच हातांत आहे. पोलीसचें भय आम्हांला कांहीं नवीन नाहीं. 'दुधामधाचे पाट वाहात असलेली समृद्ध व संपन्न भूमि गांठावयाची असल्यास प्रथम अरण्यांतूनच जावें लागतें.' हें आम्हांस माहीत आहे. स्वातंत्र्याची भूमि गांठावयाची असल्यास दडपशाहीच्या अरण्यांतूनच गेलें पाहिजे हें आम्हांला माहीत आहे. मोझेसच्या अथवा आरॉनच्या पुढारीपणावर आमचा विश्वास आहे. असत्यांतून सत्याला, काळोखांतून प्रकाशाला व मृत्यूंतून जीवनाला ते आम्हांला पोंचवितील अशी आम्हांला आशा आहे. "

अशा निर्भयतेनें व निश्चयानें सर्व राष्ट्र, नागपूर काँग्रेसनें आखून दिलेल्या मार्गानें, वेगानें चालूं लागलें. मतदारांनीं निवडणुकांवर बहिष्कार टाकला. उमेदवारांनीं आपलीं नांवें परत घेतलीं. कोर्टांतून वकील व कॉलेजांतून विद्यार्थी, शेंकड्यांनीं बाहेर पडले. राष्ट्रीय शिक्षणाच्या शाळा प्रांताप्रांतांत फोंफावूं लागल्या. महाराष्ट्रांत प्रो. अण्णासाहेब विजापूरकर यांनीं राष्ट्रीय शिक्षणाची मुहूर्तमेढ पूर्वींच रोवली होती. आतां " टिळक महाराष्ट्र-विद्यापीठ " अस्तित्वांत आलें आणि त्याच्या शाखा सर्वत्र जोमानें काम करूं लागल्या. तसेंच गुजरात विद्यापीठहि आपल्या कार्याचें जाळें पसरूं लागलें.

राष्ट्रीय शाळा, राष्ट्रीय कॉलेजें, राष्ट्रीय विद्यापीठें—यांचें भरघोंस पीकच सर्व देशांत दिसूं लागलें. देशबंधु दासांच्या हांकेसरशीं हजारों बंगाली विद्यार्थी सरकारी कॉलेजांतून बाहेर पडले. त्यांच्यासाठीं, गांधीजींच्या हस्तें, कलकत्ता येथें राष्ट्रीय कॉलेज उघडण्यांत आलें. तसेंच पाटणा येथेंहि. तेथें बिहार विद्यापीठाची स्थापना झाली. अवघ्या चार महिन्यांच्या आंत, अलिगड, अहमदाबाद, पाटणा, काशी, कलकत्ता, पुणें इत्यादि शहरीं राष्ट्रीय विद्यापीठें जन्मास आलीं आणि त्यांच्या छत्राखालीं हजारों विद्यार्थी स्वतंत्रपणानें शिक्षण घेऊं लागले. या राष्ट्रीय विद्यालयांतून पुढील राष्ट्रीय संग्रामाचे सैनिक

निर्माण झाले. जणुं भावी स्वातंत्र्य-संग्रामाचीं हीं शिबिरें होतीं–छावण्याच होत्या.

जसे विद्यार्थी, तसे वकीलहि बाहेर पडले. त्यांच्यावर कुटुंबाच्या चरितार्थाची जबाबदारी. ती काँग्रेस कशी पार पाडणार? ही चिंता नागपूर–काँग्रेसचे स्वागताध्यक्ष जमनालाल बजाज यांना लागली. म्हणून त्यांनीं काँग्रेसच्या ‘टिळक–स्वराज्य–फंडास’ एक लाख रुपयांची देणगी दिली. त्यांतून प्रत्येक गरजू वकिलाला १०० रुपयांपर्यंत मासिक मानधन देण्यांत येत असे. त्यामुळें देशांतील हा बुद्धिमान वर्ग निश्चितपणें काँग्रेसच्या कार्यास कांहीं काळ तरी वाहून घेऊं शकला.

काँग्रेसच्या कार्याला भरती येत होती–उत्साहाच्या लाटा उसळत होत्या. पण त्यांतून प्रत्यक्ष रोकडें कार्य निष्पन्न व्हावें असें नेत्यांना वाटूं लागलें. कार्याला निश्चित दिशा लावण्याचें हें काम बेझवाडा येथें १९२१ च्या एप्रिलमध्यें भरलेल्या अ. भा. काँ. कमिटीनें चांगल्या प्रकारें बजावलें. तिनें एका वर्षांत तीन कार्यें करण्याचा आदेश राष्ट्राला दिला. तीं तीन कार्यें म्हणजे (१) एक कोटी रुपयांचा “टिळक–स्वराज्य–फंड” जमविणें. (२) काँग्रेसचे एक कोटी सभासद करणें. (३) देशांत वीस लाख चरखे चालू करणें. हीं कार्यें प्रत्येक प्रांताला प्रमाणशः वांटून देण्यांत आलीं.

या योजनेचा परिणाम राष्ट्रावर विजेसारखा झाला. अवघ्या चार महिन्यांत टिळक–स्वराज्य–फंड जादा पंधरा लाख रुपयांनीं ओसंडून वाहूं लागला. पन्नास लाख सभासदांनीं काँग्रेसच्या पटावर आपलीं नावें नोंदविलीं. या बाबतींत संकल्पाइतकी पूर्ण सिद्धि पदरांत पडली नाहीं हें खरें, पण काँग्रेसच्या सभासदांची संख्या इतक्या शिगेस पूर्वी कधींच चढली नव्हती. सुमारें वीस लाख चरखे खेड्याखेड्यांतून गुंजारव करूं लागले आणि खादीची टोपी बहुतेक प्रत्येक डोक्यावर दिसूं लागली.

नागपूरच्या काँग्रेसनें सर्व राष्ट्रांत एक नवेंच चैतन्य निर्माण केलें. एखाद्या प्रचंड धरणाचे सारे दरवाजे वर उचलले गेले कीं, त्याचें पाणी बारा वाटा उफाळून पसरतें, तसें राष्ट्रांतील दबलेलें कर्तृत्व असहकारितेच्या चळवळीनें सर्वत्रच जोरानें उसळूं लागलें. ‘एक वर्षांत स्वराज्य’ या घोषणेनें तर राष्ट्रपुरुषाचें अंगन् अंग थरारून गेलें. गांधीजींनीं निर्वाणीची प्रतिज्ञा केली

होती कीं, " ता. ३१ डिसेंबर १९२१ या दिवसाच्या आंत मी स्वराज्य मिळवीन किंवा देहत्याग करीन, निदान सरकारच्या तुरुंगांत तरी डांबलेला आढळेन."

या प्रतिज्ञेचे स्फुलिंग प्रत्येक व्यक्तीच्या हृदयांत पेटले होते. नागपूरचे स्वागताध्यक्ष जमनालालजी यांनीं आपली रायबहादुरीची पदवी तत्काळ परत केली व हत्यारांचे परवानेहि परत केले. एवढेंच नव्हे तर सरकारी कोर्टांत चालणारे आपले सारे खटले त्यांनीं एकदम काढून घेतले. त्यामुळें त्यांचें हजारों-लाखों रुपयांचें नुकसान झालें. पण त्यावर त्यांनीं संतोषानें पाणी सोडलें. मग त्यांनीं गांवोगांव दौरा काढून कोर्टावर बहिष्कार घालण्याचा उपदेश " आधीं केलें मग सांगितलें " या समर्थ भूमिकेवरून केला. त्यांनीं खाजगी पंचायती स्थापन केल्या. त्याचप्रमाणें कोर्टावर बहिष्कार घालणाऱ्या वकिलांना चरितार्थ चालविण्यासाठीं त्यांनीं १ लाख रुपयांची देणगी काँग्रेसला दिली होतीच, त्याशिवाय आणखी १ लाख रुपयांची देणगीहि त्यांनीं पुनः दिली.

खुद्द नागपूर येथें सरकारी शाळा-कॉलेजावर बहिष्कार टाकून जे शेंकडों-हजारों विद्यार्थी बाहेर पडले होते, त्यांचेसाठीं ता. १ जानेवारी १९२१ पासूनच ' असहयोगाश्रम ' सुरू करण्यांत आला व त्यांत दोन-तीन हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली. तसेंच ' टिळक विद्यालयांत' दोन हजार विद्यार्थी राष्ट्रीय वृत्तीनें शिकूं लागले. त्यांतील बहुसंख्य विद्यार्थी महाराष्ट्रीयेतर होते, पण बहुसंख्य शिक्षक महाराष्ट्रीय होते.

पुढें मार्च महिन्यांत दारू-निरोधनाचें आंदोलन सुरू झालें असतां सरकारानें डॉ. चोळकर यांना पकडलें. तेव्हां कोर्टांत या राष्ट्रीय शाळेंतील १५०० विद्यार्थी गेले होते. एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेनें या वेळीं अगदीं उच्चांक गांठला होता.

हें एक उदाहरण झालें. पण अशीं स्वार्थ-त्यागाचीं व राष्ट्रभक्तीचीं असंख्य कृत्यें देशांत वर्षभर घडत होतीं. जणू त्यांच्यांत स्पर्धा चालू होती. ' एक वर्षांत स्वराज्य ' या रोमांचकारक घोषणेनें सर्व राष्ट्राची कल्पना-शक्ति पेटाविली होती, त्याची ध्येयबुद्धि जागी केली होती आणि स्वराज्याच्या संग्रामांत आपण उडी घ्यावी अशी ईर्षा प्रत्येक तरुणाचे

अंतःकरणांत उत्पन्न झाली होती ! कांहीं तरी दिव्य, भव्य, व झगझगीत कृत्य देशासाठीं आपण केलें पाहिजे, तरच आपण स्वराज्याला पात्र होऊं, अशा जाणिवेची ज्योत प्रत्येक अंतःकरणांत पेटली होती.

अहमदाबादचें अधिवेशन

" मनोधैर्य, स्वार्थत्याग व स्वाभिमान या तिन्ही बाबतींत हिंदी जनतेचें पाऊल पुढें पडलें आहे," असा निष्कर्ष कॉंग्रेसच्या पुढील अधिवेशनानें काढला. हें अधिवेशन १९२१ च्या डिसेंबरांत अहमदाबाद येथें भरलें. वर्ष पुरें झालें, पण स्वराज्य कांहीं मिळालें नाहीं हें खरें. परंतु त्यामुळें राष्ट्र कांहीं निराश झालें नाहीं; उलट त्या मंत्रानें देशांत अभूतपूर्व जागृति व कृति केली. याचेंच समाधान व अभिमान अहमदाबादच्या कॉंग्रेसचे मुखावर झळकत होता आणि अधिक जोराची कृति करण्याची इच्छा चमकत होती.

बॅ. चित्तरंजन दास यासारख्या तेजस्वी नेत्याला या कॉंग्रेसचें अध्यक्ष-पद देण्यांत आलें होतें. पण सरकारनें दासबाबूंना कॉंग्रेस भरण्याचे ऐन वेळीं पकडलें. त्यांचें भाषण श्री. सरोजिनीबाईंनीं वाचून दाखविलें आणि अध्यक्षपदाचें काम हकीम अजमलखान यांनीं चालविलें. हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याची मूर्ति म्हणून त्यांचेकडे लोक पाहात होते. विशेष हें कीं, एकदां ते हिंदुमहासभेचेहि अध्यक्ष झाले होते.

गांधीजींचे उजवे हात सरदार वल्लभभाई पटेल हे स्वागताध्यक्ष होते. त्यांचें सारें संघटना-चातुर्य या वेळीं पणास लागलें होतें, आणि त्यांना साहाय्य करण्यास चिटणीस म्हणून श्री. दादासाहेब मावळंकर हे होते. ते आपल्या कामांत अत्यंत दक्ष व चोख. या दोघांच्या अविरत परिश्रमामुळें साऱ्या अधिवेशनांत साधेपणाबरोबर सुबकपणा साधला आणि काटकसरी-बरोबर कार्यक्षमताहि आली.

गांधीजींच्या गांवीं भरणारें हें अधिवेशन ! ते त्यांच्या नांवाला शोभेसें, साधें पण व्यवस्थित व वक्तशीर व्हावयास हवें, अशी सर्वांना तळमळ ! अधिवेशनांतील खुर्च्यांना फाटा मिळाला. (नागपूर कॉंग्रेसमध्यें केवळ १० हजार खुर्च्या व २ हजार बाकें यासाठीं ७० हजार रुपये खर्चीं पडले होते). खादीच्या बैठकी पसरल्या गेल्या. प्रतिनिधींच्या खोल्याहि खादीच्याच. ३॥ लाख रु. किंमतीचें खादी-नगर तेथें उभें राहिलें. ६०० शौचकूप नवीन धर्तीचे उभारले.

जोडे व बूट मंडपांत नेण्यास मनाई; त्यांचेसाठीं नंबराचीं तिकिटें देण्याची व्यवस्था केली. ज्या कोणाला आपल्या पादत्राणांचा विरह सहन होण्यासारखा नव्हता, त्यांचेसाठीं पावली किंमतीची पिशवी विक्रीस ठेवली. विजेचे दिवे मात्र सर्वत्र लखलखत होते. प्रतिनिधींना अहमदाबाद शहराची ओळख करून देण्यासाठीं हिंदी व इंग्रजी "गाइडें" काढलेलीं होतीं. शेंकडों स्वयंसेवक रात्रंदिवस राबत होते—८।८ तासांच्या तीन पाळ्या करून कामांचे डोंगर उभे करीत होते. एकट्या हिशेबी कामांतच १०५ स्वयंसेवक खपत होते. Indian National Service या नांवाचें स्वयंसेवक-पथकच उभारलेलें होतें.

हा सारा व्यवहार अंगावर येऊं नये म्हणून प्रेक्षकांच्या तिकिटांचे दर चढविलेले होते. पूर्वीच्या काँग्रेसमध्यें १०।२० रुपये हे दर असत, पण तेथें तें दर १००, ५००, १०००, ५००० रुपये असे ठेवलेले होते. काँग्रेसचे नियोजित अध्यक्ष देशबंधु चित्तरंजन दास यांचेसाठीं चांदीचें सिंहासन मांडलेलें होतें. काँग्रेसबरोबरच स्वदेशीचें प्रदर्शनहि भरलें होतें. काँग्रेसजनांच्या चित्तरंजनासाठीं एक संगीत परिषदहि थाटलेली होती.

नागपूर काँग्रेसनें प्रतिनिधींच्या संख्येवर मर्यादा घातलेली होती, म्हणून ६२३४ प्रतिनिधिच अधिवेशनास उपस्थित राहूं शकले. पण प्रेक्षक होते लक्षावधि! स्वागताध्यक्ष वल्लभभाई यांनीं पल्लेदार भाषणांची पूर्वीची प्रथा मोडून अगदीं छोटें भाषण केलें. त्याचप्रमाणें ठरावांच्या संख्येलाहि कात्री लावण्यांत आली. १९१९ सालीं अमृतसरच्या काँग्रेसमध्यें ४१ ठराव करण्यांत आले होते. परंतु आतां गांधीयुगांत सरकारच्या निषेधाकडे किंवा आर्जवाकडे काँग्रेसचें लक्ष नव्हतें. आपण स्वतः प्रत्यक्ष जें काम करणार, त्याचे निर्देश करण्यापुरतेच ठराव मांडण्यांत आले. त्यामुळें त्यांची संख्या अहमदाबादेस फक्त ९ च होती.

ठरावांच्या या नवरत्नांमधील कौस्तुभमणि म्हणजे असहकारितेचा ठराव. कलकत्ता व नागपूर या दोन्ही काँग्रेसमध्यें असहकाराच्या कार्यक्रमावर भरपूर चर्चा झाली होती. तेव्हां आतां पुनः वादविवाद कसला?

पण नागपूरनंतर जनतेनें प्रत्यक्ष क्रांति केली होती आणि म्हणून सरकारनें आपल्या दडपशाहीची कमान चढविली होती. त्याचा परिणाम म्हणजे,

नागपूरच्या अधिवेशनांत असहकारितेच्या विरुद्ध असणारे, पं. मालवीय, बॅ. जिना वगैरे पुढारी अहमदाबादेस अनुकूल झाले. सरकारी दडपशाहीला उत्तर देण्यास सर्व राष्ट्र सिद्ध झालें. अहमदाबादच्या कॉंग्रेसमध्यें म. गांधींनींच असहकारितेचा ठराव मांडला. तो हिंदींत व इंग्रजींत वाचण्यास त्यांना ३५ मिनिटें लागलीं, इतका तो विस्तृत होता. त्यानें पूर्वीपेक्षां नवीन बदल केले ते म्हणजे—स्वराज्यप्राप्तीला घातलेली एक वर्षाची अट काढून टाकण्यांत आली, सरकारनें बंदी केलेली स्वयंसेवकांची संघटना वाढविण्याचा राष्ट्रास आदेश देण्यांत आला आणि ज्या प्रांतानें अहिंसेचें व्रत आपल्या अंगीं बाणविलें असेल, त्याला योग्य वाटेल त्या मार्गानें, कायदेभंग करण्याचा अधिकार दिला गेला.

त्याचप्रमाणें खादी, दारूबंदी, जातीय ऐक्य व अस्पृश्यता-निवारण यांवर भर देणाराहि ठराव मंजूर झाला. तसेंच मोपल्यांच्या दंग्यासंबंधानें एक ठराव झाला. कॉंग्रेसची घटना, शिखांचें अभिनंदन वगैरे विषयांवरहि ठराव झाले. ठरावावरील चर्चेत मुसलमान-उलेमांनीं महत्त्वाचा भाग घेतला.

या साऱ्या वादविवादांत निकराचा प्रश्न म्हणजे असहकारितेचाच. कायदेभंगाची शेवटची मजल गांठण्याचा आदेश कॉंग्रेसनें दिलेला असल्यामुळें सर्व प्रतिनिधींचें लक्ष त्यावर केंद्रित झालें होतें. त्यामुळें अधिवेशन संपलें तरी बरेचसे प्रतिनिधि आपापल्या निवासस्थानींच चर्चा करीत होते. हें कळतांच गांधीजी प्रत्येक प्रांताच्या छावणीमध्यें गेले आणि त्यांनीं कायदेभंगाचें तत्त्वज्ञान व कार्यक्रम सविस्तर समजावून दिला. कलकत्त्याच्या ठरावांत ‘ अहिंसा शब्दांत व कृतींत पाळावी ’ असा नियम होता. पण अहमदाबादेस ‘ मनानेंहि अहिंसा पाळावी ’ असा विस्तार करण्यांत आला. काया-वाचा-मनें करून संपूर्ण अहिंसा पाळणाऱ्या लोकांनाच कायदेभंगाचा हक्क प्राप्त होतो असा गांधीजींचा आग्रह. प्रतिपक्षाविषयीं विचारांतहि हिंसा–द्वेष येतां कामा नये असा त्यांचा कटाक्ष. विचार–उच्चार–आचार या तिन्ही बाबतींत अहिंसक असेल, तोच खरा सत्याग्रही असा त्यांचा सिद्धान्त. तो व्यवहार्य कसा होईल याविषयीं भवति–न–भवति झाली.

अहमदाबादच्या अधिवेशनाची कार्यक्षमता इतकी कीं, तें संपलें ता. २९ डिसेंबर रोजीं संध्याकाळीं, आणि ता. ३० डिसेंबर रोजीं दुपारीं १२

वाजतां, चिटणीस मावळंकरांनीं खजिनदार जमनालालजी यांचे हातीं, लक्षावधि रुपयांचे हिशेब व त्यांतून उरलेली ४४,००० रुपयांची शिल्लक ठेवली. अधिवेशनाचा अहवालहि अशाच तत्परतेनें, तपशीलवार, देशी कागदावर छापण्यांत आला.

कॉंग्रेससारख्या राष्ट्ररूपिणी देवतेचें आगमन आपल्या शहरीं झालें, याचें स्मारक करावें अशी इच्छा अहमदाबादकरांची. त्याप्रमाणें १९२८ सालीं अधिवेशनाची २१ एकर जागा १॥ लाख रुपयांस विकत घेण्यांत आली. नंतर मिळालेल्या ६–७ लाख रुपयांच्या देणग्यांतून तेथें गोरगरिबांसाठीं एक रुग्णालय व प्रसूतिगृह बांधण्यांत आलें. त्यांच्या प्रांगणांत एक सुंदर कारंजें बांधलेलें आहे व त्याखालीं पुढील शिलालेख बसविलेला आहे—

" १९२१ सालीं याच स्थानीं भरलेल्या कॉंग्रेसच्या स्मरणार्थ ! "

न लढलेला लढा

कायदेभंग मर्यादित क्षेत्रांतच प्रथम सुरू करावा असेंहि ठरलें. स्वातंत्र्याचें हें रणक्षेत्र कोणतें ? तो मान गुजरातमधील बार्डोली तालुक्याला बहाल करण्यांत आला. इंग्रज येथें आले ते प्रथम सुरतेस—गुजरातेंत. तेव्हां त्यांना घालवून देण्याचें काम गुजरातनेंच पार पाडावें यांत औचित्य होतें. पण बार्डोली निवडण्याचें मुख्य कारण म्हणजे तेथील संघटना. वल्लभभाईनीं रात्रंदिवस घाम गाळून तो तालुका अहिंसक संग्रामास सर्वथैव सिद्ध केला होता.

कायदेभंगाचें रणशिंग फुंकण्यापूर्वी, सत्याग्रहाच्या शास्त्रानुसार, म. गांधींनीं प्रतिपक्षी सरकारला ता. १ फेब्रुवारीं रोजीं निर्वाणीचा खलिता पाठविला आणि त्यांत लिहिलें, " पंजाब, खिलाफत व स्वराज्य याविषयींच्या अन्यायांत भर घालणारे सभाबंदीचे, स्वयंसेवक-बंदीचे व मुद्रण-नियंत्रणाचे नवे तीन जाचक निर्बंध आपण जनतेवर घातले आहेत. ते सर्व सात दिवसांच्या आंत काढून टाकावेत आणि सर्व राजबंद्यांना मुक्त करावें म्हणजे मी चढाईचा कायदेभंग तहकूब करीन. " पण सरकारनें त्याला दाद दिली नाहीं, उलट तुच्छतेचें उत्तर पाठविलें. त्यामुळें बार्डोलीच्या शेतकऱ्यांनीं अहिंसेचें चिलखत चढवून, एका हातांत सत्याची ढाल घेतली व दुसऱ्या हातांत करबंदीची तलवार घेतली. आतां कायदेभंगाच्या संग्रामास सुरुवात होणार ! पण—

संयुक्त प्रांतांतील चौरीचुरा गांवच्या लोकांनीं एक मिरवणूक काढली असतां पोलिसांनीं तिच्यावर गोळीबार केला. तेव्हां चिडून लोकांनीं पोलिस-चौकीला आग लावली–आणि एकवीस पोलिसांनाहि जाळून टाकलें ! या अत्याचाराची वार्ता कळतांच अहिंसाप्रेमी गांधीजींनीं बार्डोलीचा कायदेभंग रद्द केला व स्वतः उपोषण आरंभिलें.

भरधांव चालणाऱ्या आगगाडीला एकदम ब्रेक लागलें म्हणजे तिच्या उतारूंना जसे धक्के बसतात, तसे ऐन तोंडाशीं आलेली बार्डोलीची कायदे-भंगाची चळवळ चौरीचुऱ्याच्या हिंसेमुळें अकस्मात् स्थगित झाली, याचे हादरे कॉँग्रेसजनांना चांगलेच बसले. केवळ निराशाच नव्हे, तर आत्म-विश्वासाची डळमळहि राष्ट्रांत उत्पन्न झाली. सरकारला वाटलें, आतां राष्ट्र कॉँग्रेसच्या मागें राहिलें नाहीं आणि कॉँग्रेस गांधींच्या मागें राहिली नाहीं. गांधी आतां एकटे–उघडे पडले आहेत, असें वाटून सरकारनें आपल्या दडप-शाहीचा पंजा त्यांचे अंगावर टाकला. ता. १० मार्च १९२२ रोजीं गांधीजींना पकडण्यांत आलें आणि दुसरे दिवशींच, वयाचे ५३ वे वर्षी, त्यांना ६ वर्षांच्या कैदेची शिक्षा झाली.

गांधीजी येरवड्याच्या तुरुंगांत जाऊन पडले आणि कॉँग्रेस निष्क्रियतेच्या खड्डयांत पडली. गांधीजींच्या गैरहजेरींत कॉँग्रेस–पुढाऱ्यांच्या कर्तृत्वाचा कसच लागला. गांधीजींचा सत्याग्रहाचा लढाऊ कार्यक्रम झेपत नाहीं, अशीच कबुली सर्वांना द्यावी लागली. लढ्याचे अभावीं काय ? एक म्हणजे कौन्सिल–प्रवेश. त्याचा आग्रह दास–नेहरू–लालाजी हे पूर्वीपासून धरीतच होते. त्यांच्या शांत, थंड, बिनधोक अशा कार्यक्रमाला साहजिकच राष्ट्रांत वाढता पाठिंबा मिळूं लागला. असा फेरबदल कॉँग्रेसच्या कार्यक्रमांत घड-वून आणूं पाहणाऱ्या कॉँग्रेसजनांना 'फेरवाले' अशी संज्ञा प्राप्त झाली.

याच्या उलट ते 'नाफेरवाले'. गांधीजींच्या शब्दप्रामाण्यावर त्यांचा विश्वास. तेहि सत्याग्रहाच्या अग्निरेषेवर उभे राहण्यास धजत नव्हते. कॉँग्रेसला आपल्या मागें नेण्याचें सामर्थ्य त्यांचे अंगींहि नव्हतें. त्यांनीं गांधीजींच्या विधायक कार्यावर भर देण्याचें ठरविलें. राजेंद्रप्रसाद, राज-गोपालाचार्य, जमनालाल बजाज व देवदास गांधी–या चौघांचें एक मंडळ १९२३ सालीं विधायक कार्यक्रमाचा प्रचार करण्यासाठीं सर्व देशभर

फिरलें. अ. भा. खादी-मंडळ, कायदेभंग समिति, सत्याग्रह समिति, हिंदुस्थानी सेवादल–अशा विविध संस्था काढून कॉंग्रेसनें आपल्या कार्याचा नंदादीप तेवत ठेवला होता.

गया कॉंग्रेसचें कार्य

१९२२ सालीं गया येथें बॅ. दास यांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसचें अधिवेशन भरलें. त्यांत कौन्सिल–प्रवेशाच्या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठीं पांच दिवस लागले. आणि शेवटीं कौन्सिलावरील बहिष्कार कायम ठेवावा, असाच ठराव करण्यांत आला. त्यामुळें साहजिकच ' फेरवाला पक्ष 'नाखूष झाला. त्यांच्या असंतोषाचा स्फोट दिल्ली येथील जादा कॉंग्रेसमध्यें झाला. मौ. आझाद हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. ' फेरवाल्या ' पक्षानें उचल खाल्ली आणि कौन्सिलचीं दारें कॉंग्रेस–जनांना उघडण्यांत आलीं, एवढेंच नव्हे तर, कौन्सिल-प्रवेशाविरुद्ध प्रचार करण्यासहि मनाई करण्यांत आली. ठरावांत असें स्पष्ट म्हटलें गेलें, " ज्यांच्या सदसद्विवेकाला पटत असेल, त्या कॉंग्रेसजनांना येत्या निवडणुकीच्या वेळीं उमेदवार म्हणून उभे राहण्यास परवानगी असावी, कौन्सिल–प्रवेशाविरुद्ध सर्व प्रचार तहकूब करण्यांत यावा. "

कोकोनाडा व कौन्सिल–प्रवेश

१९२३ सालीं कोकोनाडा येथें मौ. महंमदअल्ली यांचे अध्यक्षतेखालीं कॉंग्रेस भरली. त्यापूर्वी येरवड्याहून म. गांधींचा मौलाना महंमदअल्लींना देवीदास गांधीमार्फत एक संदेश आला होता. त्यांत गांधीजींनीं फक्त एक तात्त्विक विचार सांगितला होता. तो असा कीं, " माझीं मतें पूर्वी होतीं, तींच कायम आहेत. पण ती तुम्हांला पटत नसतील, तरी तुमच्या–माझ्या प्रेमसंबंधांत कमीपणा येणार नाहीं. "

एवढ्याशा सुतानें महंमदअल्ली कौन्सिल-प्रवेशाच्या स्वर्गास चढले, " कौन्सिल प्रवेशाला गांधीजी हरकत घेणार नाहींत असा दिव्य संदेश एक पक्षी माझ्या कानाशीं गुणगुणत आहे. " असें काव्यात्मक वर्णन करून महंमदअल्लींनीं कौन्सिल-प्रवेशाची तरफदारी केली. गांधीजींचा मान राखण्यासाठीं मुख्य ठरावांत असें म्हटलें गेलें. कलकत्ता, नागपूर, अहमदा-

बाद, गया व दिल्ली, (जादा अधिवेशन) येथें संमत झालेल्या असहकारितेच्या ठरावाला ही काँग्रेस पाठिंबा देते आणि कौन्सिल–बहिष्काराच्या बाबतींत आपलें धोरण बदललेलें नाहीं असें जाहीर करते. परंतु कौन्सिलांत शिरून असहकारिता करतां येते असा सोईस्कर अर्थहि फेरवाल्या पुढाऱ्यांनीं लावला. त्यामुळें काँग्रेस-प्रवेशाच्या चळवळीला जोर चढला.

नागपूरचा झेंडा–सत्याग्रह

नाफेरवाल्या पक्षापुढें चरखा, अस्पृश्योद्धार इत्यादि सौम्य व सोंवळ्या कार्यांशिवाय दुसरें कांहींच नव्हतें. पण १९२३ सालीं नागपूरच्या सरकारी अधिकाऱ्यांनीं त्यांना सत्याग्रहाची संधि आणून दिली. तेथील पोलिस-अधिकाऱ्यांनीं ' सिव्हिल-लाईन्स 'मध्यें १४४ वें कलम पुकारून काँग्रेसचा तिरंगी झेंडा मिरवीत नेण्यास दोन महिने बंदी केली. काँग्रेस ही कायदेशीर संस्था होती आणि तिचा कार्यक्रम तर पूर्ण अहिंसात्मक, शांततापूर्ण असाच होता. तेव्हां तिच्या निशाणाला बंदी करणें म्हणजे नेतृत्वहीन व पराभूत अशा अवस्थेंत सरकारनें तिच्यापुढें नाक खाजवून चिडविणेंच होय, असें काँग्रेसजनांना वाटलें. गांधीजींच्या गैरहजेरींत गांधीशिष्यांच्या राष्ट्रप्रेमाची, सत्याग्रहनिष्ठेची व कर्तृत्वशक्तीची कसोटी लागण्याचा हा प्रसंग होता.

आणि या कसोटीस गांधीजींचे अनुयायी पुरेपूर उतरले हें किती गौरवास्पद ! झेंडा–बंदीचा अन्याय्य हुकूम मोडण्यासाठीं सत्याग्रह करण्याचा चंग काँग्रेसजनांनीं बांधला. त्यांचें नेतृत्व जमनालालजी बजाज यांचेकडे आलें. त्यांनीं असें ठरविलें कीं, ' राष्ट्रीय निशाण हें राष्ट्रीय मानचिन्ह होय. त्याच्या इभ्रतीसाठीं सुरू झालेल्या चळवळींत मी भाग घेणें हा माझा धर्मच आहे. या धर्माचें आचरण करतांना जीं जीं संकटें येतील, हाल भोगावे लागतील व कष्ट करावे लागतील, ते सर्व आनंदानें व शांतपणें सहन करणें हेंच माझें कर्तव्य. '

ता. २२ एप्रिल रोजीं संध्याकाळीं नागपूर येथें प्रचंड सभा भरली. तिच्या अध्यक्षपदावरून जमनालालजींनीं जाहीर केलें, " आपल्या राष्ट्रीय निशाणाचा अपमान आपण कधींहि सहन करणार नाहीं. त्या अपमानाचें खंडन करण्यासाठीं ता. १ मेपासून सत्याग्रह सुरू केला जाईल. "

सत्याग्रहाची ही हांक सर्व राष्ट्रानें ऐकली. मुंबई, कर्नाटक, पंजाब, बंगाल, बिहार, तामिळनाड वगैरे नाना प्रांतांतून युवकांचीं पथकें नागपूर-कडे रवाना झालीं. वल्लभभाई पटेल हेहि अग्रभागीं चमकूं लागले. राष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतून थेंबाथेंबानें जमणाऱ्या सत्याग्रहींचें सरोवरच बनलें तें नागपूर !

ता. १ मेचा दिवस उजाडला. फक्त दहा सत्याग्रही तरुण हातांत तिरंगी झेंडा घेऊन ' असहयोगाश्रमांतून ' योद्धयांच्या उत्साहानें निघाले. " सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ता हमारा. " हें स्फूर्तिदायक रणगीत गात गात ते शांति सैनिक पुढें पुढें चालले. अशी ही मिरवणूक तीन मैल चालली. वाटेंत जागजागीं या सत्याग्रही वीरांना पुष्पहार घालून त्यांची पूजा करण्यांत आली. अशा वीरोचित वैभवानें ते सत्याग्रही वीर रण-मैदानावर आले.

त्या झेंडा–चौकांतील दृश्य रोमांचकारक होतें. दहा ध्वजधारी वीर दिग्गजाप्रमाणें उभे होते. त्यांचेमागें दोन फर्लांगांवर दुसऱ्या दहा वीरांची तुकडी सज्ज होती. या दोन्ही पलटणींच्या मध्यभागीं जमनालालजी उभे होते. त्यांच्या पाठीमागें तीन फर्लांगावर हजारों–हजार नागरिक जमले होते. उलट बाजूला पोलिसांचें प्रचंड दळ सशस्त्र खडें होतें.

सरकारचा मनाई–हुकूम मोडून जे सत्याग्रही वीर तिरंगी झेंडा घेऊन पुढें जात, त्यांच्या डोक्यावर, पाठीवर, हातावर लाठ्यांचे तडाखे पोलिस देऊं लागले. निशाणाच्या काठ्यांनींहि स्वयंसेवकांना बडवूं लागले आणि ते जमिनीवर पडतांच, बेवारशी कुत्र्याप्रमाणें, त्यांना फरफटत ओढून गटारांत फेकून देऊं लागले ! हें ऐकतांच सारें राष्ट्र खवळून गेलें. सर्व राष्ट्रांतून सत्याग्रह्यांचीं पथकें नागपुरांत लोटूं लागलीं. त्या सर्वांचा सामुदायिक सत्याग्रह ता. १८ जून रोजीं करण्याचें ठरलें.

हें कळतांच सरकार बावरलें. त्यांनीं आदले दिवशींच, ता. १७ रोजीं, रात्रींच्या काळोखांत, २५० सत्याग्रहींना, झोंपेंत असतांनाच, गिरफदार केलें ! त्यांत स्वयंपाक करणाऱ्या लोकांनाहि पकडलें. त्या सत्याग्रह्यांचे सेनापति जमनालालजी यांनाहि अटक झाली. आचार्य विनोबा भावेहि पकडले गेले. सर्वांना १।१ वर्ष कैदेची शिक्षा देण्यांत आली. पण

जमनालालजी हे प्रमुख. म्हणून त्यांना १॥ वर्ष सक्त मजुरी व ३००० रुपये दंड ठोठावण्यांत आला. त्याच्या निषेधार्थ मुंबईचा दाणाबाजार बंद पडला व कलकत्ता, अकोला येथेंहि हरताळ पडला.

३००० रुपये दंड वसूल करण्यासाठीं सरकारचे पोलिस जमनालालांचे घरीं गेले आणि त्यांनीं त्यांची मोटार, बगी व ४०० रुपये असलेली पेटी जप्त केली. मोटार व बगी यांचा लिलाव सरकारनें दोनदां पुकारला, पण तो घेतो कोण ? इतका देशद्रोह करतो कोण ? कित्येक दिवस त्या जप्त झालेल्या वस्तु वर्ध्यासच पडून राहिल्या. शेवटीं मोटार राजकोटला पाठविण्यांत आली. तेथेंहि ती विकत घेण्यास एकहि हिंदी माणूस पुढें आला नाहीं. एका इंग्रज अधिकाऱ्यानें ती थोड्या किंमतीस घेतली.

सरकारी दडपशाही वाढत चालली, पण त्याबरोबरच जनतेची संग्रामाची शक्तिहि वाढत गेली. नागपूरचा तुरुंग भरून गेला, म्हणून अकोल्याचा तुरुंग सरकारनें उघडला. पण तोहि भरला. तुरुंगांत चक्की, अंधारकोठडी अशा क्रूर शिक्षा दिल्या गेल्या, तरी सत्याग्रहाला भरतीच येत गेली. सरदार वल्लभभाईनीं जमनालालजींची जागा घेतली. १०९ दिवस अखंड सत्याग्रह चालला. १८४८ सत्याग्रही तुरुंगांत गेले. त्यांत विद्यार्थी होते, तसेच व्यापारी होते; शेतकरी होते, तसेच शिक्षक होते; वकील होते, तसेच डॉक्टर होते--सर्व जातींचे, सर्व धर्मांचे, सर्व पक्षांचे लोक होते. त्यांची ती जूट, ती शक्ति, ती शिस्त, ती धडाडी पाहून सरकार नरमलें.

साऱ्या राष्ट्राचा हा हुंकार ऐकतांच सरकारनें माघार घेण्याचें ठरविलें. त्यांनीं तडजोडीचें बोलणें केलें. आणि ता. १८ ऑगस्ट रोजीं, दुपारीं १२ वाजतां, शंभर स्वयंसेवक, हातांत तिरंगी निशाणें फडकवीत, सिव्हिल लाइनच्या निषिद्ध भागांतून विना अटक पुढें गेले ! सत्याग्रह सिद्धीस गेला ! ता. ३ सप्टेंबर रोजीं सर्व सत्याग्रही बंधमुक्त झाले.

काँग्रेसच्या विश्वविजयी तिरंगी झेंड्याची शान राखली गेली.

● ● ●

६ समाजवादाची दीक्षा

१९२४ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत गांधीजी बंधमुक्त झाले. त्यांना शिक्षा सहा वर्षांची झाली होती, तरी ते आजारी पडले म्हणून ता. १२ जानेवारी रोजीं त्यांच्या पोटावर शस्त्रक्रिया करण्यांत आली. नंतर सरकारनें त्यांना ५ फेब्रुवारी रोजीं बिनशर्त मुक्त केलें. प्रकृति सुधारण्यासाठीं ते मुंबईजवळ समुद्रकांठीं जुहू येथें राहिले. त्या वेळीं त्यांचेपुढें महान प्रश्न उभा होता, तो म्हणजे दुभंगलेली काँग्रेस सांधावी कशी ?

असाच प्रश्न अशाच नेत्यापुढें दहा वर्षांपूर्वी खडा होता. सहा वर्षांचा बंदिवास भोगून लो. टिळक १९१४ सालीं मंडालेहून पुण्यास परत आले होते. त्यांच्या गैरहजेरीच्या सहा वर्षांत देशामध्यें अंधार पसरला होता. त्यांच्या जवळच्या अनुयायांतहि फाटाफूट झाली होती. ती मिटवून, काँग्रेस-मध्यें शिरून, तिला शक्तिशाली बनवून स्वराज्याचा लढा पुढें कसा रेटावा, हीच एक चिंता त्या महापुरुषाला होती. त्यांनीं व्यापक राष्ट्र-दृष्टीनें, बेळगांव येथें, काँग्रेसच्या ब्रीदवाक्यावर सही करून, तींत प्रवेश केला व 'होमरूल—लीग' स्थापून व लखनौ काँग्रेसमध्यें हिंदु-मुसलमानांचें ऐक्य करून स्वराज्याचा लढा पुढें आमरण चालविला.

तसेंच महत्कृत्य महात्माजींनीं १९२४ सालीं बेळगांव येथेंच पार पाडलें. त्यांच्या जुहूच्या वास्तव्यांत दास-नेहरूप्रभृति कौन्सिल—प्रवेशवादी

'फेरवाले' पुढारी त्यांना भेटून त्यांच्याशीं वाटाघाटी करून गेले. त्यांना गांधीजीविषयीं गाढ भक्ति, तर गांधीजींना त्यांचेविषयीं अपार प्रेम, आणि दोघांचेंहि समान ध्येय स्वराज्य–संपादन हेंच. असें असूनहि त्या दोघांमध्यें ऐक्य निर्माण झालें नाहीं. दोघांचे दोन मार्ग वेगळे दिसूं लागले, पण हे दोन्ही पंथ काँग्रेसच्याच एका छत्राखालीं राहावेत असा प्रयत्न गांधीजींनीं केला व तो बेळगांवच्या काँग्रेसमध्यें यशस्वी पण झाला. त्या काँग्रेसचें अध्यक्षस्थान गांधीजींकडेच होतें.

बेळगांव काँग्रेसचें यश

१९२० सालापासून काँग्रेसचीं जीं अधिवेशनें भरलीं, तीं सर्व गांधीजींच्याच प्रभुत्वाखालीं होतीं. त्यांपैकीं कोणत्याहि अधिवेशनाच्या अध्यक्षपदाचा मुकुट त्यांना सहज लाभला असता, पण त्यांनीं तो नाकारला. तरी ते 'सरसभापति' (Super-President) होते. 'गांधी बोले, राष्ट्र हाले' अशी वस्तुस्थिति होती. बेळगांवचें अध्यक्षपदहि गांधीजींना नकोसेंच होतें. पण फेर–नाफेरवाल्यांची फूट मिटविण्यासाटीं त्यांना अध्यक्षपद स्वीकारणें अवश्य वाटलें.

गांधीजींचें अध्यक्षीय भाषण फार छोटें होतें. त्यांत त्यांनीं १९२० सालापासून काँग्रेसचा विकास कसा होत गेला याचें समालोचन केलें आणि खादीचा प्रसार, हिंदु-मुसलमानांचें ऐक्य, अस्पृश्यतेचें निवारण, राष्ट्रीय शाळांचें संवर्धन इत्यादि विधायक कार्यांवर भर दिला आणि आपली स्वराज्याची बारा कलमी योजना स्पष्टपणें मांडली, ती अशी—

(१) मताचा अधिकार हस्तव्यवसायावर अवलंबून ठेवावा.

(२) लष्करी खर्च अंतर्गत संरक्षणाला अवश्य इतकाच ठेवावा.

(३) न्यायदान सुलभ व स्वस्त असावें. शेवटचें न्यायमंदिर दिल्लीमध्यें असावें, लंडनमध्यें नव्हे. बहुतेक खटल्यांचा निकाल पंचायतीमार्फत व्हावा.

(४) दारू वगैरे मादक पदार्थांना पूर्ण बंदी करावी.

(५) सरकारी नोकरांचे पगार या देशाच्या परिस्थितीस अनुरूप असे थोडे ठेवावे.

(६) प्रांतांना अंतर्गत कारभाराचें पूर्ण स्वातंत्र्य असावें आणि त्यांची रचना भाषावार करावी.

(७) पाश्चात्यांना मिळत असलेल्या व्यापारांतील मक्तेदारीची चौकशी कमिशनमार्फत करावी.

(८) संस्थानांवर मध्यवर्ती सरकारचें दडपण नसावें. संस्थानांतील प्रजेला स्वराज्यसंपन्न हिंदुस्थानमध्यें वास्तव्य करण्याची इच्छा असल्यास तसें तिला करूं द्यावें.

(९) अनियंत्रित अधिकार देणारे सर्व कायदे रद्द करावेत.

(१०) गुणाप्रमाणें नोकऱ्या द्याव्या. सनदी व लष्करी नोकऱ्यांसाठीं हिंदुस्थानांतच परीक्षा घ्याव्या.

(११) सर्व धर्मांना पूर्ण स्वातंत्र्य असावें आणि त्यांनीं परस्परांविषयीं सहिष्णुता धारण करावी.

(१२) कांहीं काळपर्यंत सरकारदरबारची भाषा प्रांतामध्यें त्या त्या स्थानची मातृभाषा असावी. पण मध्यवर्ती सरकार, मध्यवर्ती विधिमंडळ, प्रिव्हि कौन्सिल या सर्वांची भाषा हिंदुस्थानी असावी. लिपी देवनागरी किंवा पर्शियन असावी. आंतरराष्ट्रीय राजकारणाची भाषा इंग्रजी राहील.

या कॉंग्रेसपुढील मुख्य कार्य म्हणजे फेर-नाफेरवाल्यांचा समेट घडवून आणणें. तें गांधीजींनीं औदार्यानें व कौशल्यानें साधलें. दास-नेहरूंच्या इच्छेप्रमाणें त्यांनीं कौन्सिलावरील बहिष्कार उठविला आणि कॉंग्रेसतर्फें ' स्वराज्य पक्षानें ' कौन्सिलांत कार्य करावें या योजनेला मान्यता दिली. विदेशी कापडावरील बहिष्काराशिवाय बाकीचे सर्व बहिष्कार उठले म्हटलें तरी चालेल. उलटपक्षीं दास-नेहरू यांनीं गांधीजींच्या इच्छेप्रमाणें कॉंग्रेसच्या सभासदत्वाला हातसुताची अट मान्य केली.

परंतु या समेटाच्या वाटेनें पुढें विस्तृत रूप धारण केलें आणि पाटणा येथें १९२५ च्या सप्टेंबरमध्यें अ. भा. कॉं. कमिटीची बैठक भरली असतांना तर, गांधीजींनीं स्वराज्य–पक्षाला सर्वस्व–दान केलें म्हटलें तरी चालेल. हातसूत देण्याची कॉंग्रेसच्या सभासदत्वाची सक्त अट नाहींशी झालीं. सभासदत्वाच्या चार आणे वर्गणीचा तो केवळ ऐच्छिक पर्याय ठरला. असहकारितेचे अवशेषहि पुसण्यांत आले. स्वराज्यपक्षाला कॉंग्रेसचें संपूर्ण सामर्थ्य गांधीजींनीं मिळवून दिलें. याचें कारण काय? तर त्या वेळीं ब्रिटिश सरकार स्वराज्यपक्षाच्या सभासदांवर प्रकट व प्रच्छिन्न हल्ले चढवीत होते.

म्हणून काँग्रेसचें डोंगराएवढें बळ स्वराज्यपक्षाच्या पाठीशीं गांधीजींनीं उभें केलें. स्वराज्यपक्षानें जें जें वांछिलें; तें तें त्यांना लाभलें.

कानपूरची काव्य-वाणी

पाटणा येथें स्वराज्यपक्षाचा हा जो पाठपुरावा करण्यांत आला, त्यावर शिक्कामोर्तब केलें कानपूरच्या काँग्रेसनें. १९२५ च्या अखेरीस श्री. सरोजिनी नायडू यांच्या अध्यक्षतेखालीं हें अधिवेशन भरलें. 'भारताच्या बुलबुल' म्हणून जगविख्यात असलेल्या या कवयित्रीनें आपल्या वक्तृत्वाची वीणा वाजवून असा उदात्त संदेश काँग्रेसजनांना दिला कीं, "पारतंत्र्याच्या लज्जास्पद स्थितींतून आपल्या मातृभूमीला मुक्त करण्यासाठीं व आपल्या पुत्रपौत्रांना शांततेचा अक्षय्य वारसा अर्पण करण्यासाठीं आपण कितीहि त्याग केला, तरी तो मोठा होणार नाहीं, कितीहि हाल सोसले तरी फार होणार नाहींत व कितीहि बलिदान झालें तरी तें भयानक वाटणार नाहीं." तसेंच "पारतंत्र्यासारखें पाप नाहीं व अन्याय सोसण्यासारखा अपराध नाहीं." असें स्फूर्तिदायक सूत्रहि त्यांनीं प्रतिनिधींच्या हातीं दिलें.

कानपूर काँग्रेसमधील संस्मरणीय गोष्ट म्हणजे अमेरिकेचे रे. होल्मस् यांनीं, गांधी टोपी घालून, गांधीजींच्या गौरवाचें भाषण करून, सर्वांच्या भावना हालविल्या.

कानपूर काँग्रेसनंतर एक वर्षपर्यंत,दौरे काढावयाचे नाहींत असा संकल्प गांधीजींनीं केला. हा स्वेच्छेचा बंदिवास--हें वार्षिक 'मौन'-गांधीजींनीं गौहत्ती काँग्रेसमध्यें संपविलें. हें अधिवेशन१९२६ सालच्या डिसेंबरांत भरलें.

गौहत्ती काँग्रेस व विधायक कार्यक्रम

गौहत्ती काँग्रेसचे अध्यक्ष श्री. श्रीनिवास अय्यंगार हे होते. आसाममध्यें हत्तींचे कळपच्या कळप असतात. तेव्हां सहजच अध्यक्षांची मिरवणूक हत्तीवरून काढण्याचें योजलेलें होतें. परंतु, स्वामी श्रद्धानंद यांची हत्या एका मुसलमानानें केल्याची वार्ता तेथें जाऊन थडकली, त्यामुळें सर्वांच्या उत्साहावर विरजण पडलें. काँग्रेसची सर्व शोभा काळवंडली—हत्तीची मिरवणूक रद्द झाली !

श्रद्धानंदजींच्या हत्येविषयींचा ठराव गांधीजींनीं मांडला व महंमदअल्लींनीं अनुमोदिला. ठराव मांडतांना गांधीजींनीं असे उद्गार काढले, "स्वामीजींचा

खून करणारा अब्दुल राशिद याला मीं माझा भाऊ म्हटलें. आजहि पुनः मी तसेंच म्हणतों. मी त्याला या खुनाबद्दल जबाबदार धरीत नाहीं. खरे जबाबदार ते कीं, ज्यांनीं जातीजातींतील द्वेषाच्या भावना भडकविल्या. कोणत्याहि रोगाच्या मुळाशीं जाऊन विचार करणें व तें मूळ नाहींसें करण्याचा प्रयत्न करणें ही गांधीजींची दृष्टि सर्वत्र सारखी होती.

स्वराज्य पक्षाला कौन्सिलासाठीं कॉंग्रेसनें मुक्तद्वार ठेवलें असलें, तरी मंत्रिपदाचा स्वीकार करण्यास एका ठरावानें मनाई करण्यांत आली. या कॉंग्रेसला जोडून नेहमींप्रमाणेंच एक खादीप्रदर्शन भरविण्यांत आलें. पण त्याशिवाय कॉंग्रेसच्या निवडणुकांचे वेळीं खादी वापरण्याची सक्ति असावी, अशी अटहि घालण्यांत आली. गांधीजींच्या इच्छेप्रमाणें ग्रामोद्धाराच्या कार्याविषयींहि ठराव करण्यांत आला. विधायक कार्यावर भर देण्याकडे गांधीजींची दृष्टि वळली होती. त्यामुळेंच जनतेंत शिस्त व संघटना निर्माण होईल अशी त्यांची श्रद्धा होती. आणि या दोन गुणांशिवाय जनता स्वातंत्र्य कधींच मिळवूं शकणार नाहीं, अशी त्यांची खात्री होती. म्हणून गौहत्ती कॉंग्रेसमध्यें स्वातंत्र्याचा ठराव आला असतांना, तो त्यांनीं आपल्या भाषणाच्या झंझावातानें उडवून लावला.

परंतु सरकारची दडपशाही वाढत होती आणि जनतेची स्वातंत्र्यभक्ति चेतवीत होती. हिंदुस्थानांतील राष्ट्रीय वृत्ति जसजशी फोंफावूं लागली, तसतसें तिला पायबंद घालण्यासाठीं ब्रिटिश सरकार कॉंग्रेसाविरुद्ध मुसलमानांना उठवूं लागले. त्यामुळें मुसलमानांचे दंगे वाढले. कॉंग्रेसच्या स्वातंत्र्य–संग्रामाला भरती आली कीं हिंदु-मुसलमानांच्या दंग्याला ऊत येई, हा कांहीं काकतालीय न्याय नव्हता—तर ब्रिटिश सरकारचा भेदनीतीचा अन्याय होता. तो मोडून काढण्याची पराकाष्ठा कॉंग्रेस करीत होती. त्याचें एक दृश्य फल म्हणजे, मद्रास येथें १९२७ सालीं भरलेल्या कॉंग्रेसचें अध्यक्षपद डॉ. अन्सारी यांना देण्यांत आलें.

मद्रास कॉंग्रेसमध्यें स्वातंत्र्याचा ठराव

या अधिवेशनांत अध्यक्षपदावरून अन्सारींनीं घोषणा केली कीं, " आपण ज्या स्वराज्यासाठीं प्रयत्न करीत आहों, तें केवळ हिंदूंचें राज्य होणार नाहीं किंवा केवळ मुसलमानांचें होणार नाहीं, तर सर्वांच्या न्याय्य

हक्कांचें संरक्षण करणारें संयुक्त राज्य होईल." असा उमदा ध्येयवाद रंगवून प्रत्यक्ष व्यवहाराच्या भूमीवर येतांना अन्सारी म्हणाले, "असहकारितेनें आपल्याला दगा दिला नाहीं, तर आपणच तिला दगा दिला. हिंदुस्थान स्वतंत्र झाला म्हणजे सर्व आशिया स्वतंत्र होईल आणि सर्व जगांत शांतता नांदेल."

डाव्या हातानें दडपशाहीचें पाप करीत असतांनाच ब्रिटिश सरकार उजव्या हातानें स्वराज्यदानाचें पुण्यकृत्य करण्याचा संकल्प सोडीत होतें. हिंदुस्थानाला कोणत्या स्वरूपाचें स्वराज्य द्यावें याची आंखणी करण्यासाठीं ब्रिटिश सरकारनें एक कमिशन नेमलें. त्याचे अध्यक्ष मि. सायमन व त्याचे सारे सभासद गोरे होते. त्यामुळें त्याच्या कार्यावर पूर्ण बहिष्कार घालावा असा ठराव मद्रास कॉंग्रेसनें केला.

"कॉंग्रेसचें ध्येय संपूर्ण स्वातंत्र्य हें आहे." असा तिच्या ब्रीदाचा खुलासा करणारा ठरावहि मद्रास कॉंग्रेसमध्यें मंजूर झाला. तो ठराव पूर्वी फेटाळला गेला होता आणि मद्रासमध्येंहि गांधीजींचा त्या ठरावास विरोध होता. कारण, त्यांच्या मतानें स्वातंत्र्य-संपादनासाठीं लागणारें अवश्य तें सामर्थ्य राष्ट्रामध्यें आज नाहीं. पण अशा ठरावानें व त्याच्या प्रचारानें तें सामर्थ्य प्रदीत होईल, अशी तरुणांना आशा ! म्हणून युरोपांतील आपला दोन वर्षांचा दौरा आटोपून हिंदुस्थानांत तांतडीनें आलेले पं. जवाहरलाल नेहरू यांनीं तो ठराव मांडला, आणि सांबमूर्ति, सत्यमूर्ति व शौकतअली यांनीं त्याला पाठिंबा दिला व तो ठराव एकमतानें मंजूर झाला.

स्वराज्याची तपशीलवार योजना तयार करण्यासाठीं या अधिवेशनांत एक सामिति नेमण्यांत आली. तिचे अध्यक्ष पं. मोतीलाल नेहरू होते. त्यांनीं पुढें 'नेहरू रिपोर्ट' तयार केला.

सायमन कमिशनवरील बहिष्कार आणि स्वातंत्र्याच्या ध्येयाचा ठराव—या दोन्ही कार्यांचीं दृश्य फळें, पुढील वर्षांत, स्पष्टपणें दिसून आलीं. "सायमन परत जा" अशा आरोळ्या सर्व देशभर उठल्या आणि कमिशनला शहरोंशहरीं हजारों काळीं निशाणें दाखविण्यांत आलीं. त्यानें चिडून गेलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनीं नागरिकांवर बेगुमान लाठीहल्ला चढविला. अलाहाबाद येथें जवाहरलालांच्याच डोक्यांत नव्हे तर, त्यांच्या

वृद्ध मातुश्रींच्या मस्तकावरहि पोलिसांनीं लाठीमार केला, तसेंच लोहार येथें लाला लजपतराय हे पोलिसी लाठीला बळी पडले ! तरी सायमन कमिशनवर सर्व राष्ट्रानें कडकडीत बहिष्कार घातला.

नागपूरचा शस्त्र–सत्याग्रह

१९२७ सालीं नागपूर शहरानें एक लोक-विलक्षण लढा दिला. अहिंसेनें हिंसेचें प्रदर्शन मांडलें ! स्वतःचें ‘ प्रजासत्ताक राज्य ’ स्थापून त्याचे सरसेनापति हत्यारांसह मिरवणूक काढूं लागले. इतवारी भागांत एका बखळीवर ‘ लष्करी खातें ’ उघडण्यांत आलें व त्यांत शंभर एक तरुण सामील झाले. ‘ लोकशाही ’ नाणेंहि पाडण्याचा विचार होता. ‘ सशस्त्र राहून आपण अहिंसा पाळणार ’ असा बाणा बाळगणारे ‘ रिपब्लिकन जनरल ’ (कप्तान फौज) मंचरशा रुस्तुमजी आवारी यांनीं ‘ हत्याराच्या कायद्याचा ’ भंग केला—प्रत्येकानें स्वतःजवळ बॉम्ब बाळगण्याचाहि उपदेश ते करूं लागले. गांधीजींचा विरोध असतांनाहि ही चळवळ मे महिन्या-पासून जूनपर्यंत चालली. जनरल आवारींना ४ वर्षे सक्तमजुरी झाली. हत्यांराचा कायदा रद्द व्हावा व बंगाली राजबंद्यांची मुक्तता व्हावी यासाठीं त्यांनीं हा ‘ शस्त्र-सत्याग्रह ’ सुरू केला होता.

यशस्वी बार्डोली

स्वातंत्र्याचे दृष्टीनें राष्ट्राचें पाऊल पुढें पाडणारा बार्डोलीचा यशस्वी लढा, ही या वर्षांतील मोठी आशादायक घटना होती. १९२६ सालीं शेतसाऱ्याची पाहणी करून मुंबई सरकारनें बार्डोली तालुक्याचा सारा शें. ३० नें वाढविला. तो रद्द करून घेण्याचा सनदशीर प्रयत्न आम-दारांनीं केला, पण तो फोल ठरला. तेव्हां वल्लभभाईनीं १९२८ मध्यें सत्याग्रहाचें निर्वाणीचें शस्त्र उपसलें. शेतकऱ्यांनीं वाढलेला सारा देऊं नये, असा प्रचार त्यांनीं केला. १९२७ मध्यें अतिवृष्टि झाल्यामुळें तेथील शेतकरी-वर्ग हैराण झाला होता; तो सारा कोठून देणार ? पण सरकार पडलें परकी ! त्यांनीं जप्त्या–झडत्या— लिलाव यांचें सत्र सुरू केलें. त्यासाठीं मुंबईहून पठाणहि पाठविले. बार्डोलींत सर्वत्र सोटेबाज पठाण व लाठीबाज पोलिस दिसूं लागले—ते शेतकऱ्यांच्या म्हशी जप्त करून हांकून नेऊं लागले. पण त्या म्हशी लिलावांत घेतो कोण ? तेव्हां

सरकारनें बाहेरगांवाहून कसायांना बोलावून आणलें आणि त्यांना त्या म्हशी विकल्या.

जशी सरकारची दडपशाही कडेकोट, तशीच जनतेची असहकारिताहि. सरकारी अधिकाऱ्याला दूध मिळेना, भाजी मिळेना, धान्य मिळेना! धोबी नाहीं–न्हावी नाहीं, असा कडकडीत बहिष्कार पडला. तालुक्यांतील ९० पाटलांपैकीं ६९ नीं आणि ३५ पैकीं ११ तलाठ्यांनीं राजिनामे दिले. ९ आमदारांनींहि विधि-मंडळांतील आपल्या जागा सोडल्या.

या बार्डोलीच्या लढ्याला कॉंग्रेस-कार्यकारिणीनें पाठिंबा दिला व सर्व राष्ट्रानें ता. १२ जून हा दिवस 'बार्डोली–दिन' म्हणून पाळला. शेवटीं सरकार नमलें—'चौकशी कमिशन' नेमण्याचें त्यांनीं मान्य केलें—जुनाच सारा स्वीकारण्याचें कबूल केलें. स्वातंत्र्याचें साधन म्हणून हिंदुस्थानानें स्वीकारलेलें सत्याग्रहाचें शस्त्र या लढ्यांत पूर्ण यशस्वी झालें. दासबाबू म्हणत, "बार्डोली ही आधुनिक कुरुक्षेत्रच आहे."

कलकत्ता कॉंग्रेस व नेहरू–रिपोर्ट

सायमन कमिशनवरील बहिष्कार व बार्डोलीच्या शेतकऱ्यांचा लढा—या दोन्ही बाबतींत कॉंग्रेसनें यशाचा तुरा मिळविला होता. त्यामुळें १९२८ सालीं कलकत्ता येथें भरलेल्या कॉंग्रेसमधील सारें वातावरण उत्साहानें व चैतन्यानें भरून गेलें होतें. स्वराज्याची योजना सरकारपुढें ठेवणारा—सर्व राष्ट्राची राजकीय आकांक्षा स्पष्टपणें प्रगट करणारा नेहरू-रिपोर्ट सिद्ध झालेला होता. त्याच्या आधारें सरकारला निर्वाणीचा खलिता पाठविण्याचा निर्धार कॉंग्रेसजनांमध्यें दिसून येत होता. अशा परिस्थितींत भरलेल्या कलकत्ता कॉंग्रेसमध्यें उत्साहाची भरती यावी यांत नवल काय?

आणि त्या उत्साहाला उधाण आणण्यासारखेंच मोठ्या बुद्धिमत्तेचे, दांडग्या कर्तृत्वाचे व लढाऊ वृत्तीचे अध्यक्ष अधिवेशनाला लाभलेले होते. ते म्हणजे पं. मोतीलालजी नेहरू. त्यांची मिरवणूक ३६ घोड्यांच्या रथांतून काढण्यांत आली. त्यांनीं आपल्या भाषणांत घनगंभीर गर्जना केली कीं, "महाबलाढ्य असा हा आपला देश, आतांपर्यंत कुंभकर्णाप्रमाणें झोंपीं गेला होता. पण आतां तो जागा झाला आहे. आतां त्याचें ध्येय

' संपूर्ण-स्वातंत्र्य ' हेंच आहे. त्या स्वातंत्र्याला कोणतीहि सीमा असतां कामा नये–अट असतां कामा नये. सारी साम्राज्यशाही व तिचें सारें शोषण समूळ नष्ट झालें पाहिजे. त्यासाठीं आपण आपले भेदभाव विसरून, खांद्याला खांदा लावून, लढावयास सिद्ध असलें पाहिजे. "

या अधिवेशनांतील महत्त्वाचा ठराव म्हणजे, काँग्रेसनें ब्रिटिश सरकारला दिलेली नोटीस. नेहरू–रिपोर्टानें तयार केलेली राज्यघटना जशीच्या तशी ब्रिटिश पार्लमेंटनें ता. ३१ डिसेंबर १९२९ रोजीं–किंवा त्यापूर्वी–मान्य करावी. ती जर सरकारनें अमान्य केली, तर करबंदीसारख्या मार्गांनीं अनत्याचारी असहकारिता सुरू करण्याचा आदेश काँग्रेस सर्व राष्ट्राला देईल. ही वर्षाची मुदत संपेपर्यंत काँग्रेस संपूर्ण स्वातंत्र्याचा प्रचार करण्यास मोकळीच राहील. " अशा आशयाचा ठराव मंजूर झाला. राष्ट्राचें ध्येय, त्याचें सगुण स्वरूप व त्याच्या संपादनाचा मार्ग–या तिन्ही गोष्टी या वेळीं सुस्पष्ट व निश्चित झाल्या. काँग्रेसला जोडून भरलेली " ऐक्य-परिषद ' व 'खादी-प्रदर्शन 'हेंहि जनतेची आशा व उत्साह वाढविणारेंच होतें.

याहून कलकत्ता अधिवेशनांतील संस्मरणीय अशी अभिनव घटना म्हणजे कामगारांचें निदर्शन. हिंदुस्थानांत हळू हळू उद्योगधंदे वाढत होते–गिरण्यांची संख्या वाढत होती–त्यांतील मजुरांची संख्याहि वाढत होती—त्यांच्या संस्था व संघटनाहि वाढत होत्या. अशा मजूरवर्गाचें मोठें ठाणें म्हणजे कलकत्ता ! मजूर हा सामान्यतः अशिक्षित–शेतकऱ्यासारखाच, पण तो शेतकऱ्याप्रमाणें इतस्ततः विखुरलेला नसतो. एकेका शहरांत तो केंद्रित झालेला असतो. त्यामुळें त्याची संघटना बांधणें सोपें जातें. अशा अडाणी पण संघटित कामगारवर्गाची राजकीय आकांक्षा काय होती ?

तें कलकत्त्यास स्पष्ट झालें. ५०,००० हून अधिक कामगार गिरण-भागांतून निघून अत्यंत शिस्तीनें व शांततेनें काँग्रेस–नगराकडे गेले आणि तेथें उभारलेल्या तिरंगी झेंड्याला त्यांनीं वंदन केलें. काँग्रेसच्या मंडपांतच त्या कामगारांची परिषद भरली व ती दोन तास चालली. त्या परिषदेंत संपूण स्वातंत्र्याचा ठराव करण्यांत आला. राष्ट्रांत नव्यानें जागृत होणाऱ्या शक्तीचाहि समावेश काँग्रेसमध्येंच होत होता. नुकतेंच स्थापन झालेले ' युवक-संघहि ' काँग्रेसच्या झेंड्याखालीं गोळा झाले होते. कामगार असो,

शेतकरी असो, विद्यार्थी असो—साऱ्या वर्गांचें प्रतिनिधित्व कॉंग्रेसकडेच येत होतें. सारे ओहोळ-ओढे-नद्या समुद्रालाच मिळाव्यात, तसें हें घडत होतें. उभें राष्ट्र राष्ट्रसभेच्या पाठीशीं उभें होतें.

कलकत्ता कॉंग्रेसमध्यें विशेष उत्साह निर्माण होण्याचें आणखी एक कारण म्हणजे गांधीजींची उपस्थिति. अहमदाबाद कॉंग्रेसनंतर ते कारागृहांत अडकून पडले होते. आणि त्यामुळें गया, दिल्ली (जादा) व कोकोनाडा येथील अधिवेशनांना ते उपस्थित राहूं शकले नाहींत. बेळगांव व कानपूर या ठिकाणच्या अधिवेशनांना ते हजर होते आणि गौहत्तीच्या अधिवेशनांत त्यांनीं बराच भागहि घेतला होता; पण मद्रास कॉंग्रेसला हजर राहूनहि त्यांनीं तिच्या कार्यक्रमांत फारसा भाग घेतला नाहीं. विषयनियामक समितीच्या सभांना ते उपस्थितहि राहिले नाहींत. परंतु कलकत्ता-कॉंग्रेसला ते गेले, हजर राहिले, एवढेंच नव्हे तर, त्यांत त्यांनीं पुष्कळच भाग घेतला.

लाहोरचा स्वातंत्र्य—लाहो

पौर्णिमेची रात्र संपतांना, पश्चिम क्षितिजावर मावळतें चंद्रबिंब तर पूर्व-क्षितिजावर उगवतें सूर्यबिंब दिसतें, तसेंच उज्ज्वल दृश्य लाहोरच्या राष्ट्रसभेंत असंख्य राष्ट्र-भक्तांच्या दृष्टीस पडलें. पं. मोतीलाल नेहरू यांनीं राष्ट्रसभेच्या सिंहासनावरून उतरून आपल्या पुत्राला ती जागा दिली. वसाहतीच्या स्वराज्याचा ‘ नेहरू--वृत्तान्त ’ इतिहासांत जमा करून “ जो बापने नहीं कर दिखलाया सो बेटा कर दिखलायगा ” अशी भविष्यवाणी नेत्याच्या दूरदृष्टीनें व पित्याच्या वात्सल्यानें त्यांनीं उच्चारली. पं. जवाहरलाल राष्ट्रसभेच्या अध्यक्षपदावर आरूढ झाले आणि त्यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचें निशाण फडकाविलें !

आपल्या अंतिम साध्याचा सुस्पष्ट उच्चार कॉंग्रेसनें करावा, अशीच आणीबाणीची व अटीतटीची परिस्थिति तेव्हां होती. सरकारनें नेमलेल्या सायमन-कमिशनशीं मध्यवर्ती कायदेमंडळानेंहि असहकार केला आणि सर्व राष्ट्रानें आपल्या विरोधाचें उग्र प्रदर्शन केलें. उलट सरकार दडपशाहीचे निखारे सर्व देशावर ओतीत होतें. मीरतचा मजूर-पुढाऱ्यांवरील खटला चालू होता. लाहोरचा क्रांतिकारकांचा खटला रेंगाळत होता. त्यांतील

सरकारच्या क्रूर वागणुकीच्या निषेधार्थ सरदार भगतसिंग, जतींद्रनाथ दास इत्यादि तरुणांनीं अन्नसत्याग्रह सुरू केला होता. जतींद्रनाथ दास तर पुढें चौसष्ट दिवसांचा उपवास करून निधन पावले. ब्रह्मदेशांतील राजबंदी रेव्ह. विजय यांनींहि त्याच सुमारास एकशें चौसष्ट दिवसांचा उपवास करून प्राणत्याग केला. मुंबई येथें कापड--कारखान्यांतील दीड लाख मजुरांनीं संप पुकारला व तो सहा महिने चालविला. बंगालमधील तागाच्या गिरण्यांतील अडीच लाख मजुरांनीं आपला संप यशस्वी करून दाखविला.

उलट, सरकार असेंब्लीमध्यें 'ट्रेड डिस्प्यूट बिल' 'पब्लिक सेफ्टी बिल'— अशा जाचक कायद्यांच्या शृंखला घडवीत होतें. म्हणून त्यांचे 'कान खोलण्यासाठीं' भगतसिंगांनीं असेंब्लींत बॉंब टाकला. राष्ट्राच्या संतापाचा पारा किती वर चढला होता, याचें तें एक मापच होतें. त्या संतापाचें क्रियारूप फल म्हणजे लाहोर-कॉंग्रेसमधील स्वातंत्र्याचा ठराव.

लाहोर येथें रावी नदीच्या डाव्या तीरावर, 'लजपतराय नगरा'मध्यें, खादीच्या प्रचंड मंडपांत, ता. २९ डिसेंबर १९२९ रोजीं संध्याकाळीं ५ वाजतां, कॉंग्रेसचें अधिवेशन पं. जवाहरलालांच्या अध्यक्षतेखालीं सुरू झालें. स्वागताध्यक्ष डॉ. किचलू यांनीं स्वातंत्र्याची घोषणा करून असा निश्चय जाहीर केला, "चौरीचुरा होवो किंवा आणखी कांहीं होवो, यापुढें माघार म्हणून आपण घेणार नाहीं." नंतर मोतीलालजींनीं अध्यक्षाचें आसन आपल्या सुपुत्रासाठीं मोकळें केलें.

जवाहरलालांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत समाजवादी विचारांची तुतारी फुंकली. त्यांनीं स्पष्टपणें जाहीर केलें, "राजे-महाराजे यांना मी ओळखीत नाहीं व व्यापारी-कारखानदार यांना मी जोखीत नाहीं. हिंदुस्थान म्हणजे शेतकरी-कामकरीच. त्यांचा उष्कर्ष म्हणजे राष्ट्राचा उत्कर्ष. त्यासाठीं आपल्याला संपूर्ण स्वातंत्र्यच हवें. आमचें स्वातंत्र्य म्हणजे ब्रिटिशांच्या वर्चस्वापासून व साम्राज्यशाहीपासून सर्वथैव मुक्त होणें. कोणत्याहि एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावरील व कोणत्याहि एका वर्गाचें दुसऱ्या वर्गावरील प्रभुत्व नामशेष झालें पाहिजे. त्यासाठीं आपल्याला समाजवादी मार्गानेंच गेलें पाहिजे. अर्थात् आपली प्रकृति परिस्थिति यांस अनुसरून आपण नवीं साधनें निर्माण केलीं पाहिजेत."

स्वातंत्र्याचा ठराव म. गांधींनीं मांडला. 'नेहरू-रिपोर्ट'तील काल-मर्यादा संपल्यामुळें त्यांतील मागणी रद्द झाली होती. कौन्सिलावर बहिष्कार घालून, विधायक कार्यक्रम आचरून व जरूर तेथें करबंदी करून, स्वातंत्र्य संपादन करावें असें या ठरावांत म्हटलें होतें. त्याला पं. मोतीलालांनीं अनुमोदन दिलें. तें देतांना त्यांनीं कौन्सिलांतील कामासंबंधीं अशी स्वच्छ कबुली दिली कीं, "उस कामसे हमारी आजादीका कदम एक इंचभी नहीं बढा !" ठरावाला चौदा उपसूचना आल्या, पण त्या साऱ्या फेटाळल्या जाऊन, स्वातंत्र्याचा मूळ ठराव बहुमतानें संमत झाला.

आणि रात्रीं बारा वाजतां, रावी नदीच्या तीरावर, ११५ फूट उंचीच्या स्तंभावर, जवाहरलालांनीं स्वातंत्र्याचा झेंडा चढविला ! तेव्हां 'वंदे मातरम्'चा जयघोष दशदिशा दुमदुमला. त्या ध्वज-स्तंभाच्या शिरोभागीं राष्ट्रध्वजांतील तीन रंग दर्शविणारे विजेचे पंधरा दिवे लखलखत होते. त्या रात्रीं जवाहरलाल स्वतः आनंदानें नाचले आणि त्यांनीं स्वयंसेवकांस नाचावयास लावलें. त्यांनीं स्वतः स्वातंत्र्याचें गीत गायिलें आणि स्वयंसेवकांना स्वातंत्र्याचें गीत गावयास लावलें.

गांधीजींच्या अकरा मागण्या

यापुढें ता. २६ जानेवारी हा दिवस 'स्वातंत्र्य-दिन' म्हणून पाळला जाऊं लागला. त्यासाठीं स्वातंत्र्याची एक विस्तृत प्रतिज्ञा या काँग्रेसनें तयार केली. इंग्लंडांतील गोलमेज परिषदेवर बहिष्कार घालण्याचें काँग्रेसनें ठरविलें. या वेळीं इंग्लंडमध्यें मजूर पक्ष राज्यारूढ होता आणि पंतप्रधान मि. मॅक्डोनॉल्ड व भारतमंत्री मि. वेजवुड बेन हे हिंदुस्थानाबद्दल सहानुभूति बाळगणारे होते. परंतु स्वातंत्र्य-दानाला कोणीच सिद्ध नव्हतें.

षोडश कलांचें स्वातंत्र्य राहो, पण स्वातंत्र्याचा गाभा तरी देण्यास ब्रिटिश मजूर पक्ष तयार आहे का ? याची कसोटी पाहण्यासाठीं, म. गांधींनीं व्हॉइसरॉयाकडे ११ मागण्या पाठविल्या व त्या तत्काळ मान्य करण्यास विनविलें. या मागण्या म्हणजे--(१) मद्यपानाची पूर्ण बंदी. (२) हुंडणावळीचा भाव १६ पेन्स. (३) जमीनमहसूल कमींत कमी शें. ५० नें कमी करणें, आणि महसुलाची बाब कायदेमंडळाच्या अधिकाराखालीं ठेवणें.

(४) मिठाचा कर रद्द करणें. (५) लष्करी खर्च सुरवातीला निदान शें. ५० नें उतरवणें. (६) वरिष्ठ जागांचे पगार निमपट करणें. (७) परदेशी कापड़ावर संरक्षक जकात बसविणें. (८) किनाऱ्यावरील व्यापार ताब्यांत ठेवण्याविषयींचें बिल मंजूर करणें. (९) सर्व राजकीय कैद्यांची मुक्तता करणें. (१०) गुप्त पोलिसांचें खातें रद्द करणें किंवा लोकमताच्या नियंत्रणाखालीं आणणें. (११) हत्यारें बाळगण्यास परवानगी देणें.

या मागण्या किती माफक व न्यायाच्या ! पण सरकारचा नकार ठरलेला. तेव्हां कॉंग्रेसच्या ठरावांत कृतीचा प्राण ओतण्यासाठीं गांधीजींनीं कमर कसली. त्यांनीं मिठाचा कायदेभंग करण्याचा निर्धार केला आणि सत्याग्रह-शास्त्राप्रमाणें आपल्या योजनेचा खलिता व्हॉइसरॉयकडे पाठविला. " हें धर्मयुद्ध आहे आणि तें ईश्वराचें नांव घेऊनच मी चालविणार आहें. " अशी उदात्त ग्वाही देऊन, गांधीजींनीं त्या पत्रांत लिहिलें,

" हिंदुस्थानांतील ब्रिटिश सत्तेला मी शाप समजतों. तिनें येथील लाखों लोकांना भिकेस लाविलें आहे आणि राजकीय दृष्टीनें गुलाम बनविलें आहे. त्यांचा उद्धार केवळ स्वातंत्र्यानेंच होईल. स्वातंत्र्य मिळाल्यावर मिठावरील कर रद्द होईल, दारू बंद होईल, शेतसारा कमी होईल आणि सध्यांचा महागडा कारभार नष्ट होईल. सध्यां आपल्याला हिंदी माणसाच्या सरासरी उत्पन्नापेक्षां ७०० पट पगार आहे. अशा उधळपट्टीमुळें सर्व राष्ट्र दारिद्र्याच्या गर्तेत पडलें आहे. ही दुर्दशा आपण थांबवावी, नाहीं तर मिठाचा कायदेभंग अहिंसात्मक मार्गानें देशांत सुरू होईल. त्यानें ब्रिटिश राष्ट्राचें मतांतर घडून येईल आणि भारत स्वतंत्र होईल, अशी मला आशा आहे. "

यालाहि सरकारनें उद्धट नकार दिला. तेव्हां गांधीजींनीं कायदेभंगाचें रणशिंग फुंकलें. सरकारनें सरदार वल्लभभाई यांना अटक करून गांधीजींचें आव्हान स्वीकारलें.

ता. १२ मार्च १९३० चा क्रांतिकारक दिन उगवला. गांधीजी आपल्या साबरमती आश्रमांतून, सूर्योदयाचे मुहूर्तावर, ७५ अनुयायांसह, सत्याग्रहाच्या अभिनव संग्रामासाठीं निघाले. हजारों लोकांनीं त्यांना निरोप दिला. रावणवधासाठीं अयोध्येंतून बाहेर पडणाऱ्या प्रभु रामचंद्राचेंच

प्रयाण सर्वांना आठवलें. तेथून दोनशें मैलांवर असलेल्या दांडी या समुद्र-कांठच्या खेड्याकडे हे सत्याग्रही वीर चालले. तेथें ते सरकारी कर दिल्याशिवाय मीठ गोळा करणार होते आणि अन्याय्य कायदा मोडणार होते.

गांधीजींची ही इतिहासप्रसिद्ध 'दांडी-यात्रा' चोवीस दिवस चालली. ज्या ज्या खेड्यांत त्यांचें पाऊल पडे, तेथून ब्रिटिश सत्तेचें अस्तित्व नाहींसें होई. पाटलापासून खासदारापर्यंत सर्वजण सरकारी जागांचे राजिनामे देत आणि गांधीजींच्या सत्याग्रही सेनेंत सामील होत. एकट्या सुरत जिल्ह्यांतून १६९ राजिनामे गेले आणि सत्याग्रह-संग्रामांत १,००० स्वयंसेवक आले. पं. मालवीयप्रभृति प्रतिनिधींनीं वरिष्ठ विधिमंडळाचे राजिनामे दिले. साऱ्या देशांत उत्साहाची गगनचुंबी लाट उसळली ! राष्ट्रांतील लोकांची देशाभिमानी व प्रतिकारशाली वृत्ति कळसास पोंचली !

ता. ६ एप्रिलचा मंगल दिन. सूर्यनारायण क्षितिजावर उभा होता, आणि विश्वावर प्रकाश पसरीत होता. तसाच एक महात्मा समुद्रकांठावर उभा होता, आणि सत्याग्रहाचा वस्तुपाठ सर्व जगाला देत होता. दांडी येथें गांधीजींनीं समुद्रांतील मीठ आपल्या हातानें उचललें आणि परक्या सरकारचा अन्यायी कायदा पायाखालीं तुडविला !

किती प्रशांत प्रतिकार ! किती उदात्त संग्राम !

सारा देश पेटला—गांवोगांव कायदेभंगाचा वणवा पेटला—मिठाचा कायदेभंग, जंगलचा कायदेभंग, आक्षिप्त पुस्तकांचा कायदेभंग—असा नाना मुखांनीं कायदेभंगाचा वन्हि सर्वत्र चेतला. सरकारनें ता. ४ मे रोजीं गांधीजींना अटक करून येरवड्याच्या तुरुंगांत स्थानबद्ध म्हणून ठेवलें. तरी कायदेभंगाची मोहीम अणुमात्र उणावली नाहीं. धारासणा, शिरोडें, वडाळा वगैरे ठिकाणच्या मिठागरावर शेंकडों सत्याग्रही तुटून पडले आणि पोलिसांच्या क्रूर लाठ्यांनीं घायाळ झाले ! चिरनेर, बिळाशी, बागलाण, बोरसद, सोलापूर इत्यादि गांवें ही रणक्षेत्रेंच बनलीं. सरकारनें ७५,००० लोकांना तुरुंगांत टाकलें. तरी चळवळ हटेना. तेव्हां सत्याग्रहाच्या दैवी शक्तीला सरकारची शस्त्र-शक्ति शरण गेली.

गांधी-अर्विन करार

व्हॉइसरॉय लॉर्ड अर्विन यांनीं ता. २५ जानेवारी १९३१ रोजीं गांधीजींची १९ सहकाऱ्यांसह बिनशर्त सुटका केली. आणि ता. ४ मार्च

रोजीं रात्रीं दोन वाजतां ‘ गांधी-अर्विन करार ’ घडून आला. त्यापूर्वीच्या शंभर वर्षांच्या पारतंत्र्य–कालांत, हिंदी जनतेच्या प्रतिनिधीबरोबर ब्रिटिश सरकारनें, असा समान भूमिकेवरचा करार किंवा समेट कधींच केलेला नव्हता. त्यामुळें या करारानें काँग्रेसची शान वाढली—राष्ट्राची मान उंचावली.

सरकारनें गोरगरिबांना स्वतःच्या गरजेपुरतें मीठ विनाकर गोळा करण्यास मुभा दिली आणि गांधीजींना ‘ गोलमेज-परिषदेंत ’ स्वातंत्र्याचा प्रश्न मांडण्यास संमति दिली. त्यामुळें सत्याग्रहाची मोहीम थांबली आणि त्यांतील सैनिक बंधमुक्त झाले. घडलें हें एवढेंच—न घडलें पुष्कळ. ‘ यश पाहतां जवापाडें ’ हेंच खरें. सरकार नमलें, हेंच सत्याग्रहाचें घाऊक यश. पण बारीकसारीक अन्याय तसेच राहिले. विशेषतः भगतसिंगादि क्रांतिकारकांना सरकारनें मुक्त केलें नाहीं, हें राष्ट्राच्या काळजांत तप्त शल्यासारखें घुसलें.

सायमन कमिशनवरील बहिष्काराचे वेळीं लाला लजपतरायांना जो प्राणांतिक लाठीमार सोसावा लागला, त्याचा बदला म्हणून भगतसिंग–राजगुरु–सुखदेव या तीन तेजस्वी तरुणांनीं सँढर्स्ट या पोलिस अधिकाऱ्याचा खून ता. १३ सप्टेंबर १९२८ रोजीं केला. त्याबद्दल तिघांना फांशीची शिक्षा झाली होती. ती कमी करण्याबद्दल गांधीजींनीं व्हॉइसरॉयाला विनवणी केली; पण ती फोल ठरली. त्या तिघा देशभक्त तरुणांना सरकारनें लाहोर येथें ता. २३ मार्च रोजीं फांशी दिलेंच !

कराची काँग्रेसमध्यें मूलभूत हक्कांचा जाहीरनामा

समेटाबद्दल हर्ष, पण फांशीबद्दल खेद—अशा संमिश्र भावनेंतच कराची येथें काँग्रेसचें अधिवेशन भरलें. तो मार्च महिना होता. दिवस उन्हाळ्याचे होते. त्यामुळें अधिवेशनासाठीं मंडपाची जरूरी नव्हती. लाखों लोक “ आकाश मंडप पृथिवी आसन ” अशा थाटांत बसले होते. ता. २५ मार्च रोजीं गांधीजींची एक खास जाहीर सभा भरली. तिला ४ आणे तिकीट ठेवलें होतें. त्यामुळें काँग्रेसला १०,००० रुपयांची प्राप्ति झाली.

कराची कॉंग्रेसचें अध्यक्षपद सरदार वल्लभभाई पटेल यांना देण्यांत आलें. त्यांनीं अगदीं छोटें भाषण केलें. " सत्य-अहिंसेच्या मंत्रानें जनतेला आत्मशक्तीची व आत्मप्रतिष्ठेची जाणीव झाली. " असें सांगून त्यांनीं विदेशी कापडावरील बहिष्कारावर भर देण्यास सर्वांना सांगितलें.

या कॉंग्रेसपुढील पहिलें तांतडीचें कार्य म्हणजे गांधी–अर्विन कराराला मान्यता देणें. त्यासाठीं जो ठराव संमत करण्यांत आला, त्यांत असें म्हटलें आहे कीं, ' पूर्ण स्वातंत्र्य हें कॉंग्रेसचें ध्येय कायम आहे. कॉंग्रेसचे प्रतिनिधि याच ध्येयासाठीं गोल परिषदेंत काम करतील. ' याशिवाय जातीय दंगे, शांततामय निरोधन, खादीचा प्रसार, परदेशांतील हिंदी बांधव, इत्यादि विषयांसंबंधीं अनेक ठराव मंजूर झाले. परंतु नव्या शक्तीची जाणीव ठेवणारा व नव्या तत्त्वांचा स्वीकार करणारा महत्त्वाचा ठराव म्हणजे नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा व कर्तव्यांचा.

या ठरावानें राष्ट्राच्या आर्थिक धोरणावर स्पष्ट प्रकाश पाडला आणि कामगारवर्गाच्या उन्नतीकडे विशेष लक्ष दिलें. त्यांतील महत्त्वाचीं कलमें अशीं—(१) आर्थिक जीवनाची व्यवस्था करतांना न्यायाचीं तत्त्वें अशा रीतीनें पाळलीं गेलीं पाहिजेत कीं, कामगारांना व्यवस्थित आयुष्य घालवितां येईल. (२) प्रत्येक कामगाराच्या हिताच्या संरक्षणाची जबाबदारी सरकार घेईल. (३) शेतसारा, खंड व भाडेंपट्टी यांची पद्धति सुधारली जाईल. (४) लष्करी खर्च निम्मा होईल. (५) तंत्रज्ञाशिवाय सर्व सरकारी नोकरांना ५०० रुपयांहून अधिक पगार असणार नाहीं. (६) मिठावर कर राहणार नाहीं. (७) शेतकऱ्यांची कर्जमुक्तता होईल. (८) सावकारीवर नियंत्रण राहील. (९) सर्व नागरिकांना लष्करी शिक्षण मिळेल व त्यांचें ' राष्ट्रसंरक्षण दल ' निर्माण होईल. (१०) सर्व प्रौढांना मताधिकार मिळेल. (११) मतस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, संघटनास्वातंत्र्य सर्वांना असेल. (१२) कायद्यांत, नोकऱ्यांत व सार्वजनिक सुखसोईंत कोणताहि भेदाभेद राहणार नाहीं. (१३) धर्माच्या बाबतींत सरकार तटस्थ राहील. (१४) प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचें असेल. (१५) फांशीची शिक्षा रद्द होईल. (१६) पूर्ण दारूबंदी अंमलांत येईल. (१७)

रेल्वे, जहाजें वगैरे सार्वजनिक दळणवळणाचे मार्ग आणि खनिज संपत्ति—या मुख्य धंद्यावर सरकारचें नियंत्रण किंवा स्वामित्व राहील.

कॉंग्रेसच्या भावी धोरणाचा हा जाहीरनामाच होता. त्यांत सर्व नागरिकांना सर्वांगीण स्वातंत्र्याचें आश्वासन दिलें होतें आणि त्यांतहि किसान-कामगारांना विशेष संरक्षण दिलेलें होतें. या धोरणाचा विशेष विचार करण्यासाठीं एक समिति नेमण्यांत आली. याशिवाय राष्ट्रध्वजांत कोणते रंग असावेत हें ठरविण्यासाठीं कॉंग्रेसनें एक समिति नेमली.

गांधी–अर्विन करारानुसार, गांधीजी ता. २९ ऑगस्ट १९३१ रोजीं, गोलमेज परिषदेसाठीं इंग्लंडला जाण्यास निघाले आणि ता. १२ सप्टेंबर रोजीं ते लंडन येथें जाऊन पोहोंचले. परिषदेंत त्यांनीं हिंदुस्थानची स्वातंत्र्याची मागणी स्पष्टपणें मांडली. ती मांडतांना त्यांनीं कॉंग्रेसचें राष्ट्रव्यापी स्वरूप विशद केलें. “ मी कॉंग्रेसचा एक नम्र प्रतिनिधि आहें.” असें म्हणून त्यांनीं ब्रिटिश मुत्सद्द्यांना बजावलें, “ गुलाम हिंदुस्थान तुम्हांला भारभूतच होईल. पण समतेच्या भूमिकेवरील स्वतंत्र हिंदुस्थान सर्व जगाच्या कल्याणासाठीं ब्रिटनशीं सहकार्य करील—फार काय, त्याच्या बाजूनें जरूर तर युद्धक्षेत्रांतहि उतरेल. ”

परंतु गांधीजींचा हा सारा वेदान्त परिषदेंत जमलेल्या स्वार्थी मुत्सद्द्यांनीं धाब्यावर बसविला. जातीय प्रश्नांच्या सांपळयांत स्वातंत्र्याचा प्रश्न अडकला गेला. तेव्हां शेवटीं, “ हिंदुस्थानांत एकच काय, पण हजारों थर्मापिलींचे संग्राम खेळले गेले आहेत आणि जरूर तर यापुढेंहि अहिंसात्मक संग्राम तो खेळूं शकेल. ” असा इशारा त्यांनीं दिला. “ आपले मार्ग यापुढें भिन्न होणार. ” अशी जाणीव ब्रिटिश पंतप्रधानांना देऊन, गांधीजी ता. ५ डिसेंबर १९३१ रोजीं इंग्लंडहून हिंदुस्थानास यावयास निघाले. त्यापूर्वी त्यांनीं एका जाहीर सभेंत ब्रिटिश लोकांना अशी स्पष्ट सूचना दिली कीं,

“ अनत्याचाराचा व सविनय कायदेभंगाचा संदेश मला लक्षावधि भारतीयांना पुनः एकदां सांगावा लागेल—मग कितीहि विमानें हिंदुस्थानच्या हवेंत घिरट्या घालूं लागलीं किंवा कितीहि सशस्त्र चिलखती मोटारी हिंदुस्थानच्या जमिनीवर फिरूं लागल्या तरी हरकत नाहीं. त्यांचा कांहींहि परिणाम होणार नाहीं. हिंदुस्थानांतल्या कोंवळ्या बालकांवरसुद्धां या

गोष्टींचा आतां परिणाम होत नाहीं, हें तुम्हांला माहीत नाहीं. त्यांच्या चारी बाजूंस गोळ्यांच्या फैरी झडत असतां आम्ही त्यांना आनंदानें नाचायला शिकवितों, जणूं काय ते फटाकेच उडत आहेत. देशाच्या स्वातंत्र्याकरितां हालअपेष्टा सहन करण्याचे धडे आम्ही त्यांना देतों."

दोन बेकायदा अधिवेशनें

सरकारनेंहि चढाईचें धोरण स्वीकारलें. त्यांनीं गांधींसकट सर्व काँग्रेस-नेत्यांना तुरुंगांत टाकलें आणि काँग्रेससकट सर्व राष्ट्रीय संस्था बेकायदा ठरविल्या. त्यामुळें १९३२ सालीं एप्रिल महिन्यांत दिल्ली येथें काँग्रेसचें जें अधिवेशन भरलें तें विजेसारखें क्षणमात्रच दिपवून गेलें. बॅ. सेनगुप्त हे नियोजित अध्यक्ष पकडले गेले. त्यानंतर कलकत्ता येथें तसेंच अधिवेशन भरलें. त्याचे नियोजित अध्यक्ष पं. मालवीय यांनाहि सरकारनें आगाऊच अटक केली. कलकत्त्याकडे निघालेल्या सुमारें १००० प्रतिनिधींनाहि सरकारनें अडकाविलें. तरी ता. ३१ मार्च रोजीं अधिवेशन पार पडलेंच. आणि संपूर्ण स्वातंत्र्याला पाठिंबा देण्यांत आला. त्या साध्याचें कायदेभंग हेंच साधन असल्याची घोषणाहि या काँग्रेसनें केली.

येरवडा-करार

१९३२ च्या सप्टेंबरमध्यें गांधीजी येरवड्याच्या तुरुंगांत शिक्षा भोगीत होते. ब्रिटिश सरकारनें जो जातिनिर्णय दिला, त्यामुळें हरिजनांना स्वतंत्र मतदारसंघ देण्यांत आला. हिंदु-समाजाची अशी फाळणी केल्यास, तिला 'मी मरेपर्यंत विरोध करीन' असा इषारा त्यांनीं गोलमेज परिषदेंत दिला होता; पण तो सरकारनें मानला नाहीं. ता. १८ ऑगस्ट रोजीं ब्रिटिश पंतप्रधानानें जातिनिर्णय जाहीर केला, हरिजनांना स्वतंत्र मतदार-संघ दिला आणि गांधीजींच्या सत्यनिष्ठेला जणुं आव्हान दिलें. जाति-निर्णय वाचतांच गांधीजींनीं ब्रिटिश पंतप्रधानांना तारेनें कळविलें कीं, "ता. २० सप्टेंबर-पासून मी प्राणांतिक उपोषण करणार आहें. अस्पृश्यांना संयुक्त मतदार-संघांत ठेवलें, तरच मी हा उपवास सोडीन." सरकारनें नकार दिल्यामुळें, गांधीजींनीं ता. २० रोजीं प्राणांतिक उपोषण सुरू केलें. त्याचें फल अवघ्या पांच दिवसांतच दिसून आलें. तें म्हणजे डॉ. आंबेडकर यांनीं

स्पृश्यास्पृश्यांच्या संयुक्त मतदारसंघाला मान्यता दिली आणि सुप्रसिद्ध 'येरवडा-करार' जन्मास आला. त्याला ब्रिटिश पंतप्रधानानींहि तांतडीनें संमति दिली व गांधीजींनीं ता. २६ रोजीं आपल्या उपोषण-यज्ञाची सांगता केली.

मुंबईच्या अधिवेशनांत गांधीजींची निवृत्ति

पुणें येथें ता. १२ जुलै १९३३ रोजीं कॉंग्रेसचे हंगामी अध्यक्ष लोकनायक बापूजी अणे यांचे अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसजनांची एक परिषद भरली. तींत बंधमुक्त गांधीजींनीं भाग घेतला. वैयक्तिक सत्याग्रह सुरू करण्याचें ठरलें. पुढें सरकारनें सर्व राजबंदी मुक्त केले. त्यानंतर खुल्या वातावरणांत भरलेली कॉंग्रेस म्हणजे मुंबईची.

पहिली कॉंग्रेस मुंबईसच भरली होती आणि तिचीं महत्त्वाचीं अधिवेशनें भरविण्याचा मान मुंबापुरीनें अनेक वेळां मिळविला आहे. ता. २६ ऑक्टोबर १९३४ रोजीं मुंबई येथें अधिवेशन भरलें. गांधीजी राजकारणांतून निवृत्त होऊन आपलें सर्व लक्ष विधायक कार्यावर केंद्रित करणार, हें या वेळीं जाहीर झालें. भावी सत्याग्रह-संग्रामासाठीं जनतेला संघटित करावें, म्हणून गांधीजी तपश्चर्येस निघाले आहेत, असाच अर्थ कॉंग्रेसजनांनीं घेतला.

कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून डॉ. राजेंद्रप्रसाद यांनीं राष्ट्राला आशेचा व धीराचा संदेश दिला. ते म्हणाले, "कॉंग्रेस ही श्रमजीवी जनतेची प्रतिनिधि आहे. तिचें ध्येय स्वातंत्र्य हेंच आहे आणि त्या स्वातंत्र्याचें साधन सत्याग्रह हेंच आहे. सत्याग्रहाला पराभव माहीत नसतो. आपला पराभव एकदां होईल—दोनदां होईल; पण अंतीं आपलाच जय होईल हें निश्चित."

कॉंग्रेसच्या प्रतिनिधींची संख्या नागपूरला ६,००० पर्यंत ठरविण्यांत आली होती, ती मुंबईस २,००० पर्यंत मर्यादित करण्यांत आली आणि त्यांतील फक्त ५११ प्रतिनिधि शहरांतले असावेत व बाकीचे सर्व खेड्यांतील असावेत, असेंहि ठरविण्यांत आलें. याचा अर्थ कॉंग्रेसचें मुख खेड्याकडे वळलें.

लखनौ येथें समाजवादाचा पुरस्कार

कॉंग्रेसचें ४९ वें अधिवेशन लखनौ येथें १९३६ सालच्या एप्रिलमध्यें भरलें. त्याचें अध्यक्षस्थान पं. जवाहरलालांना देण्यांत आलें. त्यांचे पिताजी मोतीलालजी यांच्या स्मरणार्थ कॉंग्रेस-मंडपाला 'मोतीनगर' असें नांव देण्यांत आलें. प्रवेशद्वारावर व कमानीवर दादाभाई–टिळक–गांधी प्रभृतींचीं चित्रें तर होतींच, पण त्याशिवाय ग्रामीण जीवनाला वाचा फोडणारींहि चित्रें होतीं.

या अधिवेशनापुढें मुख्य प्रश्न दोन होते–पहिला म्हणजे, गोलमेज परिषदेच्या मंथनांतून जें प्रांतिक स्वराज्य निर्माण झालें, त्याच्या निवडणुकी लवकरच होणार होत्या, त्यासंबंधीं कॉंग्रेसचें धोरण ठरविणें आणि दुसरा प्रश्न, शेतकऱ्याच्या उद्धाराचा कार्यक्रम आंखणें. या दोन्ही प्रश्नांचा ऊहापोह जवाहरलालांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत केला. त्यांची कॉंग्रेसच्या वैचारिक भूमिकेला मोठी देणगी म्हणजे, आंतरराष्ट्रीय दृष्टि व समाजवादी तत्त्वज्ञान.

भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर प्रथम त्यांनींच जोरानें मांडला आणि भारतांतील दारिद्र्य नष्ट होण्यासाठीं, जितकी स्वातंत्र्याची तितकीच समाजवादाचीहि गरज आहे, हाहि सिद्धान्त प्रथम त्यांनींच विस्तारानें प्रतिपादिला. ते आपल्या भाषणांत म्हणाले,

"भारतांतील स्वातंत्र्याचा लढा हा जागतिक जागृतीचा व आंदोलनाचा एक अंश आहे. समाजवादाकडे मी केवळ एक अर्थशास्त्रीय तत्त्व म्हणून पाहात नसून सर्व जीवनाची एक निष्ठाच मानतों. माझ्या बुद्धीनें व भावनेनें ती निष्ठा मीं स्वीकारलेली आहे. मी हिंदी स्वातंत्र्यासाठीं झटतों, याचें कारण माझ्यामधील राष्ट्रप्रेम परक्यांचें वर्चस्व सहन करूं शकत नाहीं; पण त्याहिपेक्षां बलवत्तर कारण म्हणजे सामाजिक व आर्थिक क्रांतीची पूर्वतयारी त्या राजकीय स्वातंत्र्यानेंच होते. माझी अशी इच्छा आहे कीं, कॉंग्रेस ही एक समाजवादी संस्था बनावी आणि तिनें नव्या संस्कृतीसाठीं झगडणाऱ्या जगांतील अन्य शक्तींशीं सहकार्य करावें. अर्थात् मी हें जाणतों कीं, प्रत्येक देशांत त्याच्या परिस्थितीप्रमाणेंच समाजवादाचें स्वरूप राहील."

'समाजवाद व गांधीवाद यांना जोडणारा पूल' असें कार्य जवाहरलालांनीं केलें.

फैजपूरची पहिली ग्रामीण काँग्रेस

लखनौ काँग्रेसमध्यें जे ठराव झाले, त्यांत शेतकऱ्यांच्या उद्धाराचा कार्यक्रम आंखण्यांत आला व प्रांतिक निवडणुकी लढविण्याचा आदेश देण्यांत आला. आपला समाजवादी कार्यक्रम पुढें रेटतां यावा म्हणून जवाहरलालांनीं आपल्या कार्यकारिणींत जयप्रकाश नारायण, आचार्य नरेंद्र देव व अच्युतराव पटवर्धन या तीन समाजवादी नेत्यांचा समावेश केला.

योगायोग असा कीं, त्याच वर्षी, त्याच पुढाऱ्यांचे अध्यक्षतेखालीं, काँग्रेसचें दुसरें अधिवेशन भरलें. १९३६ सालींच, जवाहरलालांच्या अध्यक्षतेखालीं, फैजपूर येथें काँग्रेसचें ५० वें अधिवेशन भरलें. महाराष्ट्रांतील हें दुसरें अधिवेशन. तसेंच खेड्यांत भरणारें तें पहिलें अधिवेशन. या दोन्ही कारणांमुळें या अधिवेशनासंबंधीं महाराष्ट्रांत उत्साहाची लाट उसळली. विधायक कार्यांचे गांधीवादी, विधिमंडळाकडे ओढले जाणारे कौन्सिलवादी व साम्यवादाचें नवदर्शन झालेले समाजवादी–या तिन्ही वर्गांचें सहकार्य फैजपूर काँग्रेसला लाभलें व त्यामुळें तिचें महत्त्व वाढलें. स्वराज्याची निःसंदिग्ध घोषणा करणारी कलकत्ता येथील १९०६ ची काँग्रेस, नेमस्त-नेतृत्व सोडून जहालाचे हातीं जाऊं पाहणारी सुरत येथील १९०७ सालची काँग्रेस, मुस्लिम लीगशीं ऐक्याचा करार करून सरकारशीं एकजुटीनें सामना देण्यास सिद्ध झालेली लखनौ येथील १९१६ सालची काँग्रेस, असहकारितेचें अभिनव शस्त्र धारण करून स्वातंत्र्याच्या रणांगणाकडे कूच करणारी नागपूर येथील १९२० सालची काँग्रेस, संपूर्ण स्वातंत्र्याचा ध्वज उभारणारी लाहोर येथील १९२९ सालची काँग्रेस–तशीच महत्त्वपूर्ण काँग्रेस फैजपूरची झाली.

या काँग्रेसच्या मंडपाला ‘ टिळकनगर ’ असें नांव देण्यांत आलें होतें; व व्यास–स्तूपावर लो. टिळकांचा मोठा फोटो झळकत होता; त्यांचा अर्ध पुतळाहि अन्यत्र होता. प्रमुख प्रवेशद्वाराला ‘ छत्रपति शिवाजी ’ असें नांव दिलेलें असून शिवाजीमहाराजांचा अर्ध पुतळाहि तेथें सर्वांना स्फूर्ति देत होता. डॉ. टागोरांच्या ‘ शांतिनिकेतनां ’तील सुप्रसिद्ध कलावंत नंदलाल बोस यांनीं मातीचें सोनें करणारी आपली किमया दाखवून सर्वांना चकित केलें. तट्ट्यांच्या तंबूवर कळकांचे कळस बसवून आणि प्रवेश-

द्वारावर ग्रामीण जीवनाचीं चित्रें रंगवून त्यांनीं काँग्रेसला साधेपणाचें सौंदर्य मिळवून दिलें.

फैजपूर काँग्रेसनें निवडणुका लढविण्याचा निर्णय दिला असला, तरी सरकारशीं व त्यांच्या राज्यघटनेशीं काँग्रेसचा विरोध कायमच होता. जवाहरलालांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत स्पष्टच सांगितलें होतें कीं, " ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं कोणत्याहि रीतीनें सहकार्य करण्यासाठीं काँग्रेस कायदेमंडळांत जात नाहीं, तर त्यांच्याशीं सामना देण्यासाठीं व सरकारचा नवा घटनाविषयक कायदा नष्ट करण्यासाठीं आम्ही स्वातंत्र्यासाठीं लढत आहों, हें कोणीहि विसरतां कामा नये."

या काँग्रेसचें पहिलें वैशिष्टय म्हणजे ती खेड्यांत भरली. दुसरें असें कीं, किसानांनीं पायीं यात्रा काढून, आपली परिषद काँग्रेसच्या परिसरांत भरविली. तसेंच कांहीं काँग्रेस-भक्तांनीं मुंबईहून फैजपुरापर्यंत पदयात्रा करून स्वातंत्र्याची 'अखंड-ज्योत' नेली हें तिसरें वैशिष्टय. कॉ. रॉय व सरहद्द गांधी हे थोर पुढारी नुकतेच बंधमुक्त होऊन अधिवेशनाला उपस्थित राहिले. या चौथ्या वैशिष्टयामुळें, या काँग्रेसचें आकर्षण वाढलें. तसेंच आकर्षण होतें ग्रामोद्योगाचें भव्य प्रदर्शन. आणि या सर्वांवर कळस म्हणजे, राष्ट्रसभेचा मुकुट त्रिवार धारण करणाऱ्या जवाहरलालांचें तेजस्वी व्यक्तिमत्त्व. त्यांचें कोडकौतुक काँग्रेसमध्यें इतकें झालें कीं, त्यांनीं समारोपाच्या भाषणांत असे कृतज्ञ उद्‌गार काढले,

" आपने मुझे आसमानपर चढ़ा दिया है।"

हें अधिवेशन दोन दिवस चाललें व २१ ठराव मंजूर झाले. नव्या सुधारणांचा विध्वंस करण्यासाठीं निवडणुकींत भाग घेण्याचा निर्णय झाला; पण अधिकार-पदाच्या स्वीकाराचा प्रश्न पुढील काळावर सोंपविण्यांत आला. काँग्रेसच्या समाप्तीचे वेळीं, आभार मानतांना, लोकनायक अणे यांनीं जवाहरलालांविषयीं असे भविष्यवादी उद्गार काढले कीं, " स्वतंत्र हिंदुस्थानच्या प्रजासत्ताक राज्याचे पहिले अध्यक्ष पं. जवाहरलाल होतील."

प्रांतिक स्वराज्याचें शासन

१९३७ सालीं काँग्रेसचें अधिवेशन भरलें नाहीं, तरी तें वर्ष काँग्रेसच्या दृष्टीनें अत्यंत आणीबाणीचें गेलें. किंबहुना तिच्या अर्धशतकाच्या जनसेवेची

सिद्धिच या वर्षी प्रगट झाली. प्रांतिक निवडणुकांमध्यें जनतेनें काँग्रेसला आपल्या संमतीची पूर्ण पावती दिली. काँग्रेसनें निवडणुकीचा जो जाहीरनामा काढला, त्यांत स्वातंत्र्याचें ध्येय घोषिलेलें होतें; आणि सरकारचा १९३५ चा घटना–कायदा हाणून पाडण्याचा निर्धारहि होता. त्या कायद्याच्या निषेधार्थ ता. १ एप्रिल १९३७ रोजीं सर्व देशानें हरताळ पाडला. त्याचप्रमाणें हिंदी जनतेच्या हिताची लोकशाही राज्यघटना बनविण्यासाठीं, प्रौढ मताधिकारानें निवडून आलेल्या घटनासमितीची स्थापना व्हावी, असेंहि जाहिरनाम्यांत म्हटलें होतें.

निवडणुकीच्या जाहीरनाम्यांत पुढील कलमेंहि महत्त्वाचीं होतीं. (१) जातिनिर्णयाचा निःसंदिग्ध निषेध. (२) शेतकऱ्यांचा सारा, खंड व कर्ज कमी करणें. (३) कामकऱ्यांना सुखसोयी मिळवून देणें. (४) राजबंद्यांची मुक्तता करणें. (५) दडपशाहीचे कायदे गाडून टाकणें. (६) नागरिक स्वातंत्र्याचे हक्क सर्वांना पूर्णत्वानें देणें.

अशा जाहीरनाम्याची पताका खांद्यावर घेऊन जवाहरलाल–राजेंद्रबाबू–प्रभृति राष्ट्रनेते राष्ट्रभर वायुवेगानें फिरले आणि त्याचें फल निकालांचे वेळीं दिसून आलें. १९३७ च्या फेब्रुवारींत निवडणुकींचे निकाल लागले. नवीन राज्यघटनेप्रमाणें सुमारें ३॥ कोटी लोकांना मताधिकार मिळाला होता. त्यांतील शें. ५४ लोकांनीं तो अधिकार बजावला. सर्व हिंदुस्थानांत १५८५ उमेदवार प्रांतिक विधिमंडळासाठीं निवडून आले. त्यांतील ७११ राष्ट्रसभेचे होते. बंगाल, पंजाब व सिंध या तीन मुस्लिम-प्रधान प्रांताशिवाय इतर सात प्रांतांत तिनें घसघशीत यश मिळविलें. त्यापुढील पायरी म्हणजे मंत्रिमंडळें बनविणें. पण त्यांना लोकहिताचीं कार्यें करण्यास वाव राहावा म्हणून काँग्रेसनें सरकारकडे १९३७ च्या मार्चमध्यें अशी मागणी केली कीं, " मंत्रिमंडळाच्या सनदशीर कार्यक्रमांत गव्हर्नरनें हस्तक्षेप करूं नये व त्यांचा सल्ला झिडकारूं नये. "

असें अभिवचन देण्यास सरकारनें तीन महिने घेतले व हंगामी मंत्रिमंडळांचें पोकळ राज्य सुरू केलें. पण अखेरीस जनताधिष्ठित काँग्रेसशीं सरकारनें सहकार्य केलें, आणि काँग्रेसची अट मान्य केली. त्यामुळें १७ जुलैपासून सात प्रांतांत काँग्रेसचा राज्यकारभार सुरू झाला.

मंत्र्यांच्या डोक्यावर गांधीटोपी व सरकारी कचेऱ्यांवर तिरंगी झेंडे फडकूं लागले आणि विधिमंडळांत 'वंदे मातरम्' चे सूर निनादले. काँग्रेसच्या पूर्वसंकल्पाप्रमाणें दारूबंदी सुरू झाली, अस्पृश्यता–निवारणास गति मिळाली, खादी-प्रसारास चालना लाभली, शिक्षणाची मूलोद्योग–योजना अंमलांत आली, शेतकऱ्यांकडे जमिनीची मालकी देण्याचे दिशेनें पावलें पडूं लागलीं, सावकाराचें व्याज व जमीनदारांचे खंड मर्यादित करण्यांत आले. शेतकऱ्याला कर्जमुक्त करण्यासाठीं 'तडजोड-मंडळें' स्थापण्यांत आलीं व मजुरांचे तंटे तोडण्यासाठीं कायदे करण्यांत आले. गुजरातमधील जप्त जमिनी शेतकऱ्यांना परत करण्यांत आल्या व वृत्तपत्रांना जामीनकीचे पैसे परत देण्यांत आले. २२७ संस्थांवरील बंदी एका हुकुमासरशीं निघाली आणि शेंकडों पुस्तकांवरील जप्ती तत्काळ उठविण्यांत आली. राष्ट्रीय विद्यापीठांच्या पदव्यांना सरकारी मान्यता मिळाली. गांधी-जयंति व टिळक-पुण्यतिथि यांच्या सुट्ट्या देण्यांत आल्या. ग्रामपंचायतींना जादा अधिकार मिळाले.

मंत्र्यांना कायद्यानें दरमहा ५,००० रुपये पगार दिला असतांना त्यांनीं, कराची काँग्रेसच्या आदेशानुसार, ५०० रुपयेच पगार घेतला आणि राजबंद्यांना व स्थानबद्धांना बंधमुक्त करण्यांत आलें.

राजबंद्यांची मुक्तता हा प्रश्न जितका जिव्हाळ्याचा तितकाच अभिमानाचाहि होता; आणि जितका तांतडीचा तितकाच अडचणीचाहि होता. तो सोडविण्यावर काँग्रेसनें आपली सारी शक्ति पणास लावली. कारण राजबंद्यांची अवस्थाच तशी असह्य होती. एकट्या बंगाल प्रांतांत १९३६ च्या जुलैमध्यें २००० हून अधिक राजकीय कार्यकर्ते स्थानबद्ध केलेले होते. त्यांचा छळ इतका अमानुष होत असे कीं, तीन महिन्यांत तीन राजबंद्यांनीं लागोपाठ आत्महत्या केल्या! डाक्का, नारायणगंज इत्यादि विभागांत तर १२ ते ३० वर्षें वयाच्या कोणाहि नागरिकास सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत घराबाहेर पडण्यासच एक वर्ष बंदी करण्यांत आली होती. आणि हा बंदी-हुकूम मोडणाऱ्यास ६ महिन्यांची कैद!

वंगभूमीचे कंठमणि सुभाषचंद्र यांनाहि सरकारनें चौकशीविना स्थानबद्ध केलें होतें. या धोरणाच्या निषेधार्थ ता. १० मे रोजीं काँग्रेसनें सर्व

देशभर ‘ सुभाष-दिन ’ पाळला. तसाच ता. १३ सप्टेंबर रोजीं ‘ राजबंदी-दिन ’ पाळला; याशिवाय काँग्रेसचे अध्यक्ष जवाहरलाल यांनीं ‘ नागरिक-स्वातंत्र्य-संघ ’ स्थापन केला, आणि त्यामार्फत नागरिक स्वातंत्र्यावरील आक्रमणें व आघात थांबविण्याचा प्रयत्न केला.

त्यापूर्वीच्या पांच वर्षांत हिंदुस्थानांतील ५०० वृत्तपत्रांकडून जामीन मागण्यांत आले होते. त्यामुळें ३५० वृत्तपत्रें बंद पडलीं. बाकीच्या पत्रांना अडीच लाखांवर रुपये जामीन म्हणून भरावे लागले. मुद्रण-स्वातंत्र्य,संचार-स्वातंत्र्य, भाषण-स्वातंत्र्य या नागरिक हक्कांची अगदीं गळचेपी होत होती.

हरिपुरा काँग्रेसमधील अंतर्विरोध

अशा परिस्थितींतच १९३८ सालच्या फेब्रुवारी महिन्यांत हरिपुरा येथें काँग्रेस भरली. तिचें अध्यक्षस्थान सुभाषचंद्र बोस यांना देण्यांत आलें होतें. त्यांचा गांधीजींच्या तत्त्वज्ञानाशीं कडवा विरोध ! त्यामुळें यापुढील दोन-तीन वर्षें काँग्रेस व तिचे अध्यक्ष यांच्यामधील मतभेद व संघर्ष यामध्येंच गेलीं. हरिपुरा व त्रिपुरी या दोन्ही ठिकाणच्या अधिवेशनावर या विरोधाची व कटुतेची सांवलीच पडलेली दिसते. “ काँग्रेस कार्यकारिणी व सुभाषचंद्र यांच्यामध्यें राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धोरणावर मोठाच मतभेद होता. ” असें जवाहरलालांनीं लिहिलें आहे.

हरिपुरा येथील अधिवेशन ५१ वें असल्यामुळें ५१ बैलांच्या रथांतून अध्यक्षांची मिरवणूक काढण्यांत आली व ५१ प्रवेशद्वारांचें ‘ विठ्ठल-नगर’ उभारण्यांत आलें. देशांत मुसलमानांनीं दंगली माजविण्यास सुरुवात केली होती; म्हणून मुस्लिम लीगचे पुढारी बॅ. जिना यांच्याशीं वाटाघाटी करण्यास काँग्रेसनें सुरुवात केली. त्यांनीं आपल्या चौदा मागण्या जाहीर केल्या.

हरिपुरा काँग्रेसमध्यें खळबळ उडाली, एका घटनेनें. ती घटना म्हणजे, बिहार व संयुक्त प्रांत यांतील काँग्रेस मंत्रिमंडळांचे राजिनामे. राजिनाम्याचें कारण राजबंद्यांच्या मुक्ततेला गव्हर्नरांनीं घेतलेली हरकत. अधिवेशन चालू असतांनाच, त्या दोन प्रांतांचे मुख्य मंत्री राजिनामे देऊन तेथें दाखल झाले. त्यांचें स्वागत काँग्रेसजनांनीं, विजयी वीराप्रमाणें केलें. काँग्रेसचें पाठबळ मिळाल्यामुळें त्यांची बाजू बळकट झाली. ती इतकी कीं, दिल्ली

सरकारला मध्यें पडून त्यांची मागणी पूर्ण करावी लागली. नाहीं तर सातहि प्रांतांतील मंत्रिमंडळांनीं राजिनामे दिले असते आणि सर्व देशांत पेचप्रसंग निर्माण झाला असता.

हरिपुरा काँग्रेसमध्यें गांधीजींच्या विधायक कार्यक्रमावर व राष्ट्रीय शिक्षणावर भर देण्यांत आला. हातकागद वापरण्यास काँग्रेसनें प्रथमच सुरुवात केली. तसेंच ५०० गायींचें खिल्लार तेथें उभें करण्यांत आलें होतें व त्यांचें दूध प्रतिनिधींना पुरविण्यांत आलें होतें. निरनिराळ्या विधायक कार्यासाठीं अ. भा. सूतसंघ, अ. भा. हरिजन संघ, अ. भा. ग्रामोद्योग संघ इत्यादि स्वतंत्र संस्था स्थापन करण्यांत आल्या. संस्थानांत जबाबदारीची राज्यपद्धति सुरू करावी असाहि ठराव झाला. तसाच किसानांच्या संघटनेबद्दलहि स्वतंत्र ठराव करण्यांत आला.

त्रिपुरी काँग्रेसमध्यें संघर्ष

" आमचें ऐक्य टिकविण्यासाठीं, आमचें स्वातंत्र्य-युद्ध द्वेषरहित राखण्यासाठीं आणि आमच्या स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठीं—आम्हांला म.गांधी पुष्कळ वर्षें हवे आहेत. एवढेंच नव्हे तर, अखिल मानवजातीसाठीं त्यांचें मार्गदर्शन हवें आहे. कारण, भारत स्वतंत्र होणें म्हणजे मानवता सुरक्षित राहणें होय. " अशा गौरवास्पद शब्दांनीं, देशगौरव सुभाषचंद्र यांनीं, गांधीजींचें माहात्म्य वर्णिलें; पण देशाचें दुर्दैव असें कीं, त्या दोघां थोर नेत्यांमध्यें महान् विग्रह निर्माण झाला, तो इतका कीं, पुढील वर्षीं, १९३९ सालीं, त्रिपुरी येथें काँग्रेसचें जें अधिवेशन भरलें, त्याच्या अध्यक्षपदासाठीं सुभाषबाबू उभे असतांना गांधीजींनीं डॉ. पट्टाभिसीतारामय्या यांना उभे केलें. अध्यक्षपदासाठीं अशी चुरस काँग्रेसच्या इतिहासांत ही पहिलीच !

आश्चर्य असें कीं, गांधीजींचा पाठिंबा असतांनाहि, पट्टाभींना १३७६ मतें पडलीं, तर सुभाषबाबूंना, १५७५ मतें मिळालीं. त्यामुळें त्रिपुरी काँग्रेसला अध्यक्ष म्हणून ते गेले, पण कसे ? रुग्णशय्येवर पडून ! शिवाय गांधीजींनीं त्याच वेळीं राजकोट संस्थानांत प्राणान्तिक उपोषण आरंभिलें होतें. त्यामुळें काँग्रेसमधील चैतन्यच नाहींसें झालें होतें. तरी स्वागतमंडळानें, ठरल्याप्रमाणें, ५२ हत्तींच्या ताफ्यानिशीं सुभाषबाबूंच्या फोटोची

रथांतून मिरवणूक काढली. प्रत्येक हत्तीवर पूर्वीच्या एकएका राष्ट्राध्यक्षाची प्रतिमा विराजत होती. खादी-ग्रामोद्योगाच्या प्रदर्शनाचें उद्घाटन जवाहरलालांनीं केलें. ध्वजवंदनहि त्यांच्याच हस्तें झालें. म्युनिच कराराचा निषेध करणारा ठराव त्यांनीं मांडला आणि घटना-समितीची 'राष्ट्रीय मागणी' करणारा ठरावहि त्यांनींच काँग्रेसपुढें ठेवला.

'गांधीजींच्या सल्ल्यानुसार अध्यक्षांनीं कार्यकारिणी नेमावी' असा ठराव पं. गोविंदवल्लभ पंत यांनीं मांडला व तो मंजूरहि झाला. तो सुभाषबाबूंना कसा रुचावा ? ते बंड करून उठले. त्यांनीं एप्रिलमध्यें कलकत्ता येथें अ. भा. काँग्रेस कमिटीची सभा बोलावली. तींत त्यांनीं आपलीं अध्यक्षपदाचीं सूत्रें खालीं ठेवलीं. काँग्रेसचे अध्यक्ष व काँग्रेस-कार्यकारिणी यांच्यामध्यें तीव्र संघर्ष उत्पन्न झाला. तेव्हां अध्यक्षांनाच राजिनामा द्यावा लागला.

राजिनामा देऊन सुभाषचंद्रांनीं काँग्रेसमध्येंच 'फॉर्वर्ड ब्लॉक' नांवाचा पक्ष स्थापन केला. पण एवढें करूनच ते थांबले नाहींत. अ. भा. काँग्रेस कमिटीच्या दोन ठरावांचा निषेध त्यांनीं केला आणि ता. ९ जुलै रोजीं देशानें 'निषेध-दिन' पाळावा, असा आदेश दिला. काँग्रेसविरुद्ध ही उघड बंडखोरी होती. काँग्रेसविरुद्ध प्रतिस्पर्धी शक्ति उभी करण्याचा हा प्रयत्न काँग्रेस सहन कशी करील ? ता. ९ ऑगस्ट १९३९ रोजीं वर्धा येथें भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीनें असा ठराव केला कीं, ता. ९ जुलैचा 'निषेध-दिन' पाळल्यामुळें सुभाषचंद्रांच्या हातून भयंकर शिस्तभंगाचें कृत्य घडलें; म्हणून त्यांना काँग्रेसच्या कोणत्याहि अधिकारपदासाठीं उभें राहण्यास तीन वर्षें बंदी करण्यांत येत आहे. काँग्रेसच्या या अंतःस्थ युद्धाबरोबरच जगामध्यें दुसरें महायुद्ध चालू होतें. १९३९ च्या सप्टेंबरमध्यें त्याचा प्रारंभ झाला, आणि हिंदी जनतेला काडीमात्र न विचारतां, ब्रिटिश सरकारनें हिंदुस्थानला त्या युद्धकार्यांत गोंवलें. हा राष्ट्राचा उपमर्द होता—लोकशाहीचा अपमान होता—राज्यारूढ काँग्रेसचा तिरस्कार होता. त्यामुळें नोव्हेंबर महिन्यांत काँग्रेसनें आपलीं सात प्रांतांतील मंत्रिमंडळें रद्द केलीं. प्रांतिक स्वराज्याचे दीप महायुद्धाच्या झंझावातानें विझले. पुनः काँग्रेस लढ्याच्या मार्गाकडे वळली.

अशा परिस्थितींत रामगड येथें कॉंग्रेस भरली. तिचे अध्यक्षपदासाठींहि चढाओढ झाली. मौ. आझाद यांना १८६४ मतें मिळालीं, तर त्यांचें प्रतिस्पर्धी कॉ. रॉय यांना १८३ मतें पडलीं.

रामगड हें गांव डोंगर-दऱ्या व ओढे-नद्या यांच्यामध्यें वसलेलें, त्यांतच ऐन अधिवेशनाच्या वेळीं मुसळधार पाऊस ! तरी कॉंग्रेसचा सर्व कार्यक्रम संक्षेपानें पण यथाविधि पार पडला. स्वागताध्यक्षांचें भाषण झालें—अध्यक्षांचें भाषण झालें—ठरावहि मांडले गेले. पण ते अवघ्या चार तासांत ! दुसरे दिवशीं उंच जागीं असलेल्या ध्वजस्तंभाजवळ अधिवेशन भरलें. स्वागताध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद हे होते. अध्यक्ष मौ. आझाद यांनीं स्वातंत्र्य-लढयाचें शिंग फुंकलें.

१९४० च्या ऑक्टोबरमध्यें कॉंग्रेसनें ‘ वैयक्तिक सत्याग्रह ’ पुकारला आणि १९४१ च्या एप्रिलमध्यें, युद्धविरोधी घोषणा करण्याचा ‘ प्रातिनिधिक सत्याग्रह ’ सुरू केला. त्यांत २० हजारांवर कॉंग्रेस–कार्यकर्त्यांनीं भाग घेतला व ते तुरुंगांत गेले. युद्धकाळांत ब्रिटनच्या लोकशाही सरकारला विघ्न आणूं नये अशी कॉंग्रेसची इच्छा, तर त्याच युद्धकार्याला साहाय्यभूत होण्यासाठीं हिंदुस्थानाच्या हातांतील शृंखला तत्काळ तोडाव्या अशीहि तिला घाई ! त्यामुळें कॉंग्रेसनें लढा तर चालविला, पण त्याला सामुदायिक स्वरूप दिलें नाहीं, किंवा करबंदीची तीक्ष्णताहि आणली नाहीं.

“ तुमचे युद्ध-हेतु तरी काय ? ” असें कॉंग्रेस सरकारला वारंवार विचारीत होती, आणि “ स्वतंत्रता व लोकशाही यांचें संरक्षण करण्यासाठीं तुम्ही लढत असाल, तर तीं तत्त्वें आपल्या पायाखालीं तुडविल्या जाणाऱ्या हिंदुस्थानला प्रथम लागू करा. ” असा लकडा सरकारच्या मागें लावीत होती. पण ब्रिटिश सरकारला, प्राण–संकटांत सांपडले असतांनाहि, सुईच्या अग्राइतकीहि सत्ता सोडवत नव्हती.

सरकारशीं समेट करण्याचा व त्यासाठीं पडतें घेण्याचा जास्तींत जास्त प्रयत्न कॉंग्रेसनें १९४० सालीं केला. त्या वर्षी ता. २७ जुलै रोजीं पुणें येथें भरलेल्या अ. भा. कॉं. कमिटीनें सरकारच्या युद्धकार्याशीं सहकार्य करण्याचें धोरण आंखलें व त्यासाठीं अहिंसेचे प्रणेते असलेले गांधीजी यांना कॉंग्रेसमधून अलिप्त ठेवलें.

" सरकारनें हिंदुस्थानच्या पूर्ण स्वातंत्र्याची घोषणा करावी, मध्यवर्ती विधिमंडळ व प्रांतिक मंत्रिमंडळें यांच्या विश्वासास पात्र होणारें तात्पुरतें राष्ट्रीय सरकार स्थापावें म्हणजे राष्ट्रसभा स्वदेशरक्षणाच्या युद्धकार्यांत सर्वतोपरि साहाय्य करील—त्या कामीं अहिंसेचें बंधन मानणार नाहीं. "असा त्रिदलात्मक ठराव संमत झाला. पण सरकारनें काँग्रेसचा सहकार्याचा हात झिडकारला. परंतु जपाननें सिंगापूर घेतलें, रंगून बळकावलें; तेव्हां हिंदुस्थानच्या तोंडाला पानें पुसण्यासाठीं, ता. २२ मार्च १९४१ रोजीं, ब्रिटिश मंत्री मि. क्रिप्स हिंदुस्थानांत आले व त्यांनीं आपल्या स्वराज्य-योजनेवर येथील विविध पक्षांच्या पुढाऱ्यांशीं सतरा दिवस चर्चा केली. या क्रिप्स-योजनेंत हिंदुस्थानचीं तीन शकलें पाडण्यांत आलीं होतीं आणि लष्करी खातें संपूर्णपणें ब्रिटिशांच्याच ताब्यांत राहणार होतें. त्यामुळें काँग्रेसनें व इतर पक्षांनींहि ही योजना फेंटाळून लावली. आतां काँग्रेसला प्रत्यक्ष लढा दिल्याशिवाय गत्यंतरच नव्हतें.

'चले जाव'चें आंदोलन

एका सोमवारीं गांधीजींचें मौन चालू होतें—आणि तसेंच देश-स्थितीचें मननहि. " क्रिप्स—मिशननें राष्ट्राची दारुण निराशा केली आहे आतां पुढें काय? ब्रिटिश सत्ता आमच्या प्रगतीचा मार्गच रोंखून धरीत आहे आणि महायुद्ध तर नरडें धरीत आहे. अशा वेळीं त्या सत्तेला येथून निघून जा, असेंच सांगितलें पाहिजे. " असे विचार गांधीजींच्या चित्तांत, पावसाळी ढगाप्रमाणें, जमूं लागले. नंतर त्या विचारांचे जल-बिंदु ते आपल्या सहकाऱ्यांच्या कानांवर घालूं लागले. पण जपानचे बाँब भारताच्या किनाऱ्यावर पडत असतांना देशांत चळवळ सुरू करणें बहुतेक सहकाऱ्यांना योग्य वाटलें नाहीं. तेव्हां गांधीजींनीं निर्वाणीची घोषणा केली. " तुम्ही कोणी न आलां, तर मी एकटा, काँग्रेसशिवायहि, 'चले जाव' ची चळवळ चालवीन. तसें करणेंच हिंदुस्थानच्या, इंग्लंडच्या, साऱ्या जगाच्या हिताचें आहे. "

" गांधी बोले, राष्ट्र हाले. " अशी स्थिति तेव्हांहि, गांधीजी काँग्रेसचे सभासद नसतांनाहि, विद्यमान होती. त्यामुळें ता. २७ एप्रिल १९४२ रोजीं अलाहाबाद येथें भरलेल्या कार्यकारिणींत स्वातंत्र्य-लढा सुरू करण्याचा ठराव संमत झाला. त्याचप्रमाणें देशाच्या फाळणीला विरोध करण्याचा

ठराव अखिल भारतीय काँग्रेस कमिटींत संमत झाला. अखेर १९४२ च्या ऑगस्टमध्यें लढ्याचें शिंग फुंकणारा ठराव देशापुढें आला.

सुमारें साठ वर्षांपूर्वी काँग्रेसचें पहिलें अधिवेशन ज्या ठिकाणीं भरलें, त्या जन्मस्थानीं–म्हणजे मुंबई येथील गवालिया टँकवर–हें क्रांतिकारक अधिवेशन, ता. ७ ऑगस्ट १९४२ रोजीं शुक्रवारीं दुपारीं, उत्कंठेच्या वातावरणांत सुरू झालें. समितीच्या ३५० प्रतिनिधींपैकीं २५० हजर होते आणि प्रेक्षकांची संख्या तर काँग्रेसच्या खुल्या अधिवेशनाला शोभण्यासारखी होती. मंडपांत हजारों प्रेक्षक खेचून भरले होते आणि त्याहून अधिक लोक मंडपाबाहेर तीव्र उत्सुकतेनें समितीच्या निर्णयाची वाट पाहात तासन्‌तास उभे होते, आणि अदृश्य असे कोट्यवधि हिंद बांधव अधिवेशनाकडे डोळे लावून सर्व देशांत बसले होते.

अध्यक्ष मौ. आझाद व म. गांधी यांचीं भाषणें प्रथम झाल्यावर जवाहरलालांनीं राष्ट्राचें भवितव्य ठरविणारा 'चले जाव' चा ठराव मांडला. या ठरावांत—(१) ब्रिटिश सत्तेचें तत्काळ विसर्जन. (२) हंगामी राष्ट्रीय सरकारची स्थापना व पुढें (३) घटना-समितीमार्फत संघराज्याची योजना—अशा निश्चित मागण्या केलेल्या होत्या आणि त्या ब्रिटिशांनीं अमान्य केल्यास सामुदायिक व अहिंसक लढा सुरू करण्याचा आदेश जनतेला दिलेला होता.

ठरावावरील तीन उपसूचना घेण्यांत आल्या व तीन फेटाळण्यांत आल्या आणि ठराव प्रचंड बहुमतानें संमत झाला. विरोध करणारे फक्त तेरा प्रतिनिधि निघाले.

नंतर गांधीजींचें हिंदीमध्यें सत्तर मिनिटें व इंग्रजींत वीस मिनिटें भाषण झालें. 'तुम्ही स्वतःला स्वतंत्र माना.' असा संदेश आणि 'करेंगे या मरेंगे' अशी रणघोषणा त्यांनीं हिंदुस्थानला दिली.

गांधीजी व्हॉइसरॉयाकडे समेटाचा अखेरचा खलिता पाठविणार होते. पण व्हॉइसरॉयानें ता. ९ रोजीं पहाटेच गांधीजीप्रभृति सर्व काँग्रेसनेत्यांना एकाएकीं पकडलें. आणि गांधीजींशिवाय इतर काँग्रेसश्रेष्ठींना अहमदनगरच्या किल्ल्यांत डांबून ठेवलें. गांधीजींना वेगळें काढून पुण्याजवळील 'आगाखान–वाड्यांत' स्थानबद्ध करून ठेवलें. तेथें एका

आठवड्याचें आंत, ता. १५ रोजीं सकाळीं, गांधीजींचे पुत्रतुल्य सहकारी महादेवभाई देसाई एकाएकीं निधन पावले. नंतर सुमारें दोन वर्षांनीं, ता. २२ फेब्रुवारी १९४४ रोजीं, गांधीजींच्या सहचारिणी सौ. कस्तुरबा यांनीं तेथेंच देह ठेवला. त्या दोघांच्या समाधि जवळजवळ बांधलेल्या आहेत आणि भक्तीचा व सेवेचा संदेश देत आहेत.

पुढाऱ्यांच्या या आकस्मिक धरपकडीनें सरकारनें जनतेच्या भावनेवर हिंस्र हल्ला केला. त्यामुळें जनतेच्या संतापाला पारावार राहिला नाहीं. शाळा, पोस्ट-ऑफिसें, स्टेशनें, पोलिस चौक्या—वाटेल त्याची राखरांगोळी करून बेफाम जनता परक्या सरकारला आव्हान देत होती—त्यांचें जणुं अस्तित्वच नाकारीत होती. बॉम्बचे स्फोट जागोजाग होऊं लागले.

सातारा, बालिया, भागलपूर, मिदनापूर वगैरे भागांत तर 'प्रतिसरकारें' स्थापन झालीं. चार महिने परक्या सत्तेची नांवनिशाणीहि तेथें राहिली नाहीं. कामगारवर्गानेंहि स्वयंस्फूर्तीनें संप पुकारले आणि ते दीर्घकाळ नेटानें टिकविले. पोलिस-कचेऱ्या, मामलेदार-कचेऱ्या वगैरेवर मोर्चे नेऊन, त्यावर तिरंगी झेंडे फडकावून, क्वचित् त्या कचेऱ्यांना आगीहि लावून, हिंदुस्थानांतील ठिकठिकाणच्या जनतेनें स्वयंस्फूर्तीनें व निधड्या छातीनें सरकारी राज्ययंत्र बंद पाडलें. १८५७ च्या क्रांतियुद्धानंतर हिंदी जनतेच्या सरकारविरोधी भावना इतक्या व्यापकपणें व उत्कटपणें याच वेळीं उसळून आल्या.

उलट, सरकारनें आपलीं दडपशाहींचीं सर्व शस्त्रास्त्रें उगारलीं. संचार-बंदी, भाषणबंदी, मुद्रणबंदी यांचे जालीम-कायदे जारी झाले. दंड—शिक्षा—फटके यांना उत आला. लाठीमार व गोळीबार नित्याचे प्रकार ठरले. ब्रेनगन व मशीनगन बालांचे व अबलांचे प्राण बेभानपणें घेऊं लागल्या. विध्वंसक कृत्यांना उत्तेजन देण्याच्या गुन्ह्याला फांशीची शिक्षा देण्यांत आली. सरकारच्या माहितीप्रमाणें अवघ्या पांच महिन्यांत ६०२२९ लोकांना अटक झाली, १८,००० माणसांना स्थानबद्ध करण्यांत आलें, ९४० इसम ठार झाले आणि १६३० जण जखमी झाले. ५०० माणसांना फटके लगावण्यांत आले.

पांचशेंहून अधिक वेळां पोलिसांनीं व सैनिकांनीं निःशस्त्र नागरिकांवर गोळीबार केल्याची कबुली सरकारनेंच दिली आहे. जनतेचा अंदाज असा आहे कीं, सुमारें पंचवीस हजार तरी हिंदी नागरिकांचे सरकारनें बळी घेतले.

असें हें निकराचें युद्ध चालू राहिलें, दुसरें महायुद्ध संपेपर्यंत! त्याचे आधीं ता. ६ मे १९४४ रोजीं गांधीजींची आजारीपणामुळें मुक्तता झाली. नंतर त्यांनीं सप्टेंबरमध्यें बॅ. जिनाशीं वाटाघाटी करून अखंड भारताचा पुरस्कार केला. पण जिनांना पाकिस्तानच हवें होतें.

त्यामुळें त्या दोघांचा समेट होऊं शकला नाहीं.

जर्मनी ता. ७ मे १९४५ रोजीं दोस्त राष्ट्रांना शरण गेला. आणि जपाननें त्याच वर्षीं ता. १४ ऑगस्ट रोजीं तोच कित्ता गिरविला. त्यामुळें महायुद्ध समाप्त झालें. १९४५ च्या जूनमध्यें कॉंग्रेसश्रेष्ठी बंधमुक्त झाले. युद्धमुक्त झालेले ब्रिटिश सरकार आतां त्यांच्याशीं वाटाघाटी करूं लागले. व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल ह्यांनीं सिमला परिषदेचीं आवर्तनें सुरू केलीं, पण तीं वांझ ठरलीं. तथापि काळच सरकारला हिंदी स्वातंत्र्याच्या वाटेवर पुढें ढकलीत होता. इंग्लंडमध्यें ता. २६ जुलै १९४५ रोजीं 'मजूर पक्ष' राज्यावर आला. त्याला कॉंग्रेसची मागणी न्यायाची वाटत होती. त्यांनीं हिंदुस्थानांत निवडणुकी घेण्याचें जाहीर केलें.

कॉंग्रेसनें निवडणुकीचा जो जाहीरनामा सर्व राष्ट्रांपुढें ठेवला, त्यांत 'चले जाव' च्या ठरावाचा पुनः पुरस्कार करण्यांत आला आणि स्वातंत्र्यावर भर देण्यांत आला. स्वतंत्र हिंदुस्थानांत 'समाईक-सहकारी स्वराज्य' (Co-operative Commonwealth) स्थापन करण्याची योजना या जाहीरनाम्यांत आंखण्यांत आली होती. 'राजकीय स्वातंत्र्याचा गाभा आर्थिक व सामाजिक असला पाहिजे' असा सिद्धान्त मांडून नागरिकांचे बारा मूलभूत हक्क या जाहीरनाम्यांत नोंदलेले होते.

नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यांत निवडणुकीचे मतदानास प्रारंभ झाला. निवडणुकींत कॉंग्रेस प्रचंड बहुमतानें निवडून आली.

स्वातंत्र्याचा सूर्योदय

लोकशाहीचा हा कौल इंग्लंडांतील मजूर पक्षानें आनंदानें स्वीकारला. त्यांनीं हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याची योजना ठरविण्यासाठीं १९४६ च्या जानेवारींत, पार्लमेंटांतील भिन्न भिन्न पक्षांच्या दहा सभासदांचें शिष्टमंडळ हिंदुस्थानांत पाठविलें, पण तें यशस्वी झालें नाहीं. म्हणून तीन ब्रिटिश मंत्र्यांचें शिष्टमंडळ हिंदुस्थानांत मेमध्यें आलें. तेंहि मुस्लिमलीगचें समाधान करूं शकलें नाहीं. तथापि ब्रिटिश मंत्रिमंडळानें ता. १६ जून रोजीं हंगामी सरकारची घोषणा केली, आणि संस्थानासकट सर्व हिंदुस्थानांतून विधिमंडळांनीं निवडलेल्या प्रतिनिधींची 'घटना–समिति' भरविण्याचा संकल्प केला.

ता. २ सप्टेंबर १९४६ रोजीं काँग्रेसनें हंगामी मंत्रिमंडळ बनविलें. त्या दिवशीं मुस्लिम लीगनें सर्वत्र काळी निशाणें दाखविलीं आणि ता. १६ ऑगस्ट रोजीं 'प्रत्यक्ष-प्रतिकार-दिन' (Direct-Action Day) साजरा केला. तेव्हांपासून देशांत अत्याचाराला-रक्तपाताला-यादवीला प्रारंभ झाला. त्याची भीषणता शब्दापलीकडे आहे. शांतता ठार झाली. कायदा अनाथ झाला. बंधुभाव नामशेष झाला. सभ्यता विधवा बनली. नौखालींत तर नरकच अवतरला. कलकत्त्यांत एखाद्या युद्धासारखी सररहा कत्तल झाली. रस्त्यारस्त्यांवर, स्टेशनास्टेशनांवर शेंकडों हिंदूंच्या मुडद्यांचे ढीग दिसूं लागले. आगगाड्या थांबविण्यांत येऊन त्यांतील उतारूंच्या माना चरचरा चिरण्यांत आल्या. लुटालूट व जाळपोळ यांना तर ऊतच आला. एकट्या बंगालमध्यें पहिल्या तीन दिवसांतच पांच हजारांवर माणसें प्राणास मुकलीं व पंधरा हजारांवर जखमी झालीं. तेथील लीग सरकार हा जातीय भडका स्वस्थपणें पाहात होतें–किंबहुना त्यांचे अधिकारी त्यांत तेलच ओतीत होते. मानवतेला काळिमा फासणारीं अशीं रानटी व पाशवी कृत्यें साऱ्या जगाच्या इतिहासांत क्वचितच सांपडतील.

याची प्रतिक्रिया म्हणून बिहारमधील हिंदूंनीं व पंजाबमधील शीखांनीं तसेंच अत्याचार केले. देशांत हाहाःकार माजला ! लीगचे हे बाहेरचे हल्ले, तसेंच राज्ययंत्राच्या आंतूनहि विघ्न आणण्याचें तिनें ठरविलें. म्हणून ता. २६ ऑक्टोबर १९४६ रोजीं तिनें विध्वंसक वृत्तीनें मध्यवर्ती मंत्रिमंडळांत

प्रवेश केला. त्यामुळें अधिकच कटकटी सुरू झाल्या. म्हणून हिंदुस्थानचीं दोन शकलें करून त्यांना स्वातंत्र्य बहाल करण्याचें कार्य मजूर-मंत्रिमंडळानें आपल्या अंगावर घेतलें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचें बिल पार्लमेंटमध्यें तडकाफडकीं मंजूर करून घेण्यांत आलें. चाळीस कोटी लोकांच्या दीडशें वर्षांच्या पारतंत्र्याचा नाश करणारें आणि हिंदुस्थानांतील नानाविध वर्गांच्या, जमातींच्या व पक्षांच्या मागण्यांचा शक्य तितका समन्वय साधणारें हें बिल किती मोठें होतें? अवघें बावीस कलमांचें आणि तीन परिशिष्टांचें! हें लहान आकाराचें पण महान् प्रभावी असें बिल ता. १८ जुलै १९४७ रोजीं, कॉमन्स व लॉर्ड्स या दोन्ही सभांमधील तिन्ही वाचनांचे संस्कार आटोपून, बादशहाच्या संमतीनें कायद्याचें स्वरूप पावलें. त्याचें पहिलें वाचन मंजूर होण्यास अवघा एक सेकंद लागला आणि उमराव सभेंतील तिन्ही वाचनें ५ तासांत उरकलीं.

ब्रिटिश सरकारनें ता. ३ जून १९४७ रोजीं, हिंदुस्थानच्या फाळणियुक्त स्वातंत्र्याची घोषणा केली आणि तदनुसार कायदा करण्यास त्यांनीं पुरता एक महिनाहि घेतला नाहीं. स्वातंत्र्याचें काम घटना-समितीवर सोंपवून व फाळणीचा वाद मिटविण्याचा भार एका कमिटीवर टाकून, ब्रिटिश सरकार आपल्या जबाबदारींतून झटपट मोकळें झालें.

काँग्रेसच्या अध्यक्षपदाचीं सूत्रें मौ. आझाद यांनीं पांच वर्षांच्या उत्पाताच्या काळांत संभाळली होतीं, तीं त्यांनीं १९४६ च्या जुलैमध्यें मुंबई येथें भरलेल्या अ. भा. काँग्रेस कमिटीमध्यें जवाहरलालांच्या हातीं सोंपविलीं. जवाहरलाल काँग्रेसचे अध्यक्ष चौथ्यांदा झाले. पण हंगामी मंत्रिमंडळांत पंतप्रधानाचें काम त्यांना करावें लागल्यामुळें, ता. २३ सप्टेंबर १९४६ रोजीं, त्यांनीं काँग्रेसचें अध्यक्षपद सोडलें.

स्वातंत्र्य व पाकिस्तान या महान् घटनांचा विचार करण्यासाठीं दिल्ली येथें ता. १४ जून १९४७ रोजीं अ. भा. काँग्रेस कमिटीची सभा भरली. आश्चर्य असें कीं, अशा आणीबाणीच्या बैठकीला सुमारें १०० प्रतिनिधि गैरहजर राहिले व जे हजर होते, त्यांतील ३२ तटस्थ राहिले. परिस्थितिपुढें अगतिक होऊन आणि मुस्लिम लीगचे देशांतील अत्याचार व मंत्रिमंडळांतील असहकार कायमचा थांबावा म्हणून, काँग्रेसनें आपल्या तत्त्वा-

विरुद्ध अत्यंत नाखुषीनें, पाकिस्तानाच्या निर्मितीला—म्हणजेच राष्ट्राच्या विच्छेदनाला—मान्यता दिली. लीगच्या दंगलीमुळें १९४६ सालांतील जुलै ते ऑक्टोबर या फक्त चार महिन्यांत ५०१८ माणसें ठार झालीं व १३३२० जखमी झालीं असें ब्रिटिश सरकारनेंच जाहीर केलें. सप्टेंबर ते नोव्हेंबर या तीन महिन्यांत या यादवीच्या नरकाग्नींत ६७,०० माणसांची आहुति पडली. नौखालींतील हत्याकांड शमविण्यासाठीं गांधीजी हातीं प्रेमाचा अमृतकुंभ घेऊन एकाकी पायीं चालत गेले.

तथापि ब्रिटिश सरकारनें खंडित हिंदुस्थानाला स्वतंत्र करण्याचा विडाच उचलला होता. तें कार्य ठरलेल्या मुदतीआधीं पुरें करण्याचें श्रेय लॉर्ड माऊंटबॅटन यांनीं घेतलें. ता. २२ मार्च १९४७ रोजीं हे २६ वे व शेवटले व्हाइसरॉय दिल्लींत येऊन दाखल झाले—आणि त्याच दिवशीं त्यांनीं गांधी–जिनांना भेटीचीं निमंत्रणें पाठविलीं. एखाद्या तडफदार सेनापति-प्रमाणें त्यांनीं आपलें काम नेटानें व कौशल्यानें, सर्वांच्या अपेक्षेआधीं संपाविलें. आणि ता. १५ ऑगस्ट १९४७ रोजीं हिंदुस्थानांत स्वातंत्र्य अवतरलें !

ता. ९ डिसेंबर १९४६ रोजीं जन्मास आलेली घटनासमिति ता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीं समाप्त झाली. विघ्न–विरोधांच्या वादळांतून जाऊन तिनें जी राज्यघटना सिद्ध केली, ती स्वतंत्र भारतानें ता. २६ जानेवारी १९५० रोजीं स्वीकारली आणि तेव्हांपासून पूर्ण स्वतंत्र, सार्वभौम, लोक-शाहीप्रधान प्रजा-सत्ताक राज्य येथें चालू झालें. या घटनेचा प्राणभूत सिद्धान्त म्हणजे,—

न्याय (सामाजिक, आर्थिक व राजकीय),
स्वातंत्र्य (विचार, उच्चार, समजुती, श्रद्धा आणि पूजा यांचें),
समानता (दर्जा आणि संधि यांत); आणि
भ्रातृभाव.

● ● ●

७ स्वातंत्र्यकालीन कार्य

काँग्रेसपक्ष सत्तारूढ झाला, तो स्वदेशाची प्रगति राज्ययंत्राचे साहाय्यानें करावी म्हणून. त्यामुळें काँग्रेसमधील प्रथम श्रेणींतील बहुतेक सर्व नेते प्रांतिक व केंद्रीय सरकारांत शिरले. त्याचा साहजिकच परिणाम, काँग्रेस–संस्थेला पूर्वीपेक्षां कमीपणा येण्यांत झाला. काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना वाटे, आपला अंकुश सरकारवर चालावा, पण सरकारांत काँग्रेसश्रेष्ठीच होते. त्यामुळें ते प्रभावी ठरत होते. अशा स्थितींत काँग्रेसपक्ष व काँग्रेस–सरकार यांच्यामध्यें बेबनाव होणें स्वाभाविकच होतें. तें संकट टाळण्यासाठींच गांधीजींनीं आपल्या आयुष्याच्या अखेरच्या दिवशीं, काँग्रेसला राजकारणांतून मुक्त करणाऱ्या 'लोकसेवक संघाची' योजना आंखली.

मीरत काँग्रेसच्या अध्यक्षाचा राजीनामा

१९४६ सालीं मीरत येथें काँग्रेसचें जें अधिवेशन भरलें, त्याचे अध्यक्ष आचार्य कृपलानी होते. पण त्यांना अशा बेबनावामुळेंच आपल्या अध्यक्ष-पदाचा राजिनामा १९४७ च्या नोव्हेंबरांत द्यावा लागला. अशा आणिबाणीचे वेळीं, आपल्या पूर्वपरंपरेप्रमाणें, राष्ट्रसभेची धुरा वाहण्यास राजेंद्रप्रसादच पुढें आले—त्यासाठीं त्यांनीं आपल्या मंत्रिपदाचाहि राजिनामा दिला. पण असा त्याग हा त्यांच्या तळहाताचा मळ होता.

जयपुराचा जीवन-शुद्धीचा आदेश

१९४८ सालीं जयपूर येथें डॉ. पट्टाभि सीतारामय्या यांच्या अध्यक्षतेखालीं काँग्रेस भरली. संस्थानांत भरणारें हें तिचें पहिलेंच अधिवेशन. मीरतहून अखंड ज्योति निघाली होती. सर्वोदयाचें प्रदर्शन विनोबाजींनीं उघडलें. 'गांधी-नगरांत' गांधीजींचा दहा फुटी पुतळा मूक-स्फूर्ति देत होता. तीन हजार प्रतिनिधि व दोन लाख श्रोते जमले होते.

विषयनियामक समितीमध्यें सरकारी कारभाराविषयींच्या असंतोषाला वाचा फुटली. ता. १८ डिसेंबर १९४८ रोजीं श्री. महेश दत्त मिश्रा यांनीं असा ठराव मांडला कीं, "काँग्रेसजनांनीं आपलें सार्वजनिक जीवन उच्च पातळीवर ठेवलें पाहिजे.—विशेषतः मंत्र्यांनीं या बाबतींत इतरांना कित्ता घालून दिला पाहिजे." हा ठराव १०७ विरुद्ध ५२ मतांनीं मंजूर झाला.

या ठरावांतील मंत्र्यांच्या अपमानाची व्यंजना जवाहरलालांना कळतांच, त्यांनीं दुसरे दिवशीं, त्या ठरावांतील मंत्र्यांचा उल्लेख, विषयनियामक समितींतील बहुमतानें काढून टाकला.

नाशिक काँग्रेसच्या अध्यक्षांचें त्यागपत्र

त्यापुढील काँग्रेस महाराष्ट्रांत भरली. १९५० सालीं सप्टेंबर महिन्यांत नाशिक येथें भरलेल्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तमदास टंडन हे होते. पण त्यांचाहि पंतप्रधान पं. नेहरूंच्या धोरणाशीं मेळ बसला नाहीं. त्यामुळें त्यांना आपल्या अध्यक्षपदाचा राजिनामा द्यावा लागला. त्याचे आधीं जवाहरलालांनीं कार्यकारिणीचें त्यागपत्र दिलें.—आणि त्याबरोबर कार्यकारिणीच्या सर्व सभासदांनीं १९५१ च्या सप्टेंबरमध्यें आपलेहि राजिनामे दिले ! टंडन एकटे उरले. तेव्हां त्यांनींहि आपलें त्यागपत्र सादर केलें.

एकाच अध्यक्षत्वानें तीन अधिवेशनें

दिल्ली येथें ता. १८ ऑक्टोबर १९५१ रोजीं काँग्रेसचें ५७ वें अधिवेशन भरलें. त्याचे अध्यक्ष जवाहरलाल. अधिवेशनाच्या आदले दिवशीं मंडप जळून खाक झाला. तथापि अधिवेशनाचा हा सारा कारभार एक-

जिनसी व एकसूत्री पद्धतीनें शेवटास गेला. जवाहरलालांनीं आपल्या कार्यकारिणींतील १५ सभासदांपैकी ९ मंत्री घेतले. कॉंग्रेसच्या घटनेचा हा भंग होता. म्हणून तो दोष त्यांनीं पुढें काढून टाकला. कॉंग्रेस अधिक शिस्तबद्ध व्हावी, म्हणून १९५२ च्या फेब्रुवारींत ९ सभासदांची एक पोटसमिति नेमण्यांत आली. कॉंग्रेसमध्यें पूर्वींचें तेज, पूर्वींचें चैतन्य, पूर्वींचें वैराग्य निर्माण व्हावें, ह्यासाठीं जवाहरलाल तळमळत होते.

जवाहरलाल ह्यांच्या अध्यक्षतेखालींच हैदराबाद येथें ता. १७ जानेवारी १९५३ रोजीं ५८ वें अधिवेशन भरलें. अध्यक्षीय भाषणांत पंचवार्षिक योजना, भाषावार प्रांतरचना इत्यादि सरकारापुढील प्रचलित प्रश्नांची चर्चा होती.

कलकत्त्याजवळील कल्याणी येथें ता. २१ जानेवारी १९५४ रोजीं कॉंग्रेस भरली. धों धों पाऊस पडत असतांनाहि ध्वजवंदन करण्यांत आलें. त्यासाठीं ७५ फूट उंचीचा पोलादी स्तंभ उभारण्यांत आला होता. तसाच ' भूदान–स्तूप ' विनोबाजींच्या शांतिपूर्ण क्रांतीचें दर्शन घडवीत होता आणि विनोबाजींचा पुतळाहि तेथें भू–दान यज्ञाच्या निःशब्द ऋचा म्हणत होता. ' तेनसिंग-स्तंभ ' हिमालयाच्या आरोहणाचीं साधनें दाखवीत होता आणि भारतीयांच्या अजिंक्य साहसाचे मूक पोवाडे गात होता. जवाहरलालांच्या भाषणांत पाकिस्तान, आफ्रिका, कोरिया, गोवा यांतील प्रश्नांचा ऊहापोह केलेला होता आणि पंचवार्षिक योजनेचा पुरस्कार केलेला होता. त्यांनाच पाठिंबा देणारे ठराव मंजूर झाले.

पांच अधिवेशनांचे एक अध्यक्ष

कॉंग्रेस व सरकार यांमध्यें आतां ' सरूपता ' निर्माण झालेली असल्यानें कॉंग्रेसचे ठराव हे बहुधा सरकारच्या झालेल्या कार्यास पाठिंबा देणारे किंवा भावी धोरणास पुष्टि देणारे असेच होत होते. कल्याणीनंतर जवाहरलालांनीं आपल्या मस्तकावरील अनेक महान जबाबदाऱ्यांपैकीं कॉंग्रेसच्या अध्यक्षपदाची जोखीम सोडली असली, तरी त्यांच्याच कलानें चालणारे अध्यक्ष कॉंग्रेसला मिळाल्यामुळें, पूर्वींप्रमाणें बेबनाव न होतां, सामरस्यानें कॉंग्रेसचा कारभार चालूं लागला.

१९५५ सालची काँग्रेस मद्रासजवळील आवडी येथें भरली. तिचे अध्यक्ष श्री. ढेबर हे होते. तेव्हांपासून आतांपर्यंत त्यांनींच अध्यक्षपदाचीं सूत्रें आपल्या हातीं खेळविलीं आहेत. आवडी काँग्रेसनें भारताचें ध्येय "समाजवादी पद्धतीची समाजरचना" (Socialistic Pattern of Society) हें ठरविलें.

पुढील अधिवेशन १९५६ सालीं अमृतसर येथें भरलें आणि १९५७ ची काँग्रेस इंदूर येथें भरली. आसाममधील 'प्राग्‌ज्योतिषपूर' येथें १९५८ चें अधिवेशन भरलें. आणि आतां १९५९ च्या जानेवारीच्या पहिल्या आठवड्यांत नागपूर येथें काँग्रेस भरत आहे.

जन-सेवेसाठीं व्रत-बद्ध झालेली काँग्रेस पूर्वी स्वातंत्र्य-संपादनांत जशी यशस्वी झाली; तशीच यापुढें स्वतंत्र भारताला समृद्ध व समर्थ बनविण्यांत यश मिळवील आणि जागतिक शांततेला मार्गदर्शक ठरेल, अशी आशा आतां कोटिकोटि भारतीयांच्या अंतःकरणांत खेळत आहे.

• • •

८ पुन: नागपूर

अखिल भारतीय काँग्रेसचें ६४ वें अधिवेशन ता. ९ जानेवारी १९५९ पासून नागपूर येथें भरत आहे. त्यासाठीं 'अभ्यंकरनगर' नांवाची नवी, प्रशस्त, सुखसंपन्न अशी वसाहत उभारली गेली यांत आश्चर्य नाहीं. पण सारी नागपूर नगरीच कायाकल्प झाल्याप्रमाणें ताजी टवटवीत दिसूं लागली आहे, हें पाहून नागपूरकरांना काँग्रेसच्या परिस-स्पर्शाचें कौतुक वाटत आहे.

पूर्वीं परसत्तेला प्रतिकार करण्यासाठीं नागपुरास भरलेल्या काँग्रेसला सरकारी विरोधाला तोंड द्यावें लागलें हें जितकें साहजिक, तितकेंच आतां काँग्रेस-पक्ष सत्तारूढ असल्यामुळें काँग्रेसच्या उभारणीस सर्वतोपरी अनुकूलता प्राप्त झाली हें स्वाभाविक. काँग्रेसचे सभासद, शहराचे नागरिक, महापालिकेचे सेवक व मुंबई राज्याचे अधिकारी—हे सारेजण एकदिलानें व एकजुटीनें या राष्ट्र-व्यापक व स्वातंत्र्य-संपादक संस्थेचें स्वागत करण्यासाठीं, तनमनधनानें, रात्रंदिवस खपत होते. नागपूर शहरांतील रस्ते अंगापिंडानें भरले आणि तळीं व बागा यांचेंहि सौंदर्य खूप वाढलें. दहा वर्षांत झाली नव्हती इतकी सर्वांगीण सुधारणा नागपूर नगरीमध्यें घडून आली. तिचा सारा नूरच पालटला. आणि खुद्द 'अभ्यंकरनगरांत' तर वीज, पाणी,

रस्ते, फ्लश-संडास, पोस्ट इत्यादि मोठमोठ्या शहरांतील सुखसोयी अवतरल्या. रोग-निवारणासाठीं दोन दवाखाने उघडण्यांत आले. हें कॉंग्रेसनगर स्टेशन-पासून दोन मैलांवर असून अंबाझरी तलावाच्या जवळ आहे. काश्मीरचें जसें दल सरोवर, तसें नागपूरचें अंबाझरी तळें–प्रशांत, प्रसन्न व प्रशस्त !

एकूण सुमारें ५०० एकर क्षेत्रफळ कॉंग्रेससाठीं साफ करण्यांत आलें. त्यावर पत्र्यांच्या व तट्ट्यांच्या खोल्या बांधण्यांत आल्या. मुख्य प्रवेशद्वार ३४ फूट उंचीचें असून त्यावर नांगर जुंपलेली बैलजोडी दाखविली आहे आणि द्वाराचे शिरोभागांवर मुंबई राज्यांतील पांच विभागांचे पांच शेतकरी जनता–जनार्दनाचें स्वागत करीत आहेत. याशिवाय इतर सहा प्रवेश-द्वारें आहेत; त्यांवर मुंबई राज्यांतील पांच विभागांचीं प्रतीकें चित्रित करण्यांत आलीं आहेत; तीं अशीं—

(१) रामटेकचें राममंदिर—विदर्भ
(२) प्रतापगडचा शिव-पुतळा—महाराष्ट्र
(३) सोमनाथाचें मंदिर—सौराष्ट्र
(४) जुम्मा मस्जिद—गुजरात (अहमदाबाद)
(५) कैलास लेणें—मराठवाडा (अजंठा)

मुख्य प्रवेशद्वाराला जमनालाल बजाज यांचें नांव देण्यांत आलें आहे. तें ४८ फूट उंच असून त्यावर १६ फूट उंचीचा तिरंगी ध्वज फडकत आहे. प्रवेशद्वार १०० फूट रुंद असून त्याचें मध्यद्वार ३० फूट रुंद आहे.

या प्रवेशद्वारांना राष्ट्रमाता कस्तुरबा गांधी, मौ. आझाद, वीर वामन-राव जोशी, सौ. अनसूयाबाई काळे, म. फुले, शहीद शंकर यांचीं नांवें देण्यांत आलीं आहेत.

नरकेसरी अभ्यंकर व शेट जमनालालजी बजाज यांचे ९ फूट उंचीचे अर्ध पुतळे बसविण्यांत आले आहेत. कॉंग्रेसच्या खुल्या अधिवेशनासाठीं एक व ऑ. इं. कॉं. कमिटीसाठीं एक असे दोन प्रशस्त मंडप उभारण्यांत आले आहेत. खुल्या अधिवेशनांत ५०० माणसें बसूं शकतील एवढें विशाल व्यास-पीठ तयार करण्यांत आलें आहे. प्रांतानिहाय २० प्रतिनिधि-निवास उभारण्यांत आले आहेत.

ध्वजस्तंभासाठीं ७५ फूट उंचीचा, चांदा जिल्ह्यांतील सावरी येथून उत्कृष्ट जातीचा बांबू आणला आहे व त्यांतून ६४ फूट उंचीचा ध्वजस्तंभ उभारण्यांत आला आहे.

पाहुण्यांची व्यवस्था नीट राहावी म्हणून २५०० स्वयंसेवक सिद्ध आहेत. त्यांत ५०० स्त्रिया आहेत.

खादी-ग्रामोद्योगाचें प्रदर्शन हें काँग्रेसचें अविभाज्य व गौरवास्पद अंग होय. १८८८ च्या काँग्रेसमध्यें जें 'स्वदेशी दुकान' प्रथम मांडलें गेलें, तेंच अशा प्रदर्शनाची गंगोत्री मानलें पाहिजे. त्यानंतर १९२० च्या नागपूर-काँग्रेसपासून, म. गांधींच्या कार्यक्रमानुसार, खादी-प्रदर्शन अधिकाधिक महत्त्व पावत गेलें. यंदाचें प्रदर्शन 'नागपूर खादी मंडळा' तर्फे भरत असून त्याला "खादी-ग्रामोद्योग कमिशननें" तीन लाख रुपयांचें साहाय्य दिलें आहे आणि सरकारी खात्यांनीं, शेती-आरोग्यादींचीं व पंचवार्षिक योजनेचीं आपलीं प्रात्यक्षिकें तेथें सजविलीं आहेत.

या प्रदर्शनांतील 'सर्वोदयमंडपां'त विनोबांच्या भू-दानाचा चित्रपट ठेवलेला आहे. म. गांधींचा पुतळाहि आपल्या मूक वाणीनें दीन खेडुतांची आठवण राष्ट्र-सेवकांना देत आहे. प्रदर्शनांत ५१२ दुकानें प्रांतोप्रांतींच्या व्यावसायिकांनीं थाटलीं असून त्यांत विविध कलावस्तूंचें दर्शन घडतें. शिवाय ४१६ दुकानांचा 'बाजार' निराळाच आहे. त्यांत खादी, साबण, ताडगूळ इत्यादि ग्रामोद्योगाच्या वस्तु विक्रीसाठीं ठेवलेल्या आहेत. 'अंबर चरखा' हें या प्रदर्शनाचें प्रमुख आकर्षण आहे. भारताच्या सर्व प्रदेशांतील कलाकौशल्याचें साक्षात् दर्शन घडविण्यास हें प्रदर्शन समर्थ आहे. नृत्य-संगीत-नाटकादि भारतीय कलांचाहि आविष्कार या प्रदर्शन-मंडपांत होणार आहे.

याशिवाय 'नेत्र-सुधार-संघाचा' 'नेत्र-यज्ञ' ता. २५ डिसेंबरपासून सुरू होणार असून तेथें डोळ्यावर अंदाजें २००० शस्त्र-क्रिया मोफत करण्यांत येणार आहेत. नवीच दृष्टि आलेल्या त्या भारतीयांच्या दृष्टीस भारतीय नेत्यांचें दर्शन प्रथमच होईल, तेव्हां त्यांना केवढा हर्ष वाटेल ! आशा आहे कीं, तसाच हर्ष नागपुरास जमणाऱ्या सर्व काँग्रेस–जनांनाहि होईल व ते नागपूरकरांना, त्यांच्या सेवाभावाबद्दल व कार्य-कौशल्याबद्दल, धन्यवाद देतील.

समाप्त.